# मोडी लिपी परिचय

आणि

# ऐतिहासिक नमुना पत्रे



P,56,1M
N1
228700

# मोडी लिपी परिचय
आणि
# ऐतिहासिक नमुना पत्रे

डॉ. मधुकर रामचंद्र कुलकर्णी

शक १९१३ इसवी १९९१

भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे
प्रकाशन

ॐ

𑘦𑘻𑘚𑘲 𑘩𑘱𑘢𑘲 𑘢𑘨𑘱𑘓𑘧
𑘁𑘜𑘱
𑘋𑘝𑘱𑘮𑘰𑘭𑘱𑘎 𑘡𑘦𑘳𑘡𑘰 𑘢𑘝𑘿𑘨𑘹

# मोडी लिपी परिचय
# आणि ऐतिहासिक नमुना पत्रे

इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे. ७

कलियुगाब्द ५०९३ शक १९१३ इसवी १९९१

भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे
प्रकाशन.

# मोडी लिपी परिचय
# आणि ऐतिहासिक नमुना पत्रे

**लेखक** - डॉ. मधुकर रामचंद्र कुलकर्णी
४८६ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

**प्रकाशक** - डॉ. चिं. ना. परचुरे, कार्यवाह भारतीय इतिहास संकलन समिती, ५२८/क शनिवार पेठ, पुणे - ३०

**मुद्रण स्थळ** - प्रेसोग्राफ, ५२६ नारायण पेठ, पुणे ३०

**प्रकाशन तिथी** शक १९१३ चैत्र शु. १५ शिवपुण्यतिथी
(कलियुगाब्द ५०९३) इसवी १९९१ मार्च ३०

**अक्षरजुळणी** इन्स्टिट्यूट ऑफ टायपोग्राफिकल रिसर्च,
६४ बुधवार पेठ, पुणे-२

© भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे ३०.

**कार्यवाह,** भारतीय इतिहास संकलन समिती,
५२८/क शनिवार पेठ, पुणे-३०

**मूल्य** - रूपये पन्नास मात्र

अर्पण पत्रिका

मातोश्री
श्रीमती सीताबाई रामचंद्र कुलकर्णी
यांच्या स्मृतीस
सादर समर्पण
लेखक

# अनुक्रमणिका


* पुरस्कार : डॉ. श्रीपती शास्त्री — सात
* भा. इ. सं. समिती - निवेदन : डॉ. चिं. ना. परचुरे — नऊ
* लेखकाचे मनोगत : डॉ. म. रा. कुलकर्णी — तेरा
* ऋणनिर्देश : डॉ. म. रा. कुलकर्णी — सोळा

## भाग १ - मोडी लिपीचा उगम आणि विकास

* लिपीची आवश्यकता — १
* मोडी लिपीचा संक्षिप्त इतिहास — १
* मोडी लिपीचे उद्दिष्ट — २
* विविध वळणे व लेखन साहित्य — ३
* इंग्रजी अंमलातील पाठ्यपुस्तक निर्मिती — ३
* मोडी लिपीचा मुद्रणकलेत प्रवेश — ४
* मोडी वाचनातील संभाव्य अडचणी — ५
* मोडी मुळाक्षरे व बाराखड्या — ५
* मोडी ऱ्हस्व दीर्घ व्यवस्था — ९
* लपेटीयुक्त लेखन पद्धती — १५
* लेखन वाचन-सराव — १८

## भाग २ मोडी कागदपत्रांचे अंतरंग दर्शन

* लेखन प्रशस्ती — ३४
* कागदपत्र संग्रहांची ओळख — ३८
* कागदपत्रांचे विवरणासह एकूण प्रकार — ४२
* सांकेतिक लेखनपद्धती — ४८
* शब्दसंक्षेप व्यवस्था — ५२

* रेघी हिशेबाची समजूत ५८
* विविध कालगणना ६१
* मुद्रा आणि शिक्के ६७
* पत्रलेखनातील विविध मायने ७१

## भाग ३ ऐतिहासिक आणि आधुनिक पत्रांचे नमुने

* मूळपत्रांचे आधार ७३
* ऐतिहासिक नमुना पत्रे ७३
* इतिहास संशोधकांची आणि ज्येष्ठ व्यक्तींची हस्ताक्षरे-उतारे १५७

## भाग ४ संकीर्ण

* ऐतिहासिक पत्रातील महत्त्वाचे शब्दार्थ १८७
* संदर्भग्रंथ सूची १९०

# प्रा. डॉ. श्रीपति शास्त्री यांचा पुरस्कार

पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माझे स्नेही डॉ. मधुकर रामचन्द्र कुलकर्णी यांनी लिहिलेले 'मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुना पत्रे' या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या पुस्तक प्रकाशनाबद्दल मला अतीव आनंद होत आहे.

ज्या तत्परतेने डॉ. कुलकर्णी यांनी सातत्याने गेली काही वर्षे मोडी लिपीतील पत्रांचा अभ्यास चालविला आहे आणि त्याचबरोबर नव्या पिढीतील इतिहासाचे संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी यांना शिकविण्याचा आणि साहाय्य करण्याचा उपक्रम सुरू ठेवला आहे तो खरोखरीच कौतुकास्पद आहे.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मी पाहिली आहे. त्यामुळे विशेषतः नव्या अभ्यासकांना ऐतिहासिक मोडी कागदाचा अभ्यास करताना किती विविध प्रकारची माहिती आवश्यक असते, ती अधिकाधिक प्रमाणात देण्याचा डॉ. कुलकर्णी यांनी केलेला प्रयत्न तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांचा हा प्रयत्न परिपूर्ण झाला आहे असे त्यांचेही म्हणणे नाही. पण या पुस्तकाच्या आधारे ऐतिहासिक मोडी लिपीतील बहुसंख्य पत्रे नव्याने पुढे आलेला अभ्यासक वाचू शकेल व त्याचा नीट अर्थही लावू शकेल हे निश्चित! या दृष्टीने मोडीलिपी संबंधीचे हे मराठी भाषेतील अधिक महत्त्वाचे पुस्तक मानावेच लागेल.

कोणतीही भाषा केवळ अक्षरसमुच्चय नसून ती एका समृद्ध संस्कृतीचा बहुमोल ठेवा असते. हा ठेवा लिपीच्या साहाय्याने अक्षरांच्या दृष्य चौकटीत बसविलेला असतो. त्या प्रमाणे भारताच्या मध्ययुगीन आणि विशेषतः मराठी इतिहासास उपयुक्त असा राजकीय-शासकीय व्यवहार, न्यायालयीन कागद, सावकारी किंवा जमीन जुमल्याच्या संबंधातील कागद कालनिर्णय इत्यादी अनेक सामाजिक, सांस्कृतिक विषयांची जाण मोडी लिपीच्या अभ्यासाच्या आधारेच आकलन होऊ शकेल हे स्पष्ट आहे. देशातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील अभिलेखागारांत आज मोडीलिपीतील ऐतिहासिक कागदपत्रे लाखोंच्या संख्येने नव्या अभ्यासकांची अजून वाट पाहात आहेत. त्यांच्या अभ्यासाने इतिहास आणि संस्कृतीत फार मोठी भर पडू शकणार आहे. अशा स्थितीत मोडी लेखक आणि वाचक यांची संख्या मात्र दिवसेंदिवस कमीच होत चालली आहे. ही संख्या वाढली नाही आणि नवे अभ्यासक पुढे सरसावले नाहीत तर इतिहासाच्या या साधनसामग्रीचा, काळाच्या ओघात नाश होणार आहे. नुकसान टाळावयाचे असेल तर मोडी लिपीला विशेषतः इतिहासविषयक जिज्ञासा असलेल्या लोकांपर्यंत पोहोचविण्याचा असा प्रयत्न स्तुत्य मानून त्यास सर्वांचा पाठिंबा आणि पुरस्कार आवश्यक आहे.

देशोधडीला लागलेले यहुदी लोक जेव्हां परत इस्रायलला पोहोचले तेव्हां त्यांनी प्रथम

आपली भाषा आणि हिब्रू लिपी यांचा पुनरुद्धार केला. आणि अत्यंत अभिमानाने तिला राष्ट्रभाषेची आणि लिपीची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. अत्यंत अल्प काळात म्हणजे मोजक्याच दशकात त्यांनी राष्ट्रभाषा समृद्ध बनविली. जागतिक स्तरावर आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात करावयाचे असेल तर ही हिब्रूभाषा आणि लिपी आज अवगत असणे अपरिहार्य झाले आहे. भाषा आणि लिपी यामध्ये जे प्रचंड सामर्थ्य असते ते ओळखणे हे जागृत समाजाचे कर्तव्यच असते.

ऐतिहासिक काळात विकसित होत होत आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेली ही मोडी लिपी आपल्या डोळ्यादेखत दुर्लक्षित होऊ देणे वा नष्ट होऊ देणे म्हणजे समाजाचे नष्टचर्यच मानावे लागेल. त्यामुळे होणारे नुकसान इतर कोणात्याच साधनांनी भरून येणार नाही. शैक्षणिक क्षेत्राची आजची स्थिती पाहता विद्यापीठे आणि संशोधन केन्द्रातून मोडी लिपीच्या अभ्यासाची आणि तत्संबंधित विविध पैलूंची जवळ जवळ हकालपट्टी झालेली दिसते. या लिपीला इतिहास विषयक संशोधन क्षेत्रात जी सुप्रतिष्ठा आवश्यक आहे त्यापासून ती वंचित झालेली आहे. शैक्षणिक क्षेत्रात वावरणाऱ्या अभ्यासकांचा आणि संशोधकांचाही तिच्याशी असलेला संबंध तुटला आहे. या बाबत राज्य सरकारे आणि विद्यापीठे काय योजना करतात याचा विचार बाजूस ठेवून समाजातील विविध संस्थांनी आणि घटकांनी या अभ्यासास पुन्हा चालना देण्याच्या दृष्टीने पाऊल उचलणे ही आज काळाची गरज आहे. अशा प्रयत्नामुळेच शासनाचेही लक्ष या विषायाकडे वेधून घेणे शक्य होईल.

या विचाराच्या पार्श्वभूमीवर डॉ. कुलकर्णी यांनी हे पुस्तक तयार करून जणू या विषयाचा श्रीगणेशाच केला आहे. वस्तुस्थितीत अत्यंत दुर्लक्षित पण तितक्याच महत्त्वाच्या या विषयाकरिता स्वतःस जवळ जवळ वाहवून घेऊन त्यांनी जे परिश्रम घेतले आहेत ते खरोखरीच अभिनंदनीय आहेत. त्याचबरोबर भारतीय इतिहास संकलन समितीने हे क्लिष्ट प्रकाशन कार्य स्वीकारून आर्थिक प्रश्नाचा कोणताही विचार न करता कर्तव्य भावनेने ते आपले मानले हे तितकेच स्तुत्य आहे. या दोघांच्या प्रयत्नामुळेच हे महत्त्वाचे पुस्तक आज उपलब्ध होत आहे.

डॉ. कुलकर्णी आणि भारतीय इतिहास संकलन समिती-पुणे या दोघांना या प्रकाशनाबद्दल मी मनःपूर्वक धन्यवाद देतो आणि या इतिहास संशोधन क्षेत्रतील महत्त्वाच्या पुस्तकाचा उपयोग जिज्ञासू करून घेतील अशी अपेक्षा बाळगतो.

**इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ**
**श.१९१३ चैत्र शु. १५** **श्रीपति शास्त्री**
**शिवपुण्यतिथी**
**इ. १९९१, मार्च ३०**

# भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे

# निवेदन

भारतीय इतिहास संकलन समितीच्या कार्यात प्रथमपासून रस घेणारे, डॉ. मधुकर रामचंद्र कुलकर्णी यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेले 'मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुना पत्रे' हे इतिहास संशोधन क्षेत्रातील अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरणारे पुस्तक प्रकाशित करताना समितीस आज विशेष समाधान लाभत आहे.

वास्तविक हे प्रकाशन या पूर्वीच निदान २-३ वर्षे अगोदर प्रसिध्द होणे अवश्यक होते. पुण्याच्या पहिल्या इतिहासदिन प्रसंगी (श.१९८२/इ.१९०४) पुणे लेखाभिगार कार्यालयाने पुणे मराठी ग्रंथालयात दुर्मिळ मोडी-ऐतिहासिक कागदांचे प्रदर्शन भरविले होते. कै.आचार्य वि. प्र. लिमये यांच्या अध्यक्षतेखाली कै. डॉ. ग. ह. खरे आणि समितीचे कार्याध्यक्ष श्री. मोरोपंत पिंगळे, डॉ. रा शं. वाळिंबे, डॉ. शां. भा. देव आणि प्रामुख्याने पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांचे उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले होते. पुण्याच्या द्वितीय इतिहासदिन प्रसंगी (श. १९०५/इ. १९८३) इतिहास महर्षी कै. डॉ. ग.ह. खरे यांनी मोडी लिपीच्या अभ्यासवर्गाची व अध्ययनाची गरज व तिचे महत्त्व विशेष ठरावाच्या स्वरूपात प्रकट केले होते. या प्रसंगी डॉ. रा. शं. वाळिंबे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी उभयतांनी महाराष्ट्राच्या इतिहास क्षेत्राचे होणारे नुकसान पोटतिडकीने व्यक्त केले होते. महाराष्ट्र राज्य शासनाला आणि इतिहाससंशोधन विषयक कार्य करणाऱ्या सर्व संस्थांना आणि अभ्यासकांना या ठरावात या संबंधीची कार्यवाही करण्याचे आवाहनही केले होते.

महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखाभीगार विभागातर्फे मोडी लिपी शिकविण्यासाठी अभ्यासवर्ग चालविण्याची तयारी सुरू झाली होती. श. १९०६ (इसवी १९८४) मध्ये या विभागाने पुण्यात पहिला मोडी लिपी शिक्षणवर्ग आयोजित केला. त्यास उत्तम प्रतिसादही मिळाला. या वेळी विभागाकडून आवश्यक तो मजकूर टंकलिखित करून विद्यार्थ्यांना दिला होता. डॉ. म.रा. कुलकर्णी या प्रसंगी व्याख्याते म्हणून होतेच. पण त्यानंतर इतरत्र भरलेल्या मोडी लिपी शिक्षण वर्गात ३-४ स्थानी त्यांनी प्रत्यक्ष पाठ घेऊन मार्गदर्शन केले होते. पुणे, मुंबई, नगर इ. ठिकाणचे हे वर्ग यशस्वी झाले होते.

या वर्गांमध्ये ऐतिहासिक मोडीलिपीच्या माहितीवर आधारलेल्या एखाद्या पुस्तकाची उणीव सर्वांनाच भासत होती. डॉ. कुलकर्णी यांना या उणीवेची अधिकच जाण झाली होती. त्यामुळे अशा पुस्तकाची ...ारी करण्याचा विचार त्यांचे मनात बळावणे स्वाभाविकच होते. डॉ. कुलकर्णी यांनी श. १८८७ (इसवी १९६५) मध्ये भारत इतिहास संशोधक मंडळाचे

सभासदत्व स्वीकारले . तेथे प्रा. ग.ह. खरे आणि श्री. माधवराव ओंकार यांचेशी त्यांचा संबंध वाढू लागला. या दोघांच्या सहवासात पडेल ते काम करताना त्यांचे लक्ष हळूहळू मोडीतील कागदपत्रांचे वाचन करण्याकडे वळू लागले. इतिहास महर्षी तात्यासाहेब खरे आणि श्री. ओंकार यांच्या सततच्या आग्रहामुळे नव्या पिढीतील एक अभ्यासू मोडी-वाचक येथे तयार होऊ लागला.

पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मोडी कागदांच्या वाचनाकडे डॉ. कुलकर्णी यांचे अधिकच लक्ष वेधले गेले. डेक्कन महाविद्यालयाच्या इतिहास विभागात मोडी Scribe म्हणून त्यांची नियुक्ती झाली. डेक्कन महाविद्यालयातील सर्व म्हणजे १०० ही रुमाल त्यांनी वाचून काढले. भा. इ. सं. मंडळाच्या पाक्षिक सभेत मोडी लिपीतील कागदांवर आधारलेला 'खर्ड्याची लढाई' हा निबंध त्यांनी सादर केला. स्वाभाविकच त्यांचा उत्साह वाढला.

श. १८९२ (इसवी १९७०) ते श. १९०६ (इसवी १९८४) या १४-१५ वर्षांनंतर श. १९०६ (इसवी १९८४) मध्येच संशोधक साहाय्यक या पदावर पुणे विद्यापीठातील इतिहास विभागात त्यांची नेमणूक झाली. तेथे ते एम्. फिलच्या वर्गास मोडी-लिपीचे पाठही देऊ लागले. येथेच त्यांनी 'नाना फडणीसाच्या प्रशासन व्यवस्थेखालील मराठी राज्यशासनाचे स्वरूप' हा प्रबंध डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने सादर केला व ते पीएच्. डी. झाले.

गेली काही वर्षे विद्यापीठाच्या कामाकरिता डॉ. कुलकर्णी यांचा पुणे येथील शासकीय दप्तरखान्याशी दैनंदिन संबंध आला. येथील साधनांचा शोध घेताना भा. इ. सं. मंडळ व डेक्कन महाविद्यालयाप्रमाणेच येथील मोडी लिपीतील हजारो कागदांचे त्यांनी आजपर्यंत वाचन केले आहे. त्यामुळेच मोडी कागदांचा अभ्यास करताना कोणत्या विविध विषयातील ज्ञान अभ्यासकास गरजेचे आहे याची त्यांना पुरेपूर कल्पना आली. ऐतिहासिक मोडी पत्रातील लेखनपध्दती, ऱ्हस्वदीर्घ पध्दती, कालगणना व तिथी, शिक्के, मायने, मुद्रा, हिशेब, संक्षेप, शब्दार्थ, गूढार्थ, विशिष्ट खुणा इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या परिचयाची झाली, विशेष म्हणजे या सर्वांच्या त्यांनी स्वतंत्रपणे नोंदी ठेवल्या. पर्यायाने त्यांचेकडून या पुस्तकाची परस्पर बरीच तयारी झाली. त्यांचे पेशवे दप्तरखान्यातील दररोजचे वास्तव्य हेच या पुस्तकाच्या निर्मितीस प्रमुख कारण मानले तर ते योग्यच ठरेल.

महाराष्ट्राच्या सर्वस्पर्शी इतिहासलेखनाकरिता राज्यातील दप्तरखान्यात आणि संशोधन संस्थांमध्ये दुर्लक्षित राहिलेल्या आणि स्पर्शही न झालेल्या लाखो ऐतिहासिक कागदांचे वाचन होणे अत्यावश्यक आहे. हे कागद प्रामुख्याने मोडी, फार्सी, देवनागरी आणि रोमन या लिप्यातील आहेत. सध्या मोडी आणि फार्सीचे जाणकार संख्येने अत्यंत कमी आहेत. हे कागद जसे महाराष्ट्र आणि इतर काही राज्यांच्या अभिलेखाभिगारात पडून आहेत; तसेच नेपाळ, पाकिस्तान, पोर्तुगाल, इंग्लंड, फ्रान्स इत्यादी देशांतूनही अभ्यासकांची वाट पाहात आहेत.

राजस्थानमधील बिकानेर अभिलेखाभिगारातच सुमारे ४० कोटी कागद रुमालात बांधून पडले आहेत! अशा सर्व कागदांना मुक्त करून त्यातील राजनैतिक, सांस्कृतिक, सामाजिक, शास्त्रीय माहितीच्या नोंदी घेतल्याशिवाय महाराष्ट्र संस्कृतीचा आणि इतिहासाचा मागोवा घेणे केवळ अशक्य आहे. या स्थितीत काही अंशाने का होईना बदल घडावा, विशेषत: नव्या अभ्यासकांना या पत्रांचे योग्य पध्दतीने सार्थ वाचन करता यावे व त्यामुळे घटना आणि वैशिष्ट्ये यांचे आकलन व्हावे या कल्पनेने भा. इ. संकलन समिती आणि डॉ. कुलकर्णी यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्याचे निश्चित केले होते.

बदलत्या काळात मोडी लिपी व्यवहारात पुन्हा स्थान प्राप्त करेल अशी शक्यता आज तरी सांगता येत नाही. मात्र तिची विशिष्ट लकब, गती आणि वैशिष्ट्ये ध्यानात घेता ती पुढेही इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाची मानावीच लागेल. तिच्या वैशिष्ट्यामुळे तिच्या ऐतिहासिक काळातील महत्त्व यत्किंचितही कमी होऊ शकणार नाही. महाराष्ट्र संस्कृतीशी आणि इतिहासाशी असलेले तिचे अतूट नाते कोणास तोडता येणार नाही.

पुस्तकाचे प्रकाशन वर्ष-दोन वर्षे लांबणीवर पडले हे खरेच. मात्र त्यास अनेक तांत्रिक व व्यावहारिक अडचणी होत्या. भारतीय इतिहास संकलन समिती ही एखादी व्यवसायिक संस्था नाही. लोकाश्रय हा तिचा महत्त्वाचा आधार! हे काम थोडे रेंगाळले तरी ते पूर्ण व्हायलाच पाहिजे याचा आग्रह जर कोणी अखेरपर्यंत धरला असेल तर तो, पुणे विद्यापीठातील इतिहास विभागातील प्रपाठक डॉ. श्रीपती शास्त्री यांनीच होय. वास्तविक अर्वाचीन इतिहासाचे ते ज्येष्ठ अभ्यासक. स्व-कर्तृत्वाने त्यांना पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात, सेवा व विचार चिंतनाच्या बळावर एक विशिष्ट स्थान प्राप्त झाले आहे. अभ्यास, कामाचा रगाडा आणि भ्रमंती यातूनही त्यांनी या विषयाकडे दुर्लक्ष होणार नाही आणि ते प्रकाशित होईलच याकरिता सर्व प्रकारची खटपट केली. त्यांचे मार्गदर्शन आणि साहाय्य या खेरीज हे पुस्तक प्रकाशित होणे अशक्यच होते. त्यांच्या ऋणातून इतिहास संकलन समिती आणि लेखक मुक्त होणे शक्य नाही. नव्हे दोघांची तशी इच्छाच नाही!

या पुस्तकाच्या तयारीपासून डॉ. कुलकर्णी यांचा भा. इ. सं मंडळाचे एक चिटणीस डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांचेशी सतत संपर्क होता. मोडी लिपी संबंधीच्या या पुस्तकाबाबत त्यांनी विशेष आस्था दर्शविली होती. त्यांनी पुस्तकाचे हस्तलिखित पाहून मनातील जे भाव व्यक्त केले ते असे "– हे हस्तलिखित मी काळजीपूर्वक चाळून पाहिले. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक जिज्ञासूला मोडी लिपी उत्तम रीतीने आत्मसात करण्यास या पुस्तकाचा निश्चितच बहुमोल उपयोग होईल. डॉ. कुलकर्णी यांचे हे हस्तलिखित शक्य तितक्या लवकर पुस्तकरूपाने जरूर प्रसिद्ध झाले पाहिजे अशी मी शिफारस करेन".

आता अपेक्षेप्रमाणे पुस्तक प्रकाशित झाल्यामुळे त्यांना विशेष आनंद होईल. समिती त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देत आहे.

लिपिकार श्री. ल. श्री. वाकणकर यांचे समितीस वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. लिपी-शास्त्र हा तर त्यांचा आवडीचा विषय. 'इन्स्टिट्यूट ऑफ टायपॉग्राफिकल रिसर्च' या संस्थेचे ते तंत्रविज्ञानाचे संचालक. पुस्तक तयार करताना त्यांनी अनेक बहुमोल सूचना केल्या. महत्त्वाचे संदर्भ उपलब्ध करून दिले. पुण्याच्या समितीचे पालकत्त्व जणू ते अंगिकारत आहेत. या संस्थेचेच संचालक श्री. मुकुंदराव गोखले, श्री. वसंतराव भट, आणि त्यांचे सर्व सहकारी यांच्या अथक योजनेमुळे पुस्तकास देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. समिती त्यांच्या या मार्गदर्शनाबाबत कृतज्ञ आहे.

आरंभी ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करण्याचे थोडे जिकीरीचे काम होते. समितीचे एक सेवानिवृत्त पण उत्साही कार्यकर्ते श्री. भालचंद्र गोपाळ ढमढेरे यांनी ते अत्यंत आपुलकीने आणि तत्परतेने करून दिले. ज्ञानविलास प्रेस व विकास एजन्सीच्या श्री. जोशी बंधूंनी लगोलग कागद उपलब्ध करून दिला आणि मुखपृष्ठाची छपाई करून दिली. प्रेसोग्राफचे संचालक श्री. प्रवीण जोशी यांनी मुद्रणाची जबाबदारी तितक्याच आपलेपणाने सांभाळली. मुखपृष्ठाकरिता राजा केळकर संग्रहालयाचे संचालक डॉ. रानडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांची इतिहास संकलन समिती ऋणी आहे.

केवळ मोडी कागदांचे प्रदर्शन भरवून किंवा ती संबंधीचे ठराव करून इतिहास संकलन समितीचे या बाबतीतील कार्य पूर्ण होणार नव्हते. याकरिता आवश्यक अशा ग्रंथाची निर्मिती करून देणे अधिक महत्त्वाचे होते. आज प्रकाशित होणारा हा ग्रंथ परिपूर्ण आहे असे समितीचे आणि ग्रंथकर्त्याचेही म्हणणे नाही. तरीपण या प्रकाशनाने इतिहास संशोधनाच्या आणि प्रामुख्याने मोडी कागद वाचण्याच्या क्षेत्रात पुढे येणाऱ्या तरुण अभ्यासकांना या ग्रंथाचा उपयोग व्हावा. जेथे जेथे इतिहासाचे अभ्यास क्षेत्र असेल त्या सर्व संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये इत्यादींनी याचा अधिकाधिक उपयोग करून घ्यावा आणि इतिहास संकलन समितीच्या कार्याला हातभार लावावा असे समितीचे आवाहन आहे.

डॉ. म.रा. कुलकर्णी यांचे आभार मानणे, ते आमच्यातीलच असल्याने, त्यांना रुचणार नाही. तरीपण त्यांच्या सततच्या आणि अभ्यासपूर्ण परिश्रमामुळेच आज समिती हे पुस्तक सादर करू शकत आहे. डॉ. कुलकर्णींनी त्यांच्या स्वर्गीय आईच्या स्मृतीस हे पुस्तक अर्पण केले आहे. त्यांच्या मातेच्या पुण्यस्मृतीस विनम्र आदरांजली वाहून या निवेदनास पूर्ण विराम देणे उचित!

कलियुगाब्द ५०९३
शक. १९१३ चैत्र शु. १५ शिवपुण्यतिथी — चिं. ना. परचुरे
इसवी १९९१ मार्च ३०. — कार्यवाह

# लेखकाचे मनोगत

इतिहासप्रेमी, जिज्ञासू अभ्यासक आणि विशेषतः इतिहास विषयात पदव्युत्तर संशोधन करू इच्छिणाऱ्या एम्. फिल्. आणि पीएच्. डी च्या विद्यार्थ्यांना 'मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुना पत्रे' हे पुस्तक सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

आज इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेश करू पाहणाऱ्यास मोडी लिपीचे समग्र ज्ञान करून देणारे एकही पुस्तक उपलब्ध नाही. मराठ्यांच्या इतिहासाची मूळ अस्सल अप्रसिध्द साधने पाहावयाची, सखोल अभ्यासावयाची तर मोडी तिच्या विविध लपेट्यांसह उत्तम प्रकारे आत्मसात करण्याखेरीज तरणोपायच नाही. अशा पुस्तकाअभावी विद्यार्थ्यांची जी कुचंबणा होत होती ती या प्रकाशनाने बहुतांशी निश्चित दूर होईल असा विश्वास वाटतो. या पुस्तकाच्या मदतीने कोणीही जिज्ञासू व्यक्ती घरबसल्या उत्तम प्रकारे मोडीलिपीचे ज्ञान मिळवू शकेल किंवा छंद म्हणून जोपासू शकेल.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी म्हणजे श. १८७२ (इसवी १९५०) मध्ये शालेय अभ्यासक्रमात असलेली मोडी लिपी अनावश्यक तसेच कालबाह्य ठरविली गेली. परिणामतः अभ्यासक्रमातून ती रद्द करण्यात आली. यामुळे नव्या पिढीस या ऐतिहासिक लिपीचा सहजी परिचय होण्याची संधीच नष्ट झाली; आणि आता तर मोडी लिपी विस्मृतीच्या पडद्याआड जाणार नाही नां? अशी भीती वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ही लिपी तेराव्या शतकाच्या प्रारंभापासून ते विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत म्हणजे सुमारे ७०० वर्षे प्रामुख्याने शासकीय यंत्रणेत आणि लोकव्यवहारात रूढ होती. केवळ महाराष्ट्राच्या भूप्रदेशातच नव्हे तर हिंदुस्थानातील ज्या ज्या प्रांतात मराठ्यांची सत्ता पोहोचली होती आणि स्थिरावलेली होती अशा बडोदे, इंदूर, ग्वाल्हेर इत्यादी केन्द्रस्थानी, तसेच दक्षिणेतील तंजावर, म्हैसूर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मोडी लिपीतील ऐतिहासिक साधने आढळतात. मराठी साम्राज्य हिंदुस्थानातील बहुतेक प्रांतातून पसरलेले होते. अशा प्रत्येक राज्यात आता शासकीय दप्तरखाने स्थापन करण्यात आले आहेत. येथील संग्रहालयातून अक्षरशः कोट्यावधी संख्येने कागदपत्रे जतन करून ठेवण्यात आली आहेत. या शिवाय खाजगी संशोधन संस्था आणि व्यक्तिगत संग्रह यांच्याकडील कागदपत्रांची संख्याही जवळजवळ तेवढीच भरेल. येवढे मोठे ज्ञानभांडार वाचकांची, अभ्यासकांची वाट पाहत आहे. पूर्वीप्रमाणे सरसकट सर्वांनी मोडी शिकणे आज कालबाह्य ठरले असले तरी इतिहास शिक्षक, पदव्युत्तर संशोधन करु इच्छिणारे आणि संशोधनात विशेष रस घेणाऱ्यांनी तरी किमान ही लिपी उत्तम प्रकारे आत्मसात करणे जरुर आहे. दुर्दैवाने अशी मोडी-शिक्षणाची सोय मात्र स्थिर स्वरूपात कोठेही अस्तित्वात नाही.

या दृष्टीने गेल्या काही वर्षात भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे विद्यापीठ-इतिहास विभाग आणि प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाचा पुराभिलेख विभाग यांनी काही पाऊले उचललेली दिसून येतात. संकलन समितीने पुणे महानगराच्या द्वितीय इतिहासदिन प्रसंगी मोडी लिपी शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करणारा ठराव मान्य करून घेतला आणि महाराष्ट्र शासनापर्यंत नेऊन पोहोचविला होता. पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाने 'मोडी लिपी परिचय' हा विषय आवश्यक मानून त्याचा एम्. फिल्. च्या अभ्यासक्रमात समावेश केला. महाराष्ट्र शासनाच्या मुंबई व पुणे येथील लेखाविभागाराच्या विद्यमाने तीन-चार वर्षे ठराविक मुदतीचे मोडी प्रशिक्षण वर्ग पुणे, मुंबई, नगर इत्यादी ठिकाणी चालविण्यात आले. या विविध उपक्रमांमुळे महाराष्ट्र राज्यात या विषयाला विशेष चालना मिळाली.

उपर्युक्त वर्गातून शिकवीत असताना या संबंधीच्या पाठ्यपुस्तकाची विशेष उणीव भासत असे. लिपी परिचय करून देत असताना विद्यार्थी आणि प्रामुख्याने तरूण संशोधक यांना, ऐतिहासिक कागद हाताळत असताना उपयोगी पडणारी महत्त्वाची अवांतर माहिती द्यावी आणि विद्यार्थ्यास प्रस्तुत विषयाची गोडी लागावी व ती वाढावी या विचाराने या ग्रंथ रचनेला चालना मिळाली.

कै. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांचे पासून ते ज्येष्ठ इतिहास संशोधक कै. डॉ.ग. ह. खरे यांचेपर्यंत मोडीतील अस्सल साधने प्रसिद्ध करण्याची परंपरा निर्माण झाली. त्या योगे ऐतिहासिक क्रम लक्षांत येतो आणि तत्कालीन भाषेचा परिचय होतो. तथापि नव्याने मोडी शिकणाऱ्यास या उपक्रमाचा काहीच उपयोग होत नाही. महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागाने मात्र या बाबतीत एक पाऊल पुढे टाकले आहे. 'ऐतिहासिक व्यक्तींच्या हस्ताक्षर-युक्त पत्रांचा संग्रह, 'Illustrative Modi Documents' आणि 'शिवछत्रपतींच्या पत्रांचे प्रतिरूप दर्शन' ही पुस्तके या विभागाने प्रसिद्ध केली. या पुस्तकातून मूळ मोडीलिपीतील पत्र आणि शेजारी त्याचा बालबोधी तर्जुमा (लिप्यंतर) दिलेला असल्याने अभ्यासकांची आणि जिज्ञासूंची मोठीच सोय झाली आहे. तथापि नव्याने मोडी शिकणाऱ्यास या ही पुस्तकांचा फारसा उपयोग होत नाही. या वस्तुस्थितीमुळे कल्पनेत असणारे पुस्तक प्रत्यक्षात आणण्यास मला बराच वाव मिळाला.

या पुस्तकाची कल्पना मनात बरेच दिवस रेंगाळत राहिली तरी प्रत्यक्ष कामास दि. २५ डिसेंबर १९८६ ( श. १९०८ मार्गशीर्ष व. ९) रोजी मी प्रारंभ केला. आणि ४ एप्रिल १९८७ ( श. १९०९ चैत्र शु. ६) रोजी कच्ची प्रत तयार झाली. पुणे लेखाभिगारात या करिता उपयुक्त पत्रांचा शोध घेत असताना इतिहासाचार्य राजवाडे यांनी दिलेल्या सुमारे ८० ऐतिहासिक पत्रप्रकारांपेक्षा कितीतरी अधिक प्रकार प्रत्यक्षात आढळून आले. कै. प्रा. ग. ह. खरे यांनी मराठी विश्वकोश खंड ९-पृ. १८९ वर काही पत्रप्रकार दिले आहेत. हे सर्व प्रकार आणि नव्याने लक्षात आलेल्या पत्र प्रकारांची मिळून एकूण संख्या १३५ पर्यंत जाते. हे एवढेच

पत्रप्रकार आहेत असे मात्र नाही. ज्या रुमालांच्या सूची झालेल्या नाहीत असे अक्षरशः हजारो रूमाल पुणे लेखाभिगारात आहेत. ते सर्व पाहणे केवळ अशक्य वाटल्यावरून हे काम आवरते घेतले. पुस्तकात समाविष्ट केलेले पत्रांचे नमुने नव्या अभ्यासकाची जिज्ञासा निश्चित जागृत करतील असा विश्वास वाटतो.

दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक पत्रांचे बालबोधी लिप्यंतर तयार केले. प्रारंभी या सर्व पत्रप्रकारांचा समावेश करावा अशी कल्पना होती; पण लिप्यंतराच्या तीन फायली गच्च भरल्या. पृष्ठसंख्येची मर्यादा, प्रकाशनाचा एकूण खर्च आणि प्रतीची किंमत हे सर्व लक्षात घेऊन तडजोड करावीच लागली. सर्व पत्रप्रकारांचे केवळ विवरण देऊन निवडक २५ पत्रांचा सदर ग्रंथात समावेश करण्याचा मध्यम आणि व्यवहारी मार्ग स्वीकारावा लागला.

निवडक पत्रे प्रथम वाचण्यास सुलभ, नंतर लपेटीदार व अखेरीस वाचण्यास कठीण या क्रमाने घेतली आहेत. त्या दृष्टीने पत्र क्रमांक ५,६, ११, १२, १६ व १७ विशेष महत्त्वाची आहेत.

ग्रंथ रचनेच्या तिसऱ्या टप्प्यात संशोधकांना उपयुक्त अशी अवांतर माहिती दिली आहे. त्यात विविध कालगणना आणि त्यांचे परस्पर संबंध, रेघी हिशेबी पद्धती, जमीन मोजणी परिमाणे, वस्तू परिमाणे, महत्त्वाचे शब्दार्थ, शब्दसंक्षेप इत्यादी महत्त्वाचे विषय अंतर्भूत केले आहेत. शेवटी इतिहास संशोधक आणि काही ज्येष्ठ व्यक्तींची हस्ताक्षरे आणि मोडी उतारे सादर केले आहेत. ती नव्या अभ्यासकास सरावाकरिता निश्चित उपयुक्त ठरतील.

मोडी लिपी परिचयावरील हे पहिलेच पुस्तक. त्याच्या रचनेत आवश्यक ते सर्व विषय आले असतीलच असे नाही. काही त्रुटी भासणे शक्य आहे. वाचकांनी त्या संबंधीचे अभिप्राय अवश्य कळवावेत. म्हणजे पुढील आवृत्तीत त्यांचा विचार करता येईल.

प्रस्तुत पुस्तकाकरिता प्रकाशक उपलब्ध होणे तसे अवघडच होते. डॉ. प्रा. श्रीपती शास्त्री यांच्या मध्यस्थीने हे काम सुकर झाले; आणि भारतीय इतिहास संकलन समितीने ही अवघड जबाबदारी आनंदाने स्वीकारली. आपुलकीच्या जिव्हाळ्याने समितीने हे काम तत्परतेने पूर्णत्वास नेले म्हणूनच आज हे पुस्तक वाचकांसमोर सादर होत आहे. समितीने केलेल्या सहकार्याबद्दल तिचे आभार मानण्यापेक्षा तिच्या ऋणातच राहाणे मला अधिक आवडेल!

कलियुगाब्द ५०९३

शक. १९१३ चैत्र शु. १५ शिवपुण्यतिथी — म. रा. कुलकर्णी

इसवी १९९१ मार्च ३०.

# ऋणनिर्देश

'मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुना पत्रे' या पुस्तकाची जुळणी करताना मला अनेकांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले आहे. ग्रंथप्रकाशन प्रसंगी या सर्व सहकाऱ्यांचे स्मरण होणे स्वाभाविकच आहे.

प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केलेली ऐतिहासिक नमुना पत्रे ही पुणे लेखाभिगाराच्या संग्रहातून निवडलेली आहेत. ती प्रकाशित करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या मुंबई लेखाभिगाराचे मा. संचालक यांनी तत्परतेने अनुज्ञा दिली. या पत्रांची निवड करताना पुणे लेखाभिगारातील अधीक्षक मा. श्री. सू. ज्ञा. शिंदे, त्यांचे सहकारी श्री. भट आणि कार्यालयीन सेवकवर्ग यांनी मला अत्यंत आत्मीयतेने सर्वतोपरी सहकार्य केले आहे. भा. इ. सं. मंडळाचे चिटणीस डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनी इतिहास संशोधनाच्या कामात या ग्रंथाचे महत्त्व जाणून आपला अभिप्राय दिला. या सर्वांची मी कृतज्ञतेने जाणीव ठेवतो.

या पुस्तकाच्या अखेरीस काही इतिहास संशोधक, समाजधुरीण, यांच्या स्वाक्षरीयुक्त हस्ताक्षरांचे (मजकूर) नमुने दिले आहेत, याचे संकलन करताना मिरजेच्या 'कै. वासुदेवशास्त्री खरे स्मृतिमंदिर' याचे कार्यवाह श्री. आगाशे, महाराष्ट्रातील ज्येष्ठ फार्सी अभ्यासक डॉ. सेतुमाधवराव पगडी, पुण्यातील ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. य. न. केळकर, डेक्कन कॉलेजचे निवृत्त प्रा. डॉ. मुजुमदार, श्री. र. वा. पाळंदे इत्यादी इतिहास अभ्यासकांचे मला बहुमोलाचे साहाय्य झाले आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

प्रस्तुतची मुद्रण प्रत काळजीपूर्वक तपासून प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर आणि सौ. अंजली निलंगेकर यांनी उपयुक्त सूचना केल्या. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. टायपोग्राफिकल रिसर्च इन्स्टिट्यूट आणि प्रेसोग्राफ यांना मनःपूर्वक धन्यवाद.

लेखक

# भाग १ - मोडी लिपीचा उगम आणि विकास

**लिपीची आवश्यकता -**

आपले विचार परस्परास लिहून कळविण्याचे प्रमुख साधन म्हणजे लिपी असे म्हणता येईल. लिपी वाचून वाङ्मयास स्थैर्य प्राप्त होत नाही. प्रगती संभवत नाही. मानवाच्या स्मरणशक्तीला असणाऱ्या मर्यादेतून लिपीचा उगम झाला असे मानले पाहिजे. आपले मनोगत दुसऱ्या व्यक्तीस कळावे म्हणून ज्यावेळी लिपीचा प्रथम उपयोग झाला तेव्हा तिचे स्वरूप चित्रलेखन असे राहिले. त्याला विशिष्ट भाषेची जरुरी नसे. पण ही चित्रलिपी वाटते तेवढी सुबोध नव्हती. पुढे त्यास उद्‌गारद्योतक स्वरूप आले. उदाहरणार्थ सिंहाच्या चित्राने 'स' चा, ढालीच्या चित्राने 'ढ' चा अर्थबोध होऊ लागला. तो पुरेसा नव्हता. या स्थितीतच लिपीचा उगम आढळतो.

अलीकडील पुराव्यावरून ब्राह्मणकाली किंवा त्याहीपूर्वीपासून भारतीयांना लिपीज्ञान होते असे सिध्द झाले आहे.आपली लिपी जर खरोखरीच चित्रलिपीतून निर्माण झाली असेल तर तिचा काळ आणखी ३-४ हजार वर्षे मागे नेता येतो.चित्रलिपीचा काळ सुमारे ७ हजार वर्षे मानला जातो.त्या अलीकडील अशोकाचे शिलालेख प्रसिद्ध आहेत. ते विपुल संख्येने आहेत. त्यावरून समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत अशोकाच्या काळापूर्वीही लेखनविद्या रुजलेली असली पाहिजे.

**मोडी लिपीचा संक्षिप्त इतिहास**

मोडी लिपी नेमकी केव्हापासून सुरू झाली याबद्दल इतिहासतज्ञात एकमत नाही. काही संशोधक या लिपीचा उगम सुमारे २ हजार वर्षे इतका मागे नेतात. भारताच्या इतिहासात मगध साम्राज्य होऊन गेले. मौर्य वंशाचे महापराक्रमी राजे चंद्रगुप्त, सम्राट अशोक यांच्या काळात मोडी लिपी अस्तित्वात आली असे मानले जाते. मौर्यांची लिपी म्हणून तिला 'मोडी म्हटले जाऊ लागले. मोडी लिपीत अपूर्ण वर्ण काढण्याची सोय नाही. त्यामुळे संयुक्त वर्ण बालबोधीप्रमाणे मोडी लिपीत बिनचूक लिहिता येत नाहीत. अशोकलिपीतही अपूर्ण व्यंजने काढता येत नसल्याने तीत जोडाक्षरे आढळून येत नाहीत. 'व्य' चे लेखन 'वय' असे केलेले आढळते. दुसरे कारण, अशोकलिपीतसुध्दा ऱ्हस्व- दीर्घ व्यवस्था नाही. यामुळे अशोक लिपीची सुधारीत आवृत्ती मोडी असे मानले गेले.

दुसरे मत असे की सुमारे सातशे वर्षांपूर्वी महाराष्ट्र-कर्नाटक-आंध्र या विस्तृत भूभागावर यादवांचे साम्राज्य होते. महादेवराव यादवाचे कारकीर्दीत हेमाड किंवा हेमाद्रीपंडित नामक प्रख्यात महामंत्री होऊन गेला (इ.१२६०-श. ११८२). असेही मानले जाते की लंकेहून त्याने बाजरीचे बी आणि मोडी लिपी आणली. हेमाडपंडिताने अनेक सुधारणा, राज्यात घडवून


आणल्या. सर्व दूर पसरलेल्या साम्राज्यातील पत्रव्यवहार झपाट्याने व्हावा यासाठी देवनागरी लिपीत सुधारणा करून त्याने मोडी लिपी तयार केली असावी असे मानण्यास हरकत नाही. तथापि हेमाडपंडिताने ही लिपी लंकेतून आणली हे लिपीकार वाकणकर यांना मान्य नाही. ते १९८० (श १९०२) मध्ये श्रीलंकेत गेले होते. त्यावेळी त्यांनी कोलंबोच्या सरकारी छापखान्यात सिंहली अक्षरांना गणकयंत्रात बसविण्याच्या दृष्टीने अभ्यास केला पण तेव्हा त्यांना सिंहला व मोडी लिपीत काहीही साम्य दिसून आले नाही. 'मौर्य' या शब्दाचा 'मोडी' हा अपभ्रंश ते अमान्य करतात कारण मौर्यराज्य काळी मोडीच्या जन्माचीही शक्यता नव्हती. देवनागरीत जो काना वरून खाली काढतात, तो शेवटी लेखनाचा वेग वाढविण्यासाठी खालून वर नेण्याच्या प्रयत्नाने मोडी वळण निर्माण झाले व ही घटना हेमाडपंडिताच्या कारकीर्दीत घडणे शक्य आहे.

अनेक लिप्यात दोन शैली असल्याचे दिसते. एक सुवाच्य लेखनासाठी आणि दुसरी जलद लिहिण्यासाठी. तेव्हा मोडी ही देवनागरीची जलद लिपी मानण्यास हरकत नाही. पर्शियन भाषेत 'शिकिस्ता' नावाची एक जलद लिपी रूढ आहे. तिच्यावरून हेमाडपंडिताला ही कल्पना सुचली असणे शक्य आहे असे मत कै. राजवाडे यांनी व्यक्त केले आहे.

शिवाजीमहाराजांचा प्रख्यात चिटणीस बाळाजी आवजी याचेही नाव या संदर्भात घेतले जाते. तथापि बाळाजी आवजीच्या पूर्वीचे हजारो मोडी कागद उपलब्ध असल्याने वरील मतात काही तथ्यांश दिसत नाही. कदाचित बाळाजी आवजीने मोडी लिपीत काही बदल करून तिला अधिक वळणदार स्वरूप देण्याचा प्रयत्न केला असणे शक्य आहे.

देवनागरी आणि मोडी लिपीचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर लिपीतज्ञ श्री. ल. श्री. वाकणकर यांचे आज असे स्पष्ट मत झालेले आहे की मोडी लिपीचा उगम इतर कुठल्याही लिपीतून झालेला नसून तो खुद्द देवनागरी लिपीतच आहे. मोडी लिपी ही देवनागरीची जलद लिपी मानली पाहिजे.

**मोडी लिपीचे उद्दिष्ट**-बालबोध अक्षरे सुटी सुटी लिहावी लागतात. एकच अक्षर लिहिताना लेखणी वारंवार उचलावी लागते. साहजिकच त्यामुळे लेखनाचा वेग मंदावतो. त्याचप्रमाणे अक्षरावर दिली जाणारी रेघ, काना, मात्रा, वेलांटी, विरामचिन्हे ही सुध्दा द्यावी लागतात. त्यामुळे जलद लिखाणासाठी मोडीचा वापर सुरू झाला असे मानले पाहिजे. मोडी लिपीतील सर्वात जुना उपलब्ध असलेला कागद इ. १३८९ (श. १३११) मधील असून तो भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात उपलब्ध आहे.



देवनागरीतील पौ हे अक्षर लिहिताना एकूण सहा वेळा लेखणी उचलावी लागते. पण हेच अक्षर मोडीत लिहीत असताना केवळ दोनच वेळा लेखणी उचलावी लागते. सबंध शिरोरेषा एकदम काढल्यावर तर लेखणी दुसऱ्यांदा उचलावीच लागत नाही.

यादव कालात सरकार-दरबारी मोडी लिंपीला स्थान मिळाल्यामुळे साहजिकच तिचा प्रसार राज्याच्या कानाकोपऱ्यांत झपाट्याने होऊ शकला. ही लिपी जनमानसात इतकी रुजली की पुढे अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडे येथील मुसलमान राज्यकर्तेही आपली फर्माने, हुकूमनामे, निवाडपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे लिहिताना मोडीचा अवलंब करीत.

**विविध वळणे व लेखनसाहित्य**

कालानुसार मोडी लिपीचे शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन असे ढोबळ विभाग पाडता येतील. तुलनेने पेशवाईतील मोडी अक्षर अत्यंत घोटीव, लपेटीदार आणि वाचनीय असे आढळून येते. वळणाच्या दृष्टीने **चिटणिसी, महादेवपंती, बिवलकरी** आणि **रानडी** वळण असे प्रकार आढळून आले आहेत. सुमारे तेराव्या शतकापासून २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत मोडी लिपी लोकप्रचारात कायम राहिली आहे.

लेखनासाठी सामान्यतः बोरूचा वापर करीत असत. बोरू म्हणजे ७-८ इंची लांब बांबूचा तुकडा. त्याच्या टोकाला तिरपा छेद देऊन त्याची लेखणी तयार करीत. पुढे अव्वल इंग्रजी काळात या बोरूची जागा टाकाने घेतली. बोरूने लेखन करताना, एक अक्षर काढतानाही तो वारंवार दौतीत बुडवावा लागत असे. पण टाकाच्या वापरापासून त्याच्या निफामध्ये जास्त शाई घेतली जात असल्याने साहजिकच लेखनाचा वेग वाढला. बोरूने लिहिलेला मजकूर आकाराने मोठा, स्पष्ट आणि त्याचे वाचन सुलभ असे. पण टाकाने लिहिलेला मजकूर अधिक लपेटीदार, आकाराने लहान व वाचनास क्लिष्ट असतो. त्यात इंग्रजी शब्दांचा भरणा असल्याने अपभ्रष्ट रूपांचा मजकूर वाचनास अतिशय कठीण समजला जातो. अशा स्वरूपाचे लेखन हल्ली केवळ कोर्टात हजर करावयाच्या पुराव्याच्या दस्तऐवजावरच पाहायास मिळते.लेखन साहित्यापैकी बोरू, टाक आणि पेन यांनी लिहिलेला मोडी मजकूर या ग्रंथात इतरत्र नमुनापत्र संग्रहात पाहावयास मिळेल.

इंग्रजी अंमलात काही काळ मोडी व इंग्रजी असे संयुक्त लिहिले जात असे. इंग्रजी प्रशासनात इंग्रजीचा प्रसार जसजसा वाढत गेला तसतसे उच्चभ्रू, सुशिक्षित लोक आपले लिखाण मोडीऐवजी इंग्रजीत करणे प्रतिष्ठेचे मानू लागले व हळूहळू मोडी लिपीचा अस्त होऊ लागला.

मोडी लिपी चालू ठेवावी, न ठेवावी याबद्दल बरीच चर्चा १९१८ (श. १८४०) च्या सुमारास महाराष्ट्रात चालू होती. ती ४-५ वेळा रद्दही करण्यात आली पण बरीच रदबदली करुन कायदेकौन्सिलात तसा ठराव होऊन मोडी लिपीस पुन्हा राजमान्यता प्राप्त झाली.


**इंग्रजी अंमलातील पाठ्यपुस्तक निर्मिती**

काही काळ प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मोडी शिकावे लागे. त्यांना १ ते ७ या क्रमाने अवघड होत जाणाऱ्या वाचनमालिका अभ्यासक्रमात असत. आता त्या केवळ दुर्मिळ ग्रंथ म्हणून समजल्या जातात. पुढे मात्र मोडी विषय ऐच्छिक ठेवण्यात आला होता. ट्रेनिंग कॉलेजमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यास निबंध मोडीत लिहावा लागत असे. कोर्ट दरबारात

मोडीचे महत्त्व टिकून होते. पुढे १९५९ (श. १८८१) साली खेर मंत्रिमंडळाने मोडी लिपीस अनावश्यक ठरविले. शालेय अभ्यासक्रमातून ती काढून टाकण्यात आली. मोडी लिपीचा परिचय नव्या पिढीस होण्याचा मार्ग यामुळे बंद झाला.

**मोडी लिपीचा मुद्रण कलेत प्रवेश**-मोडी लेखन वाचनाचा अभ्यासक्रम शालेय विद्यार्थ्यांना इ. १८७७ (श. १७९९) मध्ये १ ली ते ७ पर्यंत शिकविला जाई. इ.१८७७ (श. १७९९) ची मोडी लेखन वाचनमाला रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांनी केलेली आढळते. तेव्हापासून इ. १९५५ (श. १८७७) पर्यंत अशा वाचनमाला शाळा खात्यातून चालू होत्या असे ध्यानात येते. त्यांत कै. म.का कारखानीस , गो. ग. नित्सुरे, ना.के. बेहेरे, ओ. न. वानखेडे, अ. वा. मराठे, कृ. भा. बाबर, कृ. य. गोखले, ए.जी. कदम, ए. के. कुलकर्णी, वा.के. पुराणिक, सा. ब. पाटील, शि.स. शिर्के, भा. गो. जोशी, इ. ची संपादक म्हणून नावे आहेत. सुबोध वाचनमाला, मोडी लेखन वाचनमाला इ. नावांनी त्या प्रसिध्द होत होत्या. मोडक, य.ग.फके, वाडेकर यांच्या वाचनमाला तर विशेष प्रचलित होत्या. 'बॉम्बे कुरियर' या मुंबईत प्रसिद्ध होणाऱ्या इंग्रजी वृत्तपत्रात इ. १७९७ (श. १७१९) मध्ये गुजराथी आणि इ. १८०२ (श. १७२४) मध्ये मोडी जाहिराती प्रसिद्ध केल्या. सर चार्लस् विल्किन्स (इ. १७४९ - १८०६-श. १६७१ ते १७२८) हा कलकत्त्यात ईस्ट इंडिया कंपनीचा प्रथम रायटर मग ज्युनिअर मर्चंट, नंतर सिनीयर मर्चंट झाला होता (इ. १७७०-१७८६). कंपनीचा मुख्य मुद्रक म्हणूनही त्याने काम केले. तो भारतीय भाषा, संस्कृतीचा गाढा अभ्यासक होता अनेक भारतीय भाषांचा त्याने मुद्रण शास्त्राच्या दृष्टीने तुलनात्मक अभ्यास केला होता. (इ. १८०१-१८३६) (श. १७२३ ते १७५८) या काळात तो इंडिया ऑफिस लायब्ररीचा ग्रंथपाल होता. भारतात येणाऱ्या सनदी नोकरांना भारतीय भाषा-संस्कृतीची सर्वांगीण ओळख करून देण्यासाठी त्याने अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यात भगवद्‌गीता, संस्कृत व्याकरण, रिचर्डसनचा फार्सी-अरबी इंग्रजी शब्दकोश महाराज कृष्णचंद्र रहस्यचरितम्, हितोपदेशाचे इंग्रजी भाषांतर, विल्यम कॅरेचे मराठी व्याकरण इ. ग्रंथांचा समावेश आहे. याशिवाय त्याने बंगाली, गुजराती, मराठी पंचागेही प्रसिद्ध केली. इंडिया ऑफिस लायब्ररी लंडन येथे त्याच्या ३ लाकडी पेट्या सापडल्या. त्यात मोडी मुळाक्षरांच्या मुद्रा आढळल्या आहेत. त्याने प्रथम ट्रेसिंग कागदावर पेन्सिलीने मोडी मुळाक्षरे काढली. नंतर ती पोलादी खिळयांच्या डोक्यावर उतरवून, कोरकाने (पंच) तयार केले आणि त्यांच्या तुकड्यावर 'मातृका' ठोकल्या त्यावरुन शिश्याचे टाईप (मुद्रा) तयार केले. या मोडी अक्षराचे वळण अतीव सुंदर आहे. संदर्भ-

(CALTIS-85, pp 57-60 Discovery of three wodden boxes belonging to Sir, Charles Wilkins (1749-1836) at India Office Library, Bombay. Prof. Trilokesh Mukherjee.)




विल्किन्स च्या पंच

याचप्रमाणे विल्यम कॅरे या ब्रिटिश मिशनऱ्याने इ.स. १९०५ (श. १८२७) मध्ये श्रीरामपूर (बंगाल) मध्ये मोडी टाईप तयार करुन, The Grammer of Mahratta Language (मराठी मजकूर मोडीत), रघूजी भोसल्यांची वंशावळ, मराठी भाषेचे व्याकरण,

मराठी भाषेचा कोश, नवा करार इ. पुस्तके छापली असल्याचा उल्लेख सापडतो. ही गोष्ट टंकतंत्रात ऐतिहासिक महत्त्वाची आहे, कारण मोडी अक्षरांचे फाटे एकमेकांच्या क्षेत्रात घुसत असल्याने त्यांचे टंक बनविणे अवघड आहे.

**मोडी वाचनातील संभाव्य अडचणी -**

मोडी लिपीचा वापर प्रामुख्याने जलद लिखाणासाठी सुरू झाला हे आपण पाहिले. जलद लिखाणासाठी अक्षरे आणि शब्द एकमेकांना जोडून, न तोडता लिहिणे हे ओघानेच आले. तसेच प्रत्येक अक्षराला स्वतंत्र शिरोरेषा काढत बसण्याऐवजी कागदाच्या रूंदी एवढी सलग रेषा काढून तिच्याखाली मोडी अक्षरे लिहिली जातात. कोणत्याही अक्षराचा शेवट किंवा प्रारंभ या रेषेवरुन केला जातो. काना,मात्रा, वेलांटी याही अक्षराच्या लपेटीतच जोडलेल्या असतात. तसेच मोडी अक्षरे कोणत्या प्रकारे काढावीत यासंबंधी स्पष्ट संकेत नसल्याने प्रत्येक व्यक्तीगणिक अक्षराची लपेट अस्तित्वात येऊ शकते. या सर्व गोष्टींमुळे मोडी वाचनात अनेक अडचणी निर्माण होतात. लिहिलेल्या मजकुरातील शब्द कोठे तोडावयाचा हे ठरविणे नवख्या वाचकाला जड जाते. उदा.


**रस्त्यात नाच तमासे चालले होते.**

**रस्त्यात नाचत मासे चालले होते.**

मराठी भाषेची, विशेषतः ऐतिहासिक भाषेची तोंडओळख असणे त्यासाठी जरुरीचे आहे. मराठ्यांचे राज्य कर्नाटक, गोवे, आन्ध्र, ओरिसा, बंगाल, बुंदेलखंड, राजस्थान, गुजरात इ. प्रांतातून पसरलेले असल्याने स्थानिक भाषेचाही प्रभाव मोडी लिपीवर पडून ती अधिक दुर्बोध झाल्याचे दिसून येते. अर्थात संदर्भ लक्षात ठेवून सरावानेच लिपीच्या वाचनात प्रगती करता येते.

**मोडी मुळाक्षरे व बाराखड्या**

पृ. क्रमांक ६, ७, व ८ वर दिल्या आहेत.



क
ख
ग
घ
ङ
च
छ
ज
झ
ञ
ट
ठ
ड
ढ
ण
त
थ
द



ध
न
प
फ
ब
भ
म
य
र
ल
व
श
ष
स
ह
ळ
क्ष
ज्ञ




## मोडी लिपीतील ऱ्हस्व दीर्घ व्यवस्था

भाषाशुद्धीचा आग्रह धरणाऱ्यांच्या दृष्टीने मोडीतील मुख्य दोष म्हणजे त्यात इकार, उकार, वेलांट्या लिहिताना ऱ्हस्व-दीर्घ भेद केला जात नाही. सर्व उकार, वेलांट्या दीर्घच दिल्या जातात. त्यातून अर्थाचा अनर्थही निघू शकतो. हा आक्षेप योग्यही आहे. मोडी लिपीतील हा दोष काढून ती लेखनाला, वाचनाला कशी सुकर बनविता येईल यासंबंधीचा विचार इसवी १८६२ (श. १७८४) पासून निरनिराळ्या मासिकातून मांडला जाऊ लागला. शब्द कोठे संपला हे सहज समजण्यासाठी बालबोधीप्रमाणे शब्द तोडून लिहिण्याची पद्धती स्वीकारून वाचनमाला प्रसिद्ध करण्यात आल्या. आवश्यक ती विरामचिन्हे स्वीकारल्यामुळे लेखनाचा वेग किंचित मंदावला; तरी नवख्या वाचकाला ही पद्धत उपकारकच ठरली. ऱ्हस्व-दीर्घ व्यवस्थेबाबत मात्र एकमत होऊ शकले नाही. विद्वानांनी मांडलेल्या प्रस्तावात मिरजेचे गोगटे, पारनेरचे अत्रे व माढ्याचे पु.ना. वर्तक यांचे प्रस्ताव विचारात घेण्याजोगे आहेत.


**श्री. गोगटे यांचा प्रस्ताव** - मोडी लिपीत इकार व उकार काढण्याची जी रूढ पद्धती आहे ती ऱ्हस्व खूण समजावी आणि दीर्घ करण्यासाठी त्यालाच आणखी एक गाठ काढावी.
जसे-

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| इ | ई | उ | ऊ | कि | की | कु |
| कू | गी | गी | लु | लू | सि | सी |



**श्री अत्रे यांचा प्रस्ताव -** इकार अथवा उकार दीर्घ काढताना त्यात एका रफाराची भर घालावी व उकार दीर्घ काढताना मूळ उकारात एक गाठ वाढवावी. जसे-


- इ ई उ ऊ कि की
- कु कू लि ली लु लू



**श्री वर्तक यांचा प्रस्ताव** - मोडी लिपीतील रूढ इकार, उकार हे सर्व ऱ्हस्व समजावे. दीर्घ इकार उकार-काढताना शेवटचे टोक आतल्या बाजूस वळवून परत वर न्यावे.

जसे-

- इ ई उ ऊ दि दी
- दु दू धि धी धु धू



याप्रमाणे ऱ्हस्व-दीर्घ व्यवस्था सुचविण्याचे प्रयत्न झाले आहेत.

**काना, मात्रा, जोडाक्षरे इ. संबंधीची वैशिष्ट्ये**


बरीचशी मोडी अक्षरे, देवनागरीतील काना खाली वर नेला म्हणजे तयार होतात

जसे क ख च छ ज ट ठ थ द ध न प फ ब भ म य र ल व स ह



मोडी मध्ये खालील अक्षरे देवनागरी प्रमाणेच लिहिली जातात

जसे- ग घ ङ च छ झ ञ ड ढ ण त र ष स ळ क्ष



काना-बालबोधीप्रमाणे असा ा आणि मोडीप्रमाणे ४ असाही दिला जातो.


उदा (या) (पा) (दा) (ला)

(बा) (वा) (रा) (सा)



मात्रा - बालबोधीप्रमाणे े, ो व मोडीप्रमाणे े ो [ ] अशी दिली जाते.

उदा -पैसे दोन ओठ पौरजन रोज



वेलांटी - अक्षरानंतर वेलांटी [ ] याप्रमाणे दिली जाते.

उदा डी ची नी जी



उकार - अक्षरानंतर [ ] ही खूण जोडली जाते.

जु, नु धु फु



'कु'चे लेखन मात्र अगोदर उकार नंतर क  असे केले जाते.

बऱ्याच वेळा एकच मोडी अक्षर दोन वेगळ्या रीतीने लिहिले जाते. ती अक्षरे पुढीलप्रमाणे आहेत.

(च)

(गु)

(डी)

(स)


(धु) धु

(जु)

(थु) थु


(ख)

(ली)



मद्रास येथे असलेल्या सरकारी हस्तलिखित ग्रंथालयात (Govt. Mss. Library, University of Madras Campus, Madras) काही मराठी ग्रंथ मोडी लिपीत लिहिलेले आहेत. त्यात काही हस्तलिखितात दीर्घाची खूण म्हणून इकारी/उकारी अक्षरांपुढे चालू ओळीतच एक टिंब देण्याची पद्धत आढळते. अशा हस्तलिखितांतील पानाचा नमुना जिज्ञासूंना 'महाराष्ट्र-प्रयोग-चंद्रिका' (संपा. कृ. श्री. अर्जुनवाडकर, प्रकाशक-देशमुख आणि कंपनी पुणे, १९७०) या ग्रंथात पाहावयास मिळेल. उदाहरणार्थ,

फूल
वीट




साम्य असलेली अक्षरे


आ वा बा ख थ द ह





- ई प ज न ल ळा क
- म य स य सा ण




**जोडाक्षरांची जुळणी** - मोडी लिपीत जोडाक्षरांची जुळणी तीन प्रकारांनी केलेली आढळते.
(१) या प्रकारात बालबोधीप्रमाणे पहिले अक्षर अर्धे लिहून दुसरे अक्षर पूर्ण लिहिले जाते.
उदा.- स्य स्न त्य वगैरे
२) या प्रकारात एकाखाली किंवा पुढे दुसरे अक्षर लिहितात.
उदा. -


सूर्य 


चंद्र 


लक्ष्मी 

बुद्धी 


३) तिसऱ्या प्रकारात पूर्णपणे नवीनच चिन्ह येते. उदा.-


ज्ञान 

कष्ट 

कृपा 

कत्येक वेळा जोडाक्षर न लिहिता ते शब्द तसेच लिहिले जातात. जसे -


दिल्हे -  दिलहे

नमस्कार -  नमसकार

**बाराखड्यातील कठीण अक्षरे :-**

सामान्यतः प्रत्येक अक्षराचे उकारचिन्ह, गिरविण्यास व लक्षात ठेवण्यास कठीण समजले जाते. तर काही अक्षरे प्रत्यक्ष लिखाणात वेगळ्याच प्रकारे लिहिली जातात. जसजसे मोडी कागदपत्रांचे वाचन वाढत जाईल तसतसे हे सर्व प्रकार जिज्ञासूंना पाहावयास मिळू शकतील. त्यापैकी काही नमुन्यादाखल खाली क्रमाने दिले आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| * | कु | खु | खु | गु | तु |
| * | दु | सु | हु | दा | सा |
| * | जु | लु | मु | ली | |



## लपेटीयुक्त लेखन पद्धती

यापूर्वी सांगितल्याप्रमाणे मोडी लिखाणाचा मूळ हेतू जलद लेखन करणे हा आहे. बालबोधीप्रमाणे प्रत्येक अक्षर हात उचलून स्वतंत्रपणे न लिहिता एका अक्षराची रेघ दुसऱ्या अक्षराला जोडून लिखाणाला अपेक्षित गती दिली जाते. अशा पद्धतीने कागदाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत शब्द न तोडता लिहिले जातात. त्याला लपेटीयुक्त लिखाण म्हणता येईल. यात शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन असे लपेटीवरुन तीन भाग पाडता येतील. शिवकालीन हस्ताक्षरे अथवा मजकूर अधिक लपेटीदार व गुंतागुंतीचा असल्याने सराईत वाचकालाही विचार करण्यास लावणारा असतो. याउलट पेशवाईतील हस्ताक्षर हे लपेटीयुक्त असले तरी सुबोध व सुवाच्य वाटते. पुन्हा २० व्या शतकांतील मोडी हस्ताक्षर इंग्रजी भाषेच्या प्रभावामुळे आणि पेन व टाकाने लिहिलेले असल्याने अधिक दुर्बोध होते.


















लपेटीदार लिखाणामुळे अक्षर जुळणीत इतके स्वातंत्र्य असते की, व्यक्तिनुसार नवीन

लेखनपद्धती अस्तित्वात येऊ शकते. ग्रामनामे, व्यक्तिनामे यांचे वाचन करताना तो कागद ज्या भौगोलिक विभागातील असेल, त्या भागाची वाचकाला जेवढी जास्त माहिती असेल तेवढ्या प्रमाणांत मोडी वाचन अचूक होईल. उदा. कर्नाटकातील सनद असेल, तर वाचकाला कानडी ग्रामनामे, व्यक्तिनामे, स्थानिक व्यवसाय माहीत असणे अत्यंत जरुर आहे. अन्यथा मोडीअक्षराच्या सारखेपणामुळे वाचनात हमखास चूक होऊ शकते किंवा त्याचा पूर्ण अर्थबोध होत नाही. उदा.- हळेबीड, गोवनकोप, चिकनहदली, बनेवाडी, देवणगौडा, शिदनाक, हुकेरी, नेकनहटी, हिपरगी या शब्दांचे वाचन अनुक्रमे दळेबीड, गोवनलोद, चिलानदहली, बानेवाडी, हेबनगोडा, शिदनाला, मुकेरी किंवा दुकेरी, नेलानदरी, दिहरगी असेही होऊ शकेल. महसूलविषयक कागद असतील तर रकमाला, बेहडा, चकनामा, मुचलका, खूर्द, बुद्रूक, मोकदम, सोळुले, बारूले, चाहूर, पाड, मार (जमीन मोजण्याचे परिमाण) कटबंदी, हडकी, वतनी, हक्कांचे विविधप्रकार वाचकास ऐकून ठाऊक असणे जरूर आहे. तरच त्याचे वाचन अचूक होऊ शकेल.

हिशेबी कागद असतील तर आवर्जे, पोता, बटा, वरात, रवासुदगी, खूर्दा, मुशाहिरा, साहोत्रा, एकोत्रा, दसमाही, दीडमाही, ह्या शब्दांचा संबंधितास परिचय असला पाहिजे. न्यायालयीन कागद असतील तर मजालिस, गोत, बलुतेदारांची व्यवसायदर्शक चिन्हे किंवा निशाण्या वाचनात असल्या पाहिजेत.

मोडी शब्द वाचताना तो कोठे तोडला असता अर्थपूर्ण शब्द तयार होईल हे लक्षात येण्यासाठी वाचत असलेला कागद कोणत्या प्रकारचा, कशाबद्दल आहे हे लक्षात न घेतले तर एका शब्दाचे अनेक प्रकारचे चुकीचे वाचन होऊ शकते. लपेटीयुक्त लेखन पद्धतीमुळे मोडी वाचन आज दुर्बोध वाटत असले तरी ते दिसण्यात अत्यंत सुंदर व ऐटबाज असल्याने तसे लेखन करण्याचा शिष्टसंमत रिवाज असावा.

लपेटीयुक्त लेखन पद्धतीचे काही नमुने पुढील पानावर दिले आहेत-

| बालबोधी | मोडी | लपेटीयुक्त |
|---|---|---|
| चमत्कार |  |  |
| सरकारी |  |  |
| देशपांडे |  |  |
| करमरकर |  |  |
| अखंडित |  |  |
| कमावीसदार |  |  |
| परिचय |  |  |
| जहाली |  |  |
| पैकी |  |  |
| देसाई |  |  |

**लेखनवाचन सराव :-**

आतापर्यंत आपण मोडी लिपी व बाराखड्यांचा अभ्यास केला. त्या आधारे मराठीतील सोपे शब्द मोडी लिपीत लिहिणे शक्य आहे. अशा शब्दांचा सराव पाच प्रकारांनी अधिक सोयीचा होतो. त्या प्रत्येक प्रकारात जे शब्द दिले आहेत ते, बाराखड्या पूर्ण घटविल्यानंतर लिहिता येतील. अभ्यासकाने ही लिपी कितपत आत्मसात झाली आहे ते ताडून पाहावे.

**सोपे शब्द**

कमळ, बदक, सरकस, सरस, तलवार, झटपट, पसर, तरट, चटई, दऊत, अभय, अक्षय, गवत, फणस, खंदक, धन, खळ, अटकळ, सळई, वणवण, बलवंत, डमरु, हरण, शरण, शरद, जगन, अरुण, टकमक, चमक, रथ, नथ, भरत, मयत, चरक,

**कान्याचे शब्द**

हात, पाय, ताक, काका, मामा, ताई, दादा, बाबा, छान, साथ. साय, गाय, नारळ, कातर, दानव, नाच, साकव, कागद, पाव, तालावर, गवगवा, कानस, चाफळ, राधाबाई, कालवड, धाकटा, ताराबाई, गायकवाड, सारवण, मशाल, फाया, साल, माया.

**काना-मात्र्याचे शब्द**

तेजबहादर, तालेवार, तोलदार, पेनशन, लगोरी, केरुनाना, नारायण, रातोरात, बेरात, इटेकर, पेशवा, यजमान, केवळ, पेंढार, खेडवळ, घोडा, चेन, चैत्र, जेवण, ढेप, झोप, देकार, देमार, सेना, गोणपाट, तालेवार, कोंडदेव, देशोदेश, चोपदार, कैकयी, वेदोनारायण, भोसले, कौरव, लौकर, दौरा, हौस, पैठण, भैरव, चोरीदार, औषध.

**उकाराचे शब्द**

हनुमंत, वसुल, तुमान, हुरमत, रुकसत, सुरवात, सुलेमान, जुमला, झूंज, नूर, बुरुड, बुणगे, फुगा, मुरुड, भुंगा, यमुना, खुळखुळा, मुहमद, हुकुमत, दूरदूर, गुलाब, लसूण, पुणतांबे.

**वेलांटीचे शब्द :-**


गिरीजा, छावणी, शिरपेच, राजश्री, श्रीरंग, रिकामा, पितळी, लोखंडी, शनिवार, लिमये, विठोबा, शिवाजी, खिळखिळा, बिनीवाला, सिमगा, सीमा, किमया, खिजमतगार, चिमणी, जिलबी, झीलमील, टिमटिम, रिमझिम, हिरवळ.

**जोडाक्षरे :-**

त्याने, दिल्हे, प्रमाणे, कृपा, ज्ञान, चंद्र, सूर्य, बुद्धी, प्रकाश, तपस्वी, देशभक्त, श्री, हस्तेबंदी, वख्त, नख्त, फर्मान, इंग्रजी, खर्ची, जप्त, दिल्ली, किल्ला, सर्ज्याराव, मल्हारी, अन्वये, कमज्यास्त, चिल्लर.

**मोडी उताऱ्यासह खाली प्रत्येकी बालबोधी उतारे दिले आहेत.**


१



**१. माझा हिरवा मित्र**

घरात पाळलेले पशू किंवा पक्षी काही दिवसांनी घरातील माणसासारखेच होतात. ती माणसं नाहीत हे आपण जवळजवळ विसरुन जातो. फार काय माणसापेक्षाही ते आपल्याला जवळचे वाटतात. माणसातली माणुसकी त्यांच्यात भरपूर असते. आणि माणसातील हेवे दावे, दुष्टावे, आप्पलपोटेपणा मात्र त्यांच्यात मुळीच नसतो. पोपट म्हटले की माझे अंतःकरण निर्मळ आठवणींनी आणि कृतज्ञतेने भरून जाते.


२



**२. कोयना नदी**

कोयना नदीचे नाव कोयना वीज प्रकल्पामुळे सर्वांना माहीत झाले आहे. देशमुखवाडी येथे तिला धरण बांधून पाणी अडविले आहे. त्याला 'शिवसागर' असे नाव देण्यात आले असून हा सर्व परिसर रम्य वनश्रीने नटलेला आहे. कोयना प्रकल्पामुळे हजारो लोकांना रोजगार मिळून महाराष्ट्राचे जणू नंदनवनच झाले आहे.

३



**३. बीज असे पेरले गेले-चंदू बोर्डे**

आम्हा मुलांसाठी खेळणी विकत घेणे माझ्या वडिलांना शक्यच नव्हते; तरी आम्ही मुले जळणासाठी आणलेली लाकडे बॅट, स्टंप यासाठी वापरत असू. शाळा सुटली रे सुटली की मी क्रीडांगणावर हजर होत असे. सर्व खेळात मला क्रिकेट या खेळाची भुरळ जास्त पडली. इतर खेळाडू आलेले नसले की मला चेंडू फेकायला बोलावत. त्याचा मी फायदा घेऊन जोराने चेंडू टाकीत असे. मला उत्तेजन देण्यासाठी ते आऊट होत. सराव संपल्यावर त्यांची अनेक कामे मी हौसेने करीत असे. पुढच्या आयुष्यात क्रिकेटपटू होण्याची खूणगाठ मी इथेच मनाशी बांधली.

४

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]



४. एक अविस्मरणीय लिलाव

तो दिवस आजही माझ्या मन:पटलावर कोरलेला आहे. रंगून येथे नेताजींनी भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला. त्याप्रसंगी मोठी सभा झाली. दूरदूरहून हजारो लोक या सभेला आले होते. सभेच्या आरंभी नेताजींना अनेक हार घालण्यात आले. त्यानंतर त्यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले. ते ऐकताना श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. लोक भारतमातेचा जयजयकार करू लागले. मग नेताजी एक हार हातात घेऊन उभे राहिले व म्हणाले, "भारताच्या आझादीसाठी आपल्या सेनेला पैशाची फार जरूरी आहे. मग बोला हा हार केवढ्याला घेणार ? " सभेत लिलाव सुरू झाला. बोली चढू लागली. अेका शीख युवकाने तो हार जणू वाटेल त्या किमतीला घेण्याचे ठरविले होते. पांच लक्ष डॉलर्सवर बोली आली असताना तो एकदम पुढे झाला आणि म्हणाला की माझी सर्व संपत्ती देतो पण हा हार मला पाहिजेच. कोणी सुचविले काही संपत्ती स्वत:साठी राखून ठेव तेव्हा तो तरुण म्हणाला , "मी आता नेताजींच्या आझाद हिंद सेनेत दाखल होणार आहे. मला या संपत्तीची काय जरूर ?"


५



**५. श्री शिवराय**

शिवाजीमहाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हते तर ते साऱ्या राष्ट्राचे होते. त्यांनी थोर तत्ववेत्त्यांच्या शिकवणुकीतून स्फूर्ती घेतली होती. वैयक्तिक महत्वाकांक्षेतून केवळ स्वत:साठी राज्य स्थापन करण्याची त्यांना इच्छा नव्हती . तत्कालीन राज्य पद्धतींच्या गुणावगुणांचा त्यांनी अभ्यास केला आणि त्यातून आपले विशिष्ट ध्येय धोरण व राज्यव्यवस्था यांची आखणी केली.

६




**६. प्रतिज्ञा**

भारत माझा देश आहे.सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन. मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन. माझे देशबांधव आणि माझा देश यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.

७

७ [illegible]

[illegible]



**७. महाराष्ट्राची व्यावहारिक लिपी**

आपण महाराष्ट्रीय लोक रोज जे लेखन वाचन करीत आहो ते देवनागरी ह्या नावाच्या लिपीतील आहे, हे कदाचित् तुमच्यापैकी काहींना माहीत नसेल. तुम्ही बालबोध म्हणून ज्या लिपीला नाव देता तीच देवनागरी लिपी आहे.

आपण रोज वाचतो ती वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके आणि इतर कागदपत्रे ह्या देवनागरी लिपीतच छापलेली असतात. तुम्ही शाळेत जे लिखाण करता ते किंवा बाहेर जो पत्रव्यवहार करता तो ह्या देवनागरी लिपीतच असतो.

आपल्या प्रांतात ही लिपी सुरू होऊन बाराशे तेराशे वर्षाचा काल होऊन गेला आहे. ही आपली बालबोध लिपी सुरू झाल्यानंतर काही काळाने आपल्या प्रांतातील शहाण्या लोकांनी ही रोजच्या व्यवहाराला अधिक उपयोगी पडावी म्हणून तिच्यात थोडी सुधारणा केली, तिच्या अक्षरांना थोडे वेगळे वळण दिले, ती हीच मोडी लिपी होय.

आतापर्यंत ही मोडी लिपी तुम्ही वाचीत व लिहीत आला, त्यावरून तुमच्या लक्षात आले असेल की, ह्या लिपीने अधिक जलद लिहीता येते. पत्रव्यवहाराला आणि जमाखर्च लिहिण्यास ही लिपी फारच सोयीची आहे, म्हणून हिला महाराष्ट्राची व्यावहारिक लिपी म्हणणे योग्य होईल.

मुसलमान लोकांचा प्रवेश दक्षिणेत होण्यापूर्वी इकडे यादव राजांचे राज्य चालू असता महाराष्ट्रात मोडी लिपी सुरू होती. यादवांचा प्रधान हेमाडपंत म्हणून एक विद्वान गृहस्थ होता. त्याने ह्या लिपीला अधिक चालना दिली. ह्या हेमाडपंतांची आठवण म्हणून जशी महादेवाची दगडी देवळे आजही आापण खेडोपाडी दाखवितो तशी त्याची स्मृती ह्या मोडी लिपीने जागृत ठेविली आहे.


महाराष्ट्रामध्ये मराठ्यांचे राज्य पुन्हा सुरू झाल्यावर तर ह्या मोडी लिपीचे महत्त्व अधिकच वाढले. त्या काळातील राजकीय व खाजगी पत्रव्यवहार, सनदा, निवाडपत्रे व लोकव्यवहाराची टिपणे ही सारी मोडी लिपीतच लिहिलेली आढळतील. आपल्या वाडवडिलांचे त्या काळचे जीवन आपणास जवळून पाहावयाचे असेल तर मोडी वाचता आलेच पाहिजे.

महाराष्ट्राच्या ह्या व्यावहारिक लिपीला इंग्रजी अमलात उतरती कळा लागली. बऱ्याच इंग्रजी अधिकाऱ्यांना ती अवघड वाटावयास लागली आणि त्याहीपेक्षा इंग्रजी शिकलेल्या आपल्या देशी लोकांनाच तिचा जाच वाटू लागला. त्यांना आपली मायबोली मराठीच जेथे परकी वाटू लागली तेथे तिचे मोडी हे मुद्दाम बनविलेले व्यावहारिक लिपीचे रूप परके दिसल्यास नवल काय ?

अशाही स्थितीत गेल्या पंचवीस तीस वर्षापूर्वीपर्यंत मोडी लिपीचे महत्त्व टिकून होते. मराठी शाळांतील शेवटच्या परीक्षेत मोडी कागद वाचून घेत व मोडी हस्ताक्षरात निबंधही लिहून घेत. त्यानंतर मात्र मोडी लिपीला अभ्यासक्रमातून अर्धचंद्र मिळाला! तथापी सध्याच्या सरकारने वैकल्पिकरीत्या का होईना तिचा प्रवेश अभ्यासक्रमात करून दिलेला आहे. सध्या इयत्ता तिसरीपासून सातवीपर्यंत मोडी पुस्तकाचे वाचन मराठी शाळांतून ह्यामुळेच होत आहे.

महाराष्ट्राच्या ह्या व्यावहारिक लिपीकडे अजूनही विद्यमान लोकांचे लक्ष चांगल्या प्रकारे जाईल तर वाडवडिलांनी सुधारून घडविलेली ही आपली मोडी लिपी आापल्या दैनंदिन गरजा भागविण्यास उत्तम प्रकारे उपयोगी पडेल व आपल्या पूर्वजांच्या इतिहासाशी आपला संबंध चांगल्या रीतीने अबाधित राहील.

८




**८ चिटणीसी अक्षराचा नमुना**

(चिटणीसी अक्षर हे मराठेशाहीत उत्तम मोडी अक्षर म्हणून मानले जात असे. खालील मजकूर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले बंधू व्यंकोजी राजे यांना लिहिलेल्या पत्रातील आहे. महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी हे पत्र लिहिलेले आहे.)

श्री महादेव श्री तुळजाभवानी श्री सहस्त्रायू चिरंजीव अखंडित लक्ष्मी आलंकृत राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री येकोजी राजे प्रती राजश्री शिवाजीराजे आसिर्वाद येथिल क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे उपरी कैलासवासी साहेबी कैलासवास केला त्यास अजी तेरा वर्षे जाली माहाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलूक अवघे ही राजश्री रघुनाथपंती तुम्हाळा राज्यावरी बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हाती दिल्हे यैसीयासी आमचा अर्धा वाटा तेरा वर्षे तुम्हीच खादला आम्ही जरी तुम्हाजवली मागावे तरी बहुत दूर होतो बऱ्या बोले तुम्ही देणार नव्हा म्हणून तेरा वर्षे सबुरी केली मनामधे यैसा विचार केला की बरे महाराजांचे पूत्र तेही आहेत-खासी तोवरी खात मालाचे धनीच आहेत जे समई आम्हाला फावेल ते समई वेव्हार सांगोन घेऊ यैसे-मनी धरून होतो यैसीयास राजकारण प्रसंगे आम्ही कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलो तेथून कर्नाटकात गेलो चंजीस आलो चंजी घेतली व मुलूक घेतला व मीरखानास झगडीयति मोडून गर्देस मेलवीले सेरखानाचे हाती मुलूक होता तेव्हडाही घेतला त्यावरी मजल दर मजल कावेरी तीरास गेलो तेथून तुम्हाला पत्रे लिहिली की राजश्री गोविंदभट व राजश्री काकाजीपंत व राजश्री नीलोबा नाईक व राजश्री रंगोबा नाईक व तीमाजी येक्षीयार राऊ यैसे भले लोक आम्हापासी पाठवणे म्हणून तुम्हाला बहुतरीती लिहून पाटवले त्यावरून तुम्ही सदरहू भले लोक आम्हापासी पाठवून दिले त्या भल्या लोकांसी बहुतारीती घरोबीयाचा वेचार सांगोन आमचा अर्धा वाटा आम्हाला बऱ्या बोले द्यावा म्हणोन सांगोन पाठविले व त्या बराबरी राजश्री बालंभट गोसावी व राजश्री कृष्ण जोतिसी व कृष्णाजी सेखजी यैसे आपले तर्फेने भले लोक दिल्हे हे भले लोक तुम्हाजवली जाऊन बहुता रीती बोलीले की गृहकलह करू नये आपला अर्धा वाटा मागतात तो द्यावा यैसे बोलिले परंतु कपटबुध्दि तुम्ही यैसी मनी धरली की या समयात आम्ही बहुत थोर राजे जालो आहो आम्हासी आपण खासा भेटीस येऊन हलभल नरमी बहुत दाखवावी आणि आमचा वाटा आम्हास

१



१ श्री

स्वस्तीश्री राज्याभिषेक शक ३ नल संवत्सर -मार्गसीर्ष वदी प्रतिपदा इंदू
वासरे क्षत्रिय कुलवंतस श्री राजा -शिवछत्रपती याणी रूद्रपा नाईक
देसाई पाा मूरगुड यांसी-आज्ञा केली यैसी जे तुमचामु
तालिक चेनपा हुजूर आहे तेणे सांगितले की रुद्राप्पा स्वामी
चे कामावरी येकजीयार होऊन भुजबल गडीचे कामाबद्दल वड उपर व माप ब
राबरी नागण गौडा पाठविले होते त्यास वाटेत तोरगलकरानी जीवे मारीले
त्याकरिता दिलगीरी धरीली की साहेब कामास अंतर पडीले म्हणून तरी तुम्ही
काही फिकीर न करणेस्वामीचे सेवेस येक्षियार जाले आहा साहेब काम उदं
ड कराल यैसी स्वामी समजले असेती बहुत काही काम तुमच्या हाते घेऊ
न तुम्हास सर्फराज करुन यैसा दिलासा असो देणे साल मार सन सबा स
बैना कारण स्वामी तुमचे परगणियाचा काही खंडणी अगर पैका घेत नाही
तुम्हास माफ केले असे तुम्ही साहेबाचे तर्फेने कुली रुजुवातीने वर्तणूक क
रून गनिमाचे लोकास गोशमाल देत जाणे कडकोली गनिमाचे ठाणे आ
हे तेही उठवून तेथे आपले ठाणे बैसे ते करणे व वरकडही जागाजागाची ठा
णी गनिमाची उठवून देणे स्वामीही तुमची-हरबाब मदत करिवितील
तुम्ही साहेबकाम चालवीत जाणे भुजबलगडीची-बहुत भारी मदत हर
येक बाबेने करून आपले चाकरीचा व रूजवातीचा व येक्षियारीचा मजु
रा करून दाखवणे की स्वामी तुम्हावरी पुढेही मेहेरबानी करीत ते करणे

लेखनसीमा

मर्या
देयं विरा
जते

चंद्र
मार्गसीर्ष

मास मार्गसीर्ष

सुरु सुद बार

# भाग - २

# भाग २ - मोडी कागदपत्रांचे अंतरंगदर्शन.

## लेखन प्रशस्ती

प्रत्यक्ष संभाषणद्वारा विचाराची देवाणघेवाण काहीवेळा अशक्य असते. तसेच अत्यंत महत्वाचा व्यवहार लिखित स्वरूपात नोंदवणे जरुर असते. यातून खाजगी वा व्यावसायिक लेखन होऊ लागले. यात व्यावसायिक किंवा राजकीय लेखनाची व्याप्ती फारच विस्तृत आहे. **ऐतिहासिक पत्रलेखन :-** ऐतिहासिक पत्रलेखन हे इतिहास अभ्यासाचे अव्वल दर्जाचे साधन मानले जाते. कोणत्याही प्रकारच्या पत्रलेखनात १) **पत्रशीर्ष** - यात लेखकाचे नाव, पत्ता, तारीख येते. वरच्या कोपऱ्यात वा मध्यभागी श्रीकार किंवा कुलदैवताचे स्मरण केले जाते. २) **मायना** - पत्र कोणी कोणास लिहिले आहे त्यावर तो अवलंबून असतो. ३) **मसुदा** - यात प्रारंभी विषयाचा, संदर्भ किंवा पोच देऊन मुख्य मजकुरास प्रारंभ केला जातो. ४) **समाप्तीचा मायना** हा सुध्दा पत्रलेखक आणि वाचक यांच्या सामाजिक दर्जा, वय, इ. वर अवलंबून असतो. ५) **स्वाक्षरी** - ऐतिहासिक पत्राच्या शेवटी सही करण्याची पद्धती नव्हती. त्याऐवजी 'बहुत काय लिहिणे सूज्ञ असा ' लेखनालंकार, इत्यादी मजकूर असे.

मुस्लीम अंमलात कागदाची विपुलता प्राप्त झाल्याने लेखन खूपच सुलभ झाले. राजकीय पत्रलेखनाचे विशिष्ठ संकेत रूढ होत गेले. राज्याभिषेक प्रसंगी शिवाजीमहाराजांनी मुलकी , लष्करी, दिवाणी, कारभारात अनेक संकेत नव्याने रूढ केले त्यांना पद्धती म्हणत. त्यापैकी एक म्हणजे लेखनप्रशस्ती होय. शिवाजीमहाराजांच्या आज्ञेने बाळाजी आवजी चिटणीस यांनी इतर मुत्सद्यांच्या मदतीने ही नवी पद्धती रूढ केली.

मुसलमानी अंमलात सर्वच क्षेत्रात इस्लामी संस्कृतीचे आक्रमण झाले होते. लेखनपद्धतीसुध्दा त्याला अपवाद नव्हती. अरबी,-फारसी शब्द पदव्या मायने सर्रास वापरले जात. उदा.-वलद, बिन, मेहेरबान, दामदौलतहू, अजरख्तखाने, माहे, तारीख इ. ही भ्रष्ट झालेली पद्धती राज्याभिषेकापर्यंत चालूच राहिली. फुरसत मिळताच याही क्षेत्रात शिवाजीमहाराजांनी नूतनीकरण आरंभिले. पहिला भाग म्हणजे 'राज्यव्यवहारकोश' आणि दुसरे ही 'लेखनप्रशस्ती' होय. ती जशीच्या तशी मिळालेली नाही. बाडातून त्यासंबंधीचा भाग येतो.

मोडी लिखाण करताना प्रथम रेघ मारावीच लागते. रेघ कशी, केव्हा, कुठे काढावी यासंबंधी हेमाडपंडिताने संकेत घालून दिला असे मानतात तो असा-

मित्राणां त्रितया रेषा द्वे भृतस्य रिपोरपी।
षड्गुरो : स्वामिन पंच एकैकं पुत्रकन्यो :।।


मित्रासाठी तीन रेषा, दोन रेषा सेवक आणि शत्रूसाठी, सहा रेषा गुरुसाठी. पाच

रेषा मालकासाठी आणि कन्या, पुत्र यांचेसाठी प्रत्येकी एक रेघ काढावी.

पहिल्या ओळीच्या प्रारंभी दकार , अर्धदकार, दोन उभ्या दंडासह दकार अथवा छकार लिहून मग मजकूर लिहित. पत्रग्राहकाच्या दर्जानुरूप पत्राच्या डोक्यावर वा डाव्या उजव्या बाजूस अथवा शेवटी पत्रलेखक आपला शिक्का वा मुद्रा उमटवीत असे.

पत्रलेखन एका विशिष्ट वळणाने करून बहुत काय लिहिणे,तरी सूज्ञ असा, लोभ असो दीजे, निरंतर, लेखनसीमा, आज्ञाप्रमाण, किंवा रुजू असा शेरा खाशी व्यक्ती करीत असे. त्याचे वळण स्पष्टपणे निराळे हेतूतः काढलेले असे. विशेष महत्त्वाच्या वा जिव्हाळयाच्या पत्रावर लेखन खाशी व्यक्ती स्वतः करीत असे. महजरनाम्यावर उपस्थित व्यक्ती, वतनदार, बलुतेदार याची नावे व व्यवसायदर्शक चिन्हे केली जात. पूज्य व्यक्ती किंवा देवासंबंधीचे उल्लेख आल्यावर थोडी मोकळी जागा ठेवण्याचा प्रघात होता. एकाहून अधिक व्यक्तींना उद्देशून पत्र असेल तेव्हा त्यांच्या दर्जानुरूप मामलेदार, कमावीसदार, देशमुख, पाटील, कुलकर्णी, नाडगौडा, बारा बलुतेदार अशी नावे येतात. ज्याला पत्र पाठवायचे त्याचे वय, दर्जा, संबंध लक्षात घेऊन निरनिराळे मायने कागदपत्रातून येतात. दंडवत, विज्ञापना, आशीर्वाद, गोसावी, तीर्थरूप, राजमान्य राजश्री, वज्रचुडेमंडीत, गंगाजलनिर्मल, चरणरज इ. शब्दात पत्रग्राहक वा प्रेषक आपला परिचय करून देत असे. ब्राह्मणाला इतर जातीच्या लेखकाने दंडवत लिहावा. अब्राह्मण व्यक्तीनी ब्राह्मणास रामराम लिहावा असा संकेत होता व तो काटेकोरपणे पाळलाही जात असे. सेवकाने वा आश्रिताने मालकास स्वामी, गोसावी या शब्दात गौरवून स्वतःस सेवक, पोष्य, चरणरज संबोधावे असा सामान्यपणे प्रघात दिसतो.

पत्रावर श्रीकार काढल्यावर त्याखाली कागदाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एक रेघ काढली जात असे. ती रेघ नेमक्या कोणत्या पद्धतीने काढावी याचाही एक नियम होता. त्यासाठी खालील चौकट अभ्यासावी.



**स्पष्टीकरण** - १) कागदाला चार घड्या घालून पैकी पहिल्या दोन रकान्यापुरती जी रेषा काढत तिला **पहिली जिल्हे** म्हणत. २) शेवटच्या दोन रकान्यापुरती जी रेषा काढीत तिला **दुसरी जिल्हे** म्हणत. ३) दोन व तीन रकान्यापुरती जी रेषा असेल तिला **बीत** म्हणत. ४) प्रारंभी अकार काढून मग दोन आणि तीन रकान्यापुरती रेषा काढीत तिला **अज** म्हणत.५) प्रारंभी अेकार काढून मग दोन आणि तीन रकान्यापुरती रेषा काढीत तिला **एकूणहत** म्हणत. ६) प्रारंभी बांक देऊन मग दोन आणि तीन रकान्यापुरती रेषा काढीत.


**काही संकेत**--वर उल्लखलेली रकानी पत्रे कोणास व कोणती पाठवायची याचेही काही संकेत ते असे-

**एक व दोन रकानी पत्रे**-जमीनदार, देशमुख, देशपांडे यांना जात.

**दोन व तीन रकानी पत्रे** ब्राह्मण, गोसावी, शास्त्रीपंडित, पदाधिकारी यांना जात.

**तीन व चार रकानी पत्रे** आज्ञापत्रे, चिटणिसीपत्रे, जातीपत्रे, पाटील, कुलकर्णी यांना जात.

**मोकळ्या जागेसंबंधीचे संकेत.**




**स्पष्टीकरण**

१) कागदावर एका अक्षराची जागा मोकळी ठेवून जी रेघ आखत तिला **दफे** म्हणत.

२) दोन अक्षराची जागा मोकळी असल्यास तिला **दफाते** म्हणत.

३) तीन अक्षराची जागा मोयळी सोडली असल्यास तिला **कर्ते** म्हणत.

४) चार अक्षराची जागा मोकळी सोडली असल्यास तिला **महजर** म्ह्णत.

**दकार, छकार, इकार इ. संबंधी संकेत**

याखेरीज रेषेप्रारंभी दकार, छकार, इकार वा शून्य काढण्याचा प्रघात होता. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.




बरोबरीच्या जहागीरदार, सरदार इ. ना प्रारंभी **द** काढून रेषा काढीत आणि त्यावर लेखन सुरू करीत.




सामान्य सेवकास पत्र पाठवताना केवळ **ई** हे अक्षर प्रारंभी काढले जाई.



अष्टप्रधानातील तोलामोलाच्या पदाधिकाऱ्यास पत्र पाठवताना **ई** अक्षरापूर्वी **दोन उभ्या रेषा** काढीत.



देशमुख, देशकुलकर्णी यांना पत्र लिहिताना **भरीव टिंब, दोन रेषा व ई** हे अक्षर काढीत.




बड्या जहागीरदारास वतनदारास पत्र लिहिताना **दोन टिंब, दोन रेषा व ई** कार काढीत.



केवळ **छ** हे अक्षर देशमुख, देशपांडे यांना जाणाऱ्या पत्राच्या प्रारंभी लिहित.



काही प्रसंगी विशेष स्नेहभाव व्यक्त करण्यासाठी **दोन उभ्या रेषा व छ** अक्षरापूर्वी काढत.



**शून्य देऊन रेषा** काढल्याने ब्रह्म्याचा निर्देश केला जाई तर **दोन उभ्या रेषा** ह्या हरिहराच्या प्रतीक समजत तर **द, ई,** इत्यादी अक्षराने स्नेहभाव व्यक्त केला जात असे.

## कागदपत्र संग्रहांची ओळख

भारतातील बहुतेक प्रांतातून शासकीय दप्तरखाने किंवा ऐतिहासिक कागदपत्र संग्रह स्थापन करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख कागदपत्र संग्रहांची त्रोटक स्वरुपात या ठिकाणी ओळख करून दिली आहे.

### १) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

गेली सुमारे ८० वर्षे कै. इतिहासाचार्य राजवाडे, म.म. पोतदार, द.वि. आपटे, सरदार मुजुमदार, शं. ना. जोशी, चिं. ग. कर्वे, डॉ. ग.ह. खरे इ. नामवंत संशोधकांनी महाराष्ट्रभर विखुरलेली लाखो कागदपत्रे या ठिकाणी संकलित करून पैकी काही प्रकाशित केली आहेत. त्यातील महत्त्वाचे संग्रह खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| चिंचवडकर देव | १४० रुमाल |
| चिपळूणकर | १५० रुमाल |
| तांबवेकर | ३५० रुमाल |
| दीक्षित पटवर्धन, पुणे | १०४ वह्या |
| दीक्षित पटवर्धन, नाशिक | १२६ वह्या |
| तुळशीबागवाले | ९१ वह्या |
| जोशी स.ग. | ३७ रुमाल |
| चांदोरकर | १३ रुमाल |
| पंतराजाज्ञा | ४० रुमाल |
| ओतूरकर | ४० हजार सुटे कागद |
| कळमकर, वाई | ३० हजार सुटे कागद |
| दाभाडे | ४० हजार सुटे कागद |
| दीक्षित, पटवर्धन कायगाव | १८ हजार सुटे कागद |
| देशपांडे, सांगोला | १५ हजार सुटे कागद |

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वतीने महत्वाच्या कागदपत्रांचे संपादन करून ग्रंथरूपाने प्रसिध्द करण्याचे काम अव्याहत चालू आहे. आजपर्यंत प्रसिध्द झालेल्या ग्रंथमाला याप्रमाणे

मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १२,२०

अैतिहासिक फार्सी साहित्य खंड

| | |
|---|---|
| पुरंदरे दप्तर | ऐतिहासिक संकीर्ण निबंध |
| चंद्रचूड दप्तर | पुणे नगर संशोधनवृत्त |

| | |
|---|---|
| पेठे दप्तर | दक्षिणच्या इतिहासाची साधने |
| वैद्य दप्तर | षण्मासिक अहवाल |
| हिंगणे दप्तर | वार्षिक अहवाल |
| शिवचरित्र साहित्य खंड | वार्षिक संमेलन वृत्त |
| ऐतिहासिक संकिर्ण साहित्य | वार्षिक इतिवृत्त |
| शिवकालीन पत्रसार संग्रह | आंग्रेकालीन पत्रव्यवहार |
| दाभाडे दप्तर | (कोकणच्या इतिहासाची साधने) |
| शिवचरित्र वृत्तसंग्रह | शिवकालीन शकावली |
| दक्षिणच्या मध्ययुगीन-इतिहासाची साधने | त्रैमासिक |

**२) पुणे लेखाभिगार, पुणे**

या ठिकाणी ऐतिहासिक आणि प्रशासकीय स्वरुपाचा संग्रह जतन करून ठेवण्यात आला आहे. हा संग्रह माऊंट स्टूअर्ट एलफिन्स्टन् याने इंग्रजी राजवटीच्या प्रारंभी जमविला व तो पुणे कमिशनरच्या स्वाधीन केला. इ. १८४५ (श. १७६७) मध्ये इनाम कमिशनची स्थापना झाल्यावर त्याच्या अखत्यारीत सदर संग्रह आला. इ. १८६३ (श. १७८५) साली इनाम कमिशनचे काम संपल्यावर जमाबंदी विभागाच्या ताब्यात उपरोक्त संग्रह आला. प्रारंभी शहराच्या मध्यवर्ती भागात - नाना वाड्यात असलेला हा संग्रह इ. १८९० (श. १८१२) मध्ये कौन्सिल हॉल समोरील सध्याच्या दगडी इमारतीत हलविण्यात आला.

या ठिकाणी सुमारे ३९००० रुमाल असून कागदांची संख्या सुमारे ४ कोटी आहे. बहुसंख्य कागद मोडी लिपीत असून भाषावर विभागणी खालीलप्रमाणे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| मराठी | | २९४६३ रुमाल |
| गुजराथी | - | ६४४ रुमाल |
| पर्शियन | - | ७० रुमाल |
| इंग्रजी | | १०५१८ रुमाल |

हे सर्व कागद खालीलप्रमाणे विषयवारीने ठेवण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| घडणी | - | ८०६ रुमाल |
| प्रांत अजमास | - | ५२९७ रुमाल |
| पागा | - | ६४२ रुमाल |
| आंग्रेदप्तर | - | ७६१ रुमाल |
| सातारा महाराज दप्तर | - | ३९४४ रुमाल |
| कर्नाटक जमाव | | २५९० रुमाल |

| | | |
|---|---|---|
| जमाव विभाग | - | ७८६४ रुमाल |
| सोलापूर जमाव | - | २६० रुमाल |
| हिंदुस्थान विभाग | - | ५०० रुमाल |
| इनाम कमिशन चौकशी | | १८८९ रुमाल |

सरदार रास्ते घराणे (पुणे) यांचेकडील सुमारे ५०० रुमाल नुकतेच समाविष्ट करण्यात आले आहेत.

पुणे लेखाभिगारात असलेले हे प्रचंड ज्ञान भांडार आमजनतेस पाहाण्यास, अभ्यास करण्यास खुले आहे. या संग्रहातून महत्त्वाचे कागद निवडून संपादित करण्याचे काम आजही चालू आहे. आतापर्यंत ग्रंथरुपाने प्रसिध्द करण्यात आलेले कागद खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) जी. सी. वाड | - | १३ खंड |
| २) द.ब. पारसनीस | - | इतिहास संग्रह |
| ३) पारसनीस मावजी | - | याद्या व सनदापत्र |
| ४) पारसनीस | - | कैफियत याद्या |
| ५) ए. जी. फ्रँक | - | पंचायतस् अंडर दी पेशवाज् |
| ६) गो. स. सरदेसाई | - | पेशवे दप्तर ४५ खंड |
| ७) आर. डी. चोक्सी | - | रेसिडेन्सी रेकॉर्ड |

**३) पारसनीस अथवा मेणवली संग्रह डेक्कन कॉलेज, पुणे.**

नाना फडणवीसांच्या वंशजांकडून कै. द.ब. पारसनीस यांनी हा संग्रह मिळविला. त्यात प्रामुख्याने उत्तर पेशवाईतील राजकीय, आर्थिक, सामाजिक स्वरूपाची मोडी कागदपत्रे आहेत. डेक्कन कॉलेजच्या संग्रहात असलेले कागदपत्र खालीलप्रमाणे विभागलेले आहेत.

| | |
|---|---|
| पारसनीस संग्रह | १०१ रुमाल |
| निपाणीकर देसाई संग्रह | १५ रुमाल |
| बिवलकर संग्रह | १० रुमाल |
| दीक्षित पटवर्धन | ५० वह्या |
| सरदार नातू | १०० वह्या |
| मेकार्टने संग्रह | ५००० कागद (इंग्रजी) |

**४) शासकीय लेखाभिगार मुंबई**

या ठिकाणी इंग्रजी राजवटीपासून सरकारच्या विविध खात्यांचे रिपोर्टस्, डायरीज, फाईल्स, टाईप्ड बाऊंड बुके यांचा अद्ययावत् असा प्रचंड संग्रह आहे. त्याखेरीज अलीकडे मोडी कागदपत्र संग्रह ठेवण्यात आला आहे. त्यांची रूमाल संख्या सुमारे १०० आहे.

**हस्तलिखिते** १) इ. १८२० (श. १७४२) पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या डायऱ्या असून त्यांची

संख्या सुमारे ७००० आहे.

२) इ.१८२० (श.१७४२) नंतर या पत्रसमारंभांत सरकारच्या प्रत्येक खात्याचा कारभार येतो.

३) इ. १९२० (श. १८४२) नंतरचा मुंबई राज्याचा पत्रव्यवहार वह्यांच्या स्वरुपात आहे.

याखेरीज वृत्तपत्रांच्या फायली, जुने नकाशे, पर्शियन मोडी कागदपत्रांचे रूमाल आहेत. प्रसिद्ध झालेले ग्रंथ खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| शाहू दप्तराची सूची | - | खंड १ व २ |
| संशोधनासाठी निवडलेल्या- | - | |
| कागदपत्रांची सूची | - | खंड १ व २ |
| पेशव्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम | - | वि. गो. खोबरेकर |
| महाराष्ट्रातील दप्तरखाने | - | वि. गो. खोबरेकर |
| हिंदी कागदपत्र संग्रह | - | देवीसिंग चौहान |

**५) औंध येथील भवानी म्युझियम -**

सातारा जिल्ह्यात औंध संस्थानचे राजे प्रतिनिधी यांचा संग्रह संस्थाने विलीन झाल्यावर महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात आला तो खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| हस्तलिखित पोथ्या | - | २ हजार |
| छापील ग्रंथ | - | १२ हजार |
| मोडी कागद | - | ५०० रुमाल |

## ६) औरंगाबाद येथील संग्रह :-

**अ) मराठवाडा विद्यापीठ :-**

पारसनीस संग्रहाचा एक भाग म्हणजे सुमारे १०० मोडी रुमाल, मराठवाडा विद्यापीठाने काही वर्षामागे खरेदी केले आहेत. त्याखेरीज बाळासाहेब देशमुख यांचासुध्दा दुर्मिळ संग्रह या ठिकाणी आहे.

**ब) औरंगाबाद येथील शासकीय दप्तरखाना -**

मुंबई येथील दप्तरखान्याच्या तुलनेने हा छोटा असून त्यात प्रामुख्याने उर्दू, फार्सी कागदपत्रे मोठ्या प्रमाणात आहेत.

## ७) धुळे येथील संग्रह -

**अ) कै. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ**

कै. वि. का. राजवाडे संशोधन मंडळात खालील प्रमाणे मोडी कागदपत्रे जतन करून ठेवण्यात आली आहेत.

राजवाडे यांचे रुमाल - ६
प्रसिद्ध झालेले रुमाल - ४
प्रसिद्धीस तयार रुमाल- १५
अभ्यास होणे रुमाल - ४०
नंदूरबार देसाई यांचा संग्रह

**ब) श्री समर्थ वाग्देवता मंदिर**

या ठिकाणी प्रामुख्याने समर्थ रामदासस्वामी यांचे व त्यांच्या संबंधीचे वाङमय, हस्तलिखिते, बाडे, पोथ्या एकत्रित करण्यात आलेले आहेत. कै. शं. श्री. देव यांनी मोठ्या परिश्रमपूर्वक ही साधने गोळा केली आहेत. समर्थांविषयीची साधने गोळा करीत असताना सहजपणे जी इतर मोडी कागदपत्रे मिळाली तीही या ठिकाणी असून त्यांची संख्या सुमारे २००० आहे.

**कागदपत्रांचे विवरणासह एकूण प्रकार**

अैतिहासिक कागदपत्रांचे एकूण किती प्रकार आहेत असे पाहू लागल्यावर भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शक १८३२ (१९१०) सालच्या इतिवृत्तात कै. राजवाडे यांनी सुमारे ८० प्रकार दिलेले आढळले. शिवाय विश्वकोश खंड ९ मध्ये कै. ग. ह. खरे यांनी काही नव्या प्रकारांची भर घातलेली आढळली तरीही ही यादी अपूर्ण वाटली, म्हणून पुणे लेखाभिगार-पुणे, यांनी केलेल्या सूची चाळल्या असता आणखीही या यादीत भर टाकता येईल असे वाटले. त्याशिवाय ज्या रूमालांच्या सूची झालेल्या नाहीत असे अक्षरशः हजारो रूमाल आहेत. ते सर्व पाहणे एकट्याच्या कुवतीबाहेरचे तसेच अनावश्यक वाटून जेवढे पाहाता येतील तितके पाहून त्यांचाही समावेश या नव्या यादीत केलेला आहे. त्यांची संख्या १३५ आहे. ही यादी अद्ययावत असली तरी परिपूर्ण नाही.
सोयीसाठी या सर्व पत्रप्रकारांचे आर्थिक, महसूल विषयक, राजकीय, न्यायालयीन आणि संकीर्ण असे विभाग केलेले आहेत.

**आर्थिक - (१ ते १६)**

| नाव | | विवरण |
|---|---|---|
| १) कर्जकतबा | - | ठराविक अटींवर व मुदतीत कर्जफेडीसंबंधीचे करारपत्र. |
| कर्जरोखा | - | ऋणकोच्या नावे लिहून घेतला जातो तो कबुलीजबाब. |
| ३) कबज | - | पोचपावती किंवा कब्जा देणेसंबंधीचे पत्र. |
| ४) खरेदीपत्र (खत) | - | जमीन जायदाद खरेदीविक्रीचा दस्तऐवज. |
| ५) खोका | - | हुंडीचा ऐवज न पावला तर चौकशी केल्यास दाखविला जातो तो. |
| ६) गहाणपत्र (खत) | - | कशाच्यातरी तारणावर दिले गेलेल्या कर्जाचा तपशील असणारे. |

७) जाब - गमावलेली हुंडी पुन्हा लिहून देणे.
८) दस्तक - रहदारीचा परवाना, जकात हशील माफीचे पत्र.
९) पावती - परभारे अैवज पावल्यावर दिली जाणारी पोच.
१०) फारखती - कर्जविषयक तपशील किंवा उत्पन्नाचे वाटणी पत्र.
११) भरणेपत्र - सरकारी ऐवज खजिन्यात कोणत्याप्रकारे भरला त्याचा तपशील.
१२) रोखा - करारानुरूप तगादा करून पाठवलेली हुंडी.
१३) रोजखर्डा - दैनंदिन जमाखर्चाची नोंद.
१४) वायदेपत्र - (रोखा) ऋणकोने कर्जफेडीची कबूल केलेली हस्तेबंदी.
१५) हुजत - खजिन्यात जमा झालेल्या पैशाची पावती.
१६) हुंडी - ऐवज देऊन देशावर घेण्याचा कागद.

**महसुली कागदपत्र ( १७ ते ७२)**

१७) अर्जी इनाम - इनाम मिळवणे संबंधीची विनंती.
१८) अभयपत्र - दहशतीने परागंदा झालेल्या वतनदारांना पुन्हा वतनावर हजर होण्यास दिलेले अभय.
१९) आकारबंद - जमिनीचा प्रकार, उत्पन्न, वतनी हक्क, जमा-खर्च इ. तपशील देणारी यादी.
२०) आजमास - कमाविसदारांकडून घेतलेला अंदाजी जमाखर्च.
२१) इजारपटा - गावातील जमीन विशिष्ट अटींवर कसायला देताना तयार करण्यात आलेले करारपत्र.
२२) इनामपत्र (करार) - धन्याच्या कृपेने मिळालेल्या जमिनीचे अधिकारपत्र.
२३) कबुलायत - विशिष्ट अटींवर जमीन कसणेस घेणे.
२४) करार यादी - नेमणुकीप्रमाणे देऊ केलेल्या सरंजामाची यादी.
२५) कुंठीतपत्र - महसुली काररभारात दोषी शाबीत झाल्यावर दिले जाणारे पत्र.
२६) कौल खतावणी - जमिनीच्या उत्पन्नाचे खातेदाराची नावनिशी यादी.
२७) कौलनामा - जमिनीची लागवड वा गावची वसाहत करताना रयतेशी झालेला करार.
२८) खंडणीकरार खंडणीसंबंधीचा हस्तेबंदी करार.
२९) खूर्द खत वरिष्ठाने कनिष्ठास लिहिलेले.
३०) खोट पत्र रुजूवातीस खोटा ठरला म्हणून लिहून घेतलेले ते.
३१) गाव झा गावातील जमिनीचे कसानुसार वर्गीकरण, उत्पन्न, खर्च हकदार इ. चा तपशील.

३२) चकनामा (बंदी)- गावातील विशिष्ट जमिनीच्या चतु:सीमांचा तपशील.
३३) जप्ती चिठी - उत्पन्न वा सरंजाम जप्त करणेची आज्ञा.
३४) जमीन झाडा - विशिष्ट गावातील जमिनीचे एकंदर वर्णन, पिके, उत्पन्न, कुळे इ. ची तपशीलवार यादी.
३५) जामिन कतबा - जामीन राहाण्यास कबुली देणारे पत्र.
३६) जामीन साखळी - गावात एकमेकांना जामीन राहणे.
३७) जामीन निशेदारी - वसुल थकलेल्या कुळाकडून रकमेची हमी घेणे.
३८) तजकरे भ्रष्टाचारी कामगाराची चौकशी सुरवात करणे.
३९ ) तहशील झडती- तालुक्याच्या जमाखर्चाचा तपशील देणारा ताळेबंद.
४०) ताळेखर्डा - विशिष्ट परगण्याचा महिन्याचा जमाखर्च.
४१) ताळेबंद - महिन्याचा वा वर्षाचा गावचा जमाखर्च.
४२) थळझाडा - गावातील एकंदर शेतजमिनीचे प्रकार, उत्पन्न, कुळांची नावनिशीवार यादी.
४३) दफातेपत्र - कमाविसदारास त्याच्या हक्काची दिलेली सनद.
४४) दुमालेपत्र - नव्या अमलदारास वहिवाट समजून देणारे पत्र.
४५) देहझाडा - महालातील एकंदर गावांची व तेथील कुळांची नावनिशी तसेच जमाखर्चाची नोंद.
४६) धुरंगझाडा - गावातील जमिनीची वर्गवारी उत्पन्न खर्च इ. चा तपशील.
४७) निशाचिठ्ठी - जमिनदारापासून घेतलेली हमी.
४८) नेमणूक - महालावर अधिकाऱ्यास पाठवताना दिलेले पत्र.
४९) ठराव - नियमीत सारा भरून वहिवाटीप्रमाणे गावखर्च करण्याबद्दल अधिकाऱ्याने दिलेले अभिवचन पत्र.
५०) ठरावपट - गावच्या कुळाकडून यावयाच्या बाकीचा हिशोब.
५१) पाहणीपत्रक - सारा निश्चित करण्यासाठी केलेल्या पाहणीचा तपशील.
५२) बेहडा - सरकारी अंदाजानुसार एकाद्या परगण्याचा जमाखर्च, व इनामी हक्कांची नोंद असणारे पत्रक.
५३) बोटखत - गावच्या जमिनीच्या प्रतवारीचा तपशील.
५४) मनाचिठ्ठी - महसुलाच्या तगाद्याची मनाई करणारे पत्रक.
५५) माफी पत्र - अस्मानी-सुलतानी संकटात गावच्या वसुलात सूट वा माफी देणारे पत्र.
५६) मुदतबंदी - सारा भरण्याचे वेळापत्रक.
५७) मोकदम जामीन कतबा - पाटलाकडून वसुलाची हमी घेणारे कबुली पत्र.

५८) मोजदाद पत्र - माजी अमलदारांकडून सरकारी जिनसांची मोजणी करून त्या ताब्यात देणे.
५९) रकमाला - गावच्या जमिनीची प्रतवारी, उत्पन्न, खर्च, कुळांची नावनिशीची नोंद असलेला बंद.
६० ) लावगण पत्रक - गावच्या जमिनीची कुळवार केलेली वाटणी, कमाल-किमान उत्पन्न खर्च.
६१) वाटणी पत्र - गावच्या एकूण उत्पन्नात हक्कदाराच्या विभागाचा तपशील असणारे पत्र.
६२) वासलात - महालातील उत्पन्नाचे सरकारी हिश्याचे पत्रक.
६३) सनद - गावावर वा महालावर दिलेला अधिकारपत्र.
६४) सरकत रोखा (नामा) - गावच्या उत्पन्नाच्या वाटणीचे पत्रक.
६५) सरकबंद - गावच्या एकूण उत्पन्नाचा तपशील देणारे पत्रक.
६६) सरहदपत्र - गावच्या चतु:सीमेलगतच्या जमिनीचा तपशील.
६७) साहित्यपत्रक - नव्या अमलदारास मार्गदर्शक पत्र.
६८) सिस्त वहिवाट - गावच्या महसुलाची कबूल केलेली हस्तेबंदी आणि वहिवाट सांगणारे पत्रक.
६९) सूडबंद - गावच्या जमिनींचा एकूण तपशील देणारे पत्रक.
७०) हस्तेबंदी - खंडणी वा वसुल भरण्यासाठी हस्तेबंदीचा केलेला करार.
७१) हरदुमुसनाजुमला- हरवलेली सनद नवीन करून देणे.
७२) हुकुमतनामा - अधिकारपत्र.

**राजकीय कागदपत्र (७३ ते ८८)**

७३) अखबार - मुधली दरबारातील दैनंदिन बातमीपत्रे.
७४) आमंत्रणपत्र - दरबारास हजर होण्यास पाठवलेले पत्र.
७५) आज्ञापत्र - छत्रपती वा पेशव्यांच्या शिक्यानिशी झालेला हुकुमनामा.
७६) कानूजाबता - राज्यकारभाराविषयीचे नियम वा वहिवाट ज्यात नोंदवलेली असते तो.
७७) कानूसायेर - राज्यकारभाराची वहिवाट.
७८) कुंकुमपत्र - कामगिरी रवानगी करताना दिले जाणारे पत्र
७९) कैदकानू - कारभाराविषयीचे नियम वा परंपरा.
८०) चिठी - छोटे पत्र.
८१) जाहीरनामा - सरकारतर्फे प्रसिध्द करण्यात आलेली लेखी आज्ञा
८२) टिपण - स्मरणार्थ केलेली नोंद.

८३) तगीरपत्र - कामावरून दूर करणेचे पत्र वा सरंजाम जप्त करणेची आज्ञा.
८४) तहठराव - सरकारने केलेला ठराव किंवा कायदा.
८५) तहनामा - दोन सत्ताधिशांमध्ये झालेला लेखी करार.
८६) प्रशस्तीपत्र - उमेदवारास त्याच्या पात्रतेविषयी दिले. जाणारे शिफारस पत्र.
८७) फर्मान - बादशाही सही शिक्याचे अधिकृत आज्ञापत्र.
८८) फेरीस्त - यादी.

**न्यायालयीन कागदपत्रे ( ८९ ते १२० )**

८९) अनामती पत्र - वतनाच्या तंट्यात निर्णय लागेपर्यंत केलेली उत्पन्नाची जप्ती.
९०) कतबा - लेखी कबुली किंवा संमती.
९१) करीना(णा) - वादाची किंवा घराण्याची साद्यंत हकिकत.
९२) कैफियत - वतनाची साद्यंत हकिकत किंवा मांडलेली बाजू.
९३) गुन्हेगारी - वादात खोटा ठरला म्हणून वसूल करण्यात आलेला द्रव्यदंड.
९४) गोषवारा (सारांश) - वादी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून त्रयस्थाचे मत घेणे.
९५) जबानी (जाब) - वादाशी संबंधित व्यक्तीचे म्हणणे नोंदविणे.
९६) जातकतबा (जातपत्र) - आपल्या ज्ञातीस लिहून देण्याचा कबुली जबाब.
९७) तकरिर (द) - वादीचे म्हणने लिहून घेऊन त्याची संमती घेणे.
९८) थळपत्र - ज्या गावी पंचाईत भरणार त्या गावाला पाठवलेले अधिकृत पत्र.
९९) दतपत्र (दत्तकपत्र) - निपुत्रिकास गोत्रज मांडीवर घेण्यास दिलेली परवानगी.
१००) दोषपत्र - निवाड्यात दोषी ठरणाऱ्यास दिले जाणारे पत्र.
१०१) निवाडपत्र - वादाची साद्यंत हकिकत लिहून पंचाईताचा निर्णय साक्षीदारांच्या निशाण्या असणारे पत्र.
१०२) नेमोस्तरपत्र - निरोप घेऊन जाणाऱ्यास दिले जाणारे.
१०३) पुरसिस - वादी प्रतिवादीचे म्हणणे नोंदवलेला कागद.
१०४) माळपत्र - दिव्य करण्यास तयार झालेल्याच्या मस्तकी बांधतात ते पत्र.

१०५) मसाला पत्र - हुकूम मोडला, साक्षीस बोलाविणे झाल्यास पाठवले जाणारे पत्र.
१०६) महजर - वतनी निवाड्याची साद्यंत हकिकत नोंदवून साक्षीदारांच्या, अधिकाऱ्यांच्या सरकारी निर्णयावर ज्या निशाण्या होतात तो कागद.
१०७) मुचलका - वतनाचा वाद नोंदविलेला कागद.
१०८) यजित पत्र - सर्वानुमते खोटा ठरलेल्यापासून लिहून घेतात ते पत्र.
१०९) राजिनामा - झालेला निर्णय कबूल असल्याचे लेखी पत्र वा संमतीपत्र.
११०) वदवणुक - पंचांच्या साक्षीने सत्यपरिस्थिती निवेदन करण्यासंबंधीचे लिहून दिलेले पत्र.
१११) वाटेपत्र - आपसात समजुतीने वाटे करून घेतले जातात ते पत्र.
११२) शेरणीपत्र - पंचाईत उभी करण्यास वादीने कबून केलेली रक्कम किंवा वादात खरा ठरणाऱ्याने सरकारात भरलेला कर.
११३) सडी (साक्षी) पत्र - दाखला-साक्षी नोंदवल्या जातात ते पत्र.
११४) संवादपत्र - झगड्यात समझोता झाल्याचे पत्र.
११५) समजावीस पत्र वाद आपसात मिटल्याचे पत्र.
११६) समापत्र - साऱ्यांनी एकदिलाने राहाण्याचा कबुली जबाब वा ठराव.
११७) सामिलनामा - जातीने आंगपण नाही, सबब भाऊ उभा करून त्यास लिहून देणे.
११८) सामिलाती - मदतीस बोलावणेचे पत्र.
११९) हकिकत वाका- वादाची साद्यंत हकिकत लिहिलेला कागद.
१२०) हरकी - वादात खोटा ठरलेल्याकडून घेतला जाणारा दंड.

**संकीर्ण कागदपत्रे - (१२१ ते १३५)**

१२१) अग्रहार - एक वा अनेक ब्राह्मणास दिलेले उत्पन्न किंवा इनाम.
१२२) उचापत झाडा - गावचा एकूण जमाखर्च, हक्कदाराचा वाटा सरकारीवाटा, इनामदाराचा वाटा इत्यादीचे नोंद पत्रक.
१२३) उतारा चिठी - नदीपार करण्याचा परवाना.
१२४) जन्म चिठी - जन्मवेळचे केलेले टिपण.
१२५) दाखला - पूर्वपरंपरा किंवा वहिवाट सांगणारा का
१२६) दानपत्र - विद्वान ब्राह्मणास रोखीत वा इनामाच्य स्वरूपात केलेली संभावना.
१२७) धर्मपत्र - सरकारतर्फे ब्राह्मणास दिलेले वर्षासन.
१२८) बक्षीसपत्र - बक्षीस वा बहाल केले त्याचे पत्र.

| | | |
|---|---|---|
| १२९) मृत्युपत्र | - | मरणकाळची इच्छा किंवा मालमत्तेची विल्हेवाट कशी लावावी ते पत्र. |
| १३०) यादी | - | संस्थानिकाने हुजूर अर्ज करणे ती. |
| १३१) लग्नचिठी | - | लग्नाचे निमंत्रण. |
| १३२) वृत्तिपत्र | - | वृत्ती वा इनाम देण्याचे पत्र. |
| १३३) सनदपत्र | - | इनाम दिल्याचे सही शिक्याचे पत्र. |
| १३४) सोडचिठी | - | अंमल सोडल्याबद्दल लिहून दिलेले पत्र. |
| १३५) हजेरीपत्र | - | कामगारांची हजेरी नोंद ठेवणारे पत्र. |

**सांकेतिक लेखनपध्दती**

- ऐतिहासिक पत्रातून आणखी एका पध्दतीचे लेखन केले जात असे. ते म्हणजे सांकेतिक स्वरूपाचा पत्रव्यवहार होय. अशा पत्रांची भाषा मराठी. लिपी मोडीच असते पण व्यक्तिनामे व स्थलनामे लिहिताना विशिष्ट संज्ञा किंवा टोपण नावे वापरली जात. त्याचा उलगडा ते पत्र ज्याने लिहिले त्याला किंवा ज्याला ते पाठवले जाते अशा दोघांनाच होऊ शकतो. राजकारणाच्या गर्दीत असे पत्र गहाळ झाले अथवा ते अयोग्य व्यक्तीच्या हाती पडले तरी त्यापासून कोणताही धोका निर्माण होण्याची शक्यता नसे.

युरोपियन अधिकाऱ्यांचा वावर मराठी राजकारणात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात सुरु झाला. युरोपियन सेनापती, वकील, अधिकारी यांची नावे तत्कालीन मराठी भाषिकांना उच्चारणे अवघड जात असे. सोयीसाठी त्या इंग्रजी नावाचे प्राकृत रूप काही ठिकाणी रूढ झालेले दिसून येते. क्वचितप्रसंगी मूळ नावाशी संबंध राहातो तर कित्येक प्रसंगी मूळ नाव ओळखणे अवघड जाते यासाठी काही युरोपियन अधिकाऱ्यांची रूढ झालेली प्राकृत नावे तसेच देशी राजकारणातील काही व्यक्तींची सांकेतिक नावे याठिकाणी दिलेली आहेत.

**स्वकीयांची सांकेतिक (संज्ञिक) नामे-**

| | | |
|---|---|---|
| कपाटसंगम | - | कृष्णा-भीमा संगम |
| कृत्रिम | - | बारभाई |
| गुरुजी | - | महादजीपंत गुरुजी |
| धनगर | - | होळकर |
| नकारपूर्वक | - | नाना फडणीस किंवा नारो गणेश |
| पगडीवाले | - | नबाब, भोसले, हैदर |
| फतेआलिखान | - | टिपू सुलतान |
| फितूर | - | बारभाई |

बालकृष्ण - महादजी शिंदे
मकारपूर्वक - मोरोबा फडणीस
मर्कट - इंग्रज
मदारूल्महाम - नाना फडणीसाचा किताब
महीमाजी - (नाना फडणीस) कर्तृत्ववान
मामा - त्र्यंबकराव पेठे
मुधल - निजामअली
मौनत उल्ला - मशिर उल्मुल्क
भाई, अविंध किंवा - राणेखान भाई, महादजीचा मानलेला भाऊ
विशिख वा मुसलमान)
वाफगावकर - होळकर
वैष्णवीमाया - सगळी सूत्रे हालवणारी श्री विष्णूची माया
शिशू - सवाई माधवराव
सकारपूर्वक, वृध्द, बापू - सखारामपंत बोकील
सांब - राघोबा
हकारपूर्वक - हरिपंत फडके

**युरोपियन अधिकाऱ्यांची अपभ्रष्ट नावे**

इंद्रसेन - ॲण्डरसन
इपटीन - कर्नल अप्टन
इस्टन, इस्टीन - हेस्टिंग्ज्
इस्टुर चारलिस - स्टुअर्ट चार्लस्
उद्रीष्टीन - वेदरस्टोन
कलकतेकर - कॉर्नवालीस
करपरदाज - हेस्टिंग्ज्
कोट - जनरल कूट
गाडर - गोडार्ड
छोटासाहेब - फोरस्टर
जानसेन - जॉनसन
डबई, डबाई - दी बायन
धाकटा इंद्रसेन - डेव्हिड अँडरसन्
पापन, पापड पॉफम
बरवण, बुराण - ब्राऊन

| | | |
|---|---|---|
| बदाम | - | बॉडम |
| मटाटीण | - | मिडलटोन |
| मालत, मालीट | - | चार्लस मॅलेट |
| मुसा नारंज | - | मुसा नऱ्होना |
| मुसामुतीन | - | मॉनरीजीन |
| मुसाभुसी | - | बुसी |
| मुसा लेत्तुंब | - | भुसा लेस्तुन |
| मेघफरसन | - | मॅकफरसन् |
| मेवरास, मेवर | | कर्नल मूर |
| मारीत अस | - | मॉरीस |
| रण | - | कर्नल रँड |
| लुबा | - | लुबीन |
| लुस्तनो | - | मॉन्शर लेस्टीनोस |
| हरण | - | हॉर्न |
| हापड | - | हारपर |

अशा प्रकारची सांकेतिक नावे मोडीत विपुल संख्येने आढळतात. पैकी वर काही शब्द दिले आहेत. पुढे दोन सांकेतिक पत्रेही दिली आहेत. ती वाचून त्यातील व्यक्ती, स्थल इ. चा उलगडा त्या त्या शब्दापुढे कंसात दिला आहे. त्यावरून सांकेतिक शब्दांचा वापर कसा होत होता ते ध्यानात येईल.

### सांकेतिक पत्र - १

श्री

सेवेसी विज्ञापना ऐसीजे उभयताचे वैमनस्य येऊन स्थलांतर केले होते. मागती रहस्य होऊन पूर्वस्थानी सन्निध वासास पुरूष (फतेसिंग) आला. उभयता प्रकृति (अहमदाबाद) बरच आहेत. समाधान होण्याचे कारण एकितो की प्रकृत (अहमदाबाद) पुरुषाचे स्वाधीन करावी. लक्ष चार रुपये पेशजीचे तीन शिवाय पुरूषाने मर्कटास (इंग्रजास) आणि प्रकृत आपले जमेस करून घ्यावी. असा स्नेह ठरला. पुढे येऊन शेर होऊन माघारे गेल्या मार्गे आपल्या दर्शनास यावे असे मानस मर्कटाचे, पुरुषाचे विचार हे ठीक नाही. गेल्यामार्गे येऊ नये. आपली प्रजा श्रमी होते. याजकरिता मही दक्षिण तीरी न येता उत्तर तीराचे मार्गे अमोद देहज बारी यांवरुन खेबाईताजवळ अथवा अलीकडे उतरोन स्वामींचे दर्शन घ्यावे, असा परस्परे विचार होत आहे. पायागड, चंपानेर यांजकडे जाण्याचा प्रकार आपल्या व मागील सावकार (पाटीलबाबा) माल (फौज) घेऊन येण्याचा विचार आहे असे समजलियावर तूर्त राहिला. प्रकृतीहून निघोन माघारे

रेवा दक्षिण तीरी सर्वत्रांची दर्शने घ्यावी असा निश्चय होत आहे. मग पाहावे चंपानेरकडे गेलियास आपण सर्वत्र रेवा उतरतील आपली प्रजा पीडा पावल्यास आपला सर्व प्रकारे नाश असे पुरुषाचे विचारे आणि दुसरा प्रकार मर्कटास समजाविला आहे की चंपानेर पायागडाकडे गेलियास सिंधूचा सन्निधवास सुटोन जलरहित देशात जाणे घडते. काल देश पाहता दुर्घट विचार पडणार. असे रीतीची मसलत सांगोन माघारे आगमन मर्कटाचे (इंग्रजाचे) करून स्वामींची त्यांची समक्षता दक्षिणतीरी रेवाच्या करावी, म्हणजे आपण आजपावेतो केल्या कर्माचे सार्थक मूळची प्रजा राहिली. नवीन संपादिली तिचा उपयोग होऊन, तूर्तचे कारणे जो लाभ जाहला तो जाला. पुढे प्रसंगानुरूप घडेल तसा प्रकार पाहातच आहो. असा मनसुबा पुरुषाचा आहे, व चित्तात आणून माघारे आवाहन मर्कटाचे करावयाचे करीत आहेत. मग पाहावे. याप्रमाणे छ२० सफर मंदवार दोन प्रहरचे समजले वर्तमान सेवसी श्रुत असे. पुढे समजेल तसे सेवेसी विज्ञापना करीन. सेवेसी श्रूत होय हे विज्ञापना.

(महादजी शिंदे यांची कागदपत्रे ले. ८० संपा. गो. स. सरदेसाई)

**सांकेतिक पत्र - २**

श्री




विज्ञापना ऐसीजे ..........कोणी भिक्षुकाने बालबोध अक्षराने बावास (महादजीस) उगीच सूचना संज्ञिक लिहिले होते जे, आपण सिरोजेवर इंग्रजांचे पारपत्य केल्याची वर्तमाने आली. त्यांचा संतोष हकारपूर्वक (हरिपंत)व महिमाजीस (नाना फडणीस) नाही. बाह्यात्कारे संतोष मानीत असतात. परंतु आंतून उभयताचा विचार होतो जे इकडील पलटणांचे पारिपत्य करून त्रिंबक शेटीस (त्र्यंबकरावमामा) शिशू संनिध (सवाई माधवराव) ठेऊन दुकानचा कारभार (राज्य) आपण करावा. शत्रूची पारिपत्ये करावी. जो पर्यंत सोबती (होळकर) येऊ न पोहचत, त्या आधीच गुंता उरकून टाकावा. अेक सोबती (महादजी) सन्निध आहे. तितका पक्ष हरप्रयत्नेकरून तोडून कार्य गाठावे, या विचारात आहेत. अेसियास ये समयी कोणेही प्रकारे आपले येणे देशी व्हावे हे उत्तम. नाहीतर काही विचार ठीक दिसत नाही. आपले अन्न खातो म्हणून सूचना आपणास लिहिली आहे. सत्य मिथ्या श्री जाणे......

(महादजी शिंदे यांची कागदपत्रे ले. १५७ संपा. गो. स. सरदेसाई)






**शब्द-संक्षेप व्यवस्था**


**शब्दसंक्षेप** - मोडी लिपीत जलद लेखनासाठी जशी लपेटीदार पध्दत वापरलेली आढळते तसेच वारंवार येणारे शब्द विशिष्ट पध्दतीने त्याचा संक्षेप करून लिहिण्याची पध्दत आहे. जो शब्द मोठा असेल त्याचे संक्षिप्त रूप वापरून लिखाणाची गती त्यात वाढविली जाते. ऐतिहासिक कागदपत्रांतून नेहमी आढळून येणारे शब्द-संक्षेप खालीलप्रमाणे तीन गटात विभागता येतात.

१) बालबोधीप्रमाणे अक्षरानंतर पूर्णविराम देऊन त्याचे संक्षिप्त रूप केले जाते. जसे-

| मोडी | बालबोधी | स्पष्टीकरण |
|---|---|---|
|  | श्री. | श्रीयुत |
|  | रा. रा. | राजमान्य राजश्री |
|  | रा. ब. | रावबहादूर |
|  | चि. | चिरंजीव |
|  | ह.भ.प. | हरिभक्तपरायण |

२) शब्दातील आरंभीच्या अक्षरापुढे दोन उभ्या रेषा काढणे. जसे-



| **मोडी** | **बालबोधी** | **स्पष्टीकरण** |
|---|---|---|
|  | रु॥ | रुपये |
|  | मु॥ | मुक्काम |
|  | सा॥ | साष्टांग |
|  | मि॥ | मिती |
|  | ती॥ | तीर्थरूप |
|  | बि॥ | बितपसील |
|  | जि॥ | जिल्हा |
|  | यु॥ | युध्द |
|  | साौ॥ | सौभाग्यवती |
|  | गाो ॥ | गोसावी |
|  | चाा॥ | चाकर |






| | |
|---|---|
| श्री १ | भार्या, पूत्र |
| श्री २ | सेवक |
| श्री ३ | मित्र |
| श्री ४ | शत्रू |
| श्री ५ | स्वामी |
| श्री ६ | गुरु |
| ई ॥ | इस्तकबील |
| वो | वेदमूर्ति |
| पा | पाठविले |
| पौ | पैवस्त |









३) ऐतिहासिक कागदपत्रांतून बऱ्याचवेळा एकच शब्द-संक्षेप एकापेक्षा जास्त अर्थ व्यक्त करतो म्हणून ते विकल्पही नवख्या अभ्यासकाला माहीत असणे जरुर आहे. अन्यथा वाचनात एक तर अर्थहीनता येईल किंवा वाचन अशक्य होईल. संदर्भ लक्षात घेऊन या ठिकाणी त्यातील

कुठले वाचन वा अर्थ घ्यायचा ते तारतम्याने व अभ्यासानेच येऊ शकेल असे शब्द खालीलप्रमाणें आहेत.

| मोडी | बालबोधी | स्पष्टीकरण |
|---|---|---|
|  | व॥ | वद्य, वजारद, बलद |
|  | ब॥ | बाबत, बद्दल |
|  | स॥ | सबब, सरकार, साष्टांग |
|  | त॥ | तर्फ, तपशील, तालुका, तारिख, तागाईत, तकसीम, तपे. |
|  | ख॥ | खेरीज, खरेदी, खास, खाजगत. |
|  | खु॥ | खुर्दखत, खुर्दा, खुर्द, खुदायेवंत |
|  | नि॥ | निशाणी, निमित्त, निसबत |
|  | मु॥ | मुदत, मुकाम, मुताबिक मुहंमद |

| | | |
|---|---|---|
|  | वि॥ | विज्ञापना, विदीत, विनंती<br>विद्यमाने, विजारत, विद्यार्थी |
|  | मो॥ | मोकदम, मोर्तब, मोहर |
|  | सु॥ | सुध्दा, सुभे, सुमार, सुहूरसन |
|  | ह॥ | हस्ते, हद्द, हवाले |
|  | क॥ | कसबा, कर्यात कारकीर्द |
|  | पा॥ | पाठवले, परगणे, पासून |
|  | गु॥ | गुजारत, गुदस्त |

४) शेवटी 'र' असणाऱ्या शब्दाच्या अद्याक्षरापुढे दोन उभ्या रेषा काढून शेवटचे अक्षर काढले जाते जसे-

| मोडी | बालबोधी | स्पष्टीकरण |
|---|---|---|
|  | म।।र | मजकूर |
|  | क।।दार | कमाविसदार |
|  | हु ।।र | हुशार |
|  | द ।।र | दस्तूर |
|  | मोहोर | मोहरम |
|  | रबि।।वल | रबिलौवल (रौवल) |
|  | रवि।।खर | लबिलारवर (रखर) |
|  | जखर | जमादिलारवर |
|  | जौवल | जमादिलावल |
|  | ।।दार | इजारदार, इनामदार |

**रेघी हिशेबाची समजूत**

ऐतिहासिक कागदपत्रातून मोठ्या प्रमाणात आर्थिक घडामोडीसंबंधी, हिशेबी कागद पाहावयास मिळतात. जमीन महसुलाचे हिशेब, खंडण्यांची किंवा व्याजाची आकडेवारी, धान्य, जमिनीची खरेदी किंवा मोजणी करताना पूर्वी ती बहुतांशी रेघी पध्दतीत लिहिलेली आढळते. रकमा लिहिताना रुपये आणि पैसे यात लिहिल्या जात तर धान्य, तेल, तूप- खंडी, मण, शेर या परिमाणात लिहिले जाई. सोने, रुपे यासाठी तोळे, मासे गुंजा तर जमिनीसाठी बिघा, पाड, चावर हे परिमाण वापरलेले आढळते. त्यांचे वाचन करावयाचे झाल्यास ती पध्दती समजून घेणे जरुर आहे. त्यासाठी कोष्टके :—

| | |
|---|---|
| १२ पै १ आणा | 6 - रिक्तस्थान (आळे) |
| ४ पैसे १ आणा | । एक उभी रेघ - ४ आणे |
| १६ आणे १ रुपया | – एक आडवी रेघ - एक आणा |
| | आण्यापुढे । एक पैसा किंवा ३ पै |

प्रथम रुपयाचे स्थान त्यानंतर पावली व आधेली असते.

⊢ एक उभी रेघ म्हणजे १ पावली किंवा ४ आणे समजावे

|| दोन उभ्या रेघा म्हणजे १ अधेली किंवा आठ आणे असे वाचन होईल.

||| तीन उभ्या रेघा म्हणजे पाऊण रुपया किंवा बारा आणे होतील.

पावलीनंतर सुटे आणे येतात, जसे

⊢ म्हणजे ४ आणे + १ आणा = ५ आणे

6 = शून्य पावली दोन आणे

6≡ शून्य पावली तीन आणे

त्यानंतर पैसे किंवा पै येतात, जसे

। – । ४+१ आणा + १ पैसा किंवा ३ पै

।∸|| ४+१ आणा + २ पैसे किंवा ६ पै

। = ||| ४+२ आणे + ३ पैसे किंवा ९ पै

अभ्यासकाच्या सरावासाठी रेघी रकमा देऊन त्याचे वाचन पुढे दिले आहे.

| वाचन | रक्कम | रु. | आ. | | पैसे | पै |
|---|---|---|---|---|---|---|
| १) सव्वानऊ | ९। | ९ - | ४ | | - | - |
| २) पाउणे तेहतीस रु | ३२|||–। | ३२ | १२ | | १ किंवा ३ | |
| ३) सवाचार रु १ पैसा | ४।6– | ४. | ४. | | १. | |
| ४) सवा दोन आणे | 6=। | ०. | २. | | १. | |
| ५) पंचवीस रु सात आणे | २५⊧ | २५. | ४. | | ३ | |
| ६) पावणेदहा रु सवादोन आणे | ९||⊨। | ९. | १२. | २. | १. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७) सवाचार आणे | \| \| | ०. | ४. | १. |
| ८) पावणेएकेचाळीस रु. दोन पैसे | ४०\|\|\| \|\| | ४०. | १२. | २. |
| ९) सवाचोपन रु १ पैसा | ५४ \| \| | ५४. | ४. | १. |

धान्य, मीठ, गुळ या वस्तू कैलीत मोजल्या जात.

| | | | |
|---|---|---|---|
| \| | पाव, | १\| | सव्वा |
| \|\| | अर्धा पाव, - | १\|\| | दीड |
| \|\|⊢ | पाऊण, | २\| | सव्वा दोन |
| | | २\|\| | अडीच |
| | | २\|\|\| | पाऊणेतीन असे वाचन करतात. |

वजनी वजन एक खंडी म्हणजे

२० मण किंवा ८०० शेर किंवा ५७६०० टाक होतात.

कच्च्या वजनापेक्षा पक्के वजन ३ पट मोठे असते.

१ कच्चा खंडी = २० कच्चे मण किंवा ८०० कच्चे शेर १ पक्का खंडी = ३ कच्चे खंडी

१ पक्का मण = ३ कच्चे मण

१ पक्का शेर = ३ कच्चे शेर

| वजन | खंडी | मण | पायली | शेर | टाक |
|---|---|---|---|---|---|
| २\| ६४\|\|\|३\| | २\| | - | ४\|\|\| | - | ३\| |
| ६\|\|६९- | | \|\|\| | - | - | ९ |
| १६२\|१ | १ | - | २\| | १ | - |
| ६३६८\|\|६\|\| | | ३ | ६ | ८\|\|\| | ७\|\| |
| १६२६९ | १ | - | २ | - | ९ |
| \|\|६२६ | \|\|\| | - | २ | \|\|\| | - |
| ६६६९ | - | - | - | ९ | - |
| ६१६१\|\| | - | | १ | १\|⊢ | \| |
| ६६२\| = | - | - | २\| | ⊦ | = |
| ६\|२६ = | - | \| | २ | \|\| | = |
| ६\|१२६१ | - | \| | २ | - | १ |
| ६४\|१\|\|⊢ | - | ४\| | १\|\|\| | \| | - |

क्वचित प्रसंगी खाली दिल्याप्रमाणेही पैशाचा हिशेब दिलेला आढळतो.

| रक्कम | | स्पष्टीकरण | | |
|---|---|---|---|---|
| | | रू. | आणे | पै |
| ३०४०८ | = | ३ | ४ | ८ |
| ६०१०९ | = | ६ | १ | ९ |
| १८०३०९ | = | १८ | ३ | ९ |
| ३९०॥ | = | ३९ | | ६ किंवा २ |
| २०० | = | २० | १ | |
| ७०४०१ | = | ७ | ४ | १ |
| जमीन बीघे | | बीघे | | पाड |
| ०७॥१॥ | | ७॥ | | १॥ |
| ०४ बीघे | | साडे सात बीघे | | दीड पाड |
| | | चार बीघे | | |

**जमीन मोजणी बाबतचे नमुना कोष्टक :-**

| | | |
|---|---|---|
| एक तसू | = | करांगुली ते तर्जनी एवढे अंतर |
| एक गज | = | २० किंवा २४ तसू |
| एक काठी | = | ५ हात आणि ५ मुठी अंतर |
| एक बिघा | = | ४०० चौरस काठ्या |
| एक शिवशाही बिघा | = | ३९२६. दोन त्रितियांश (२/३) यार्डस |
| एक पाड | = | २० काठ्या |
| एक चावर | = | १० बिघे किंवा २४ रुके |
| एक चावर | = | ७२ टके |
| एक सजगणी | = | ६ रुके |

जमीन मोजणीची जी परिमाणे विशेषतः कर्नाटकात, १७ व्या-१८व्या शतकात रूढ झाली ती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ आणा जमीन | = | ७५६२५ चौरस यार्ड जमीन |
| १ मार " | = | १६ ते ८० अेकर जमीन |
| अर्धा पटी " | = | २५ एकर पावणे सहा गुंठे दोन आणे जमीन |
| १ बयाळे " | = | दोन आणे जमीन |
| १ कुरगी " | = | ५ अेकर जमीन |
| १ रूका " | = | सुमारे १० बीघे जमीन |
| १ टका " | = | २४ रूके जमीन |
| ६ कुळवण" | = | १६ अेकर ८ बीघे जमीन |
| १ पायली " | = | १ रूका जमीन |

## विविध कालगणना

**कालगणना** - ऐतिहासिक मोडी कागदपत्रातून अनेक प्रकारच्या कालगणना किंवा सन वापरलेले दिसून येतात. म्हणून त्यांची माहिती देऊन त्यांच्यातील परस्पर रूपांतर कसे केले जाते याची माहिती या ठिकाणी त्रोटक स्वरुपात दिली आहे.

**अ) मुस्लीम कालगणना -**

**१) हिजरीसन** - मुहमद पैगंबराने मक्केहून मदिनेस पलायन केले तेव्हापासून हिजरी सनाचा प्रारंभ मानतात. त्यांत ५९० वर्षे मिळविली असता इ. स. मिळतो.

**२) फसलीसन** - फसली म्हणजे फसल अर्थात पीक तयार होण्याचा हंगाम. त्यावरून या सनाला फसली हे नाव पडले. त्याचे उत्तर आणि दक्षिण असे दोन भाग असून दक्षिण फसलीत ५९० किंवा ५९१ मिळविले असता इ. स. येतो. तसेच उत्तर फसलीत ५९२ किंवा ५९३ मिळवावे लागतात तेव्हा इ. स. मिळतो. सामान्यतः हा सन अकबराने सुरू केला असे मानतात.

**३) सुहूरसन** - यालाच बऱ्याच वेळा अरबी सन असेही म्हणतात. हा सन कोणी आणि केव्हा सुरू केला याची नेमकी माहिती मिळत नाही तथापि उत्तरेतील फसली वर्षाच्या तत्वावर दक्षिणेत मुघलांनीच तो सुरू केला असावा. त्याचे इ.स. मध्ये रुपांतर करताना ५९९ वर्षे मिळवावी लागतात.

**४) इलाही वर्षे** - हिजरी कालगणनेस इस्लाम धर्म कल्पनेत खूप महत्त्व असले तरी ती कालगणना चंद्रानुसार असल्याने व्यवहारात बऱ्याच वेळा अडचणी निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी अकबर बादशहाने आपल्या २९व्या राज्यप्रातीच्या म्हणजे इसवी १५८४ मध्ये तारीख-इ-इलाही किंवा इलाही कालगणना सुरू केली. या सनाचा प्रारंभ अकबराच्या राज्य प्राप्तीपासून म्हणजे इसवी १५५६ मानला गेला. पुढे जहांगिर बादशाहच्या काळात जुलूस वर्ष (राज्यरोहणाचे वर्षापासून) मोजण्यास प्रारंभ झाला. तथापि थोड्याफार प्रमाणात इलाही कालगणनात अगदी शेवटच्या बादशहाच्या अमलापर्यंत वापरात होती. त्याचे इसवी सनात रूपांतर करताना त्यांत १५५६ वर्षे मिळवावी लागतात.

इलाही वर्ष १०५ म्हणजे इ.स. १६६१.

**५) जुलूस वर्ष** - स्वतःच्या राज्यप्राप्तीपासून नवी कालगणना रूढ करण्याची प्र... ात फार प्राचीन आहे. मुघली बादशहांनी स्वतःच्या राज्याभिषेकापा... ा कालगणना सुरू केल्या. त्यांना जुलूस वर्ष म्हणतात. जुलूस वर्षाचे इसवी मध्ये रूपांतर करता येण्यासाठी त्या विशिष्ठ बादशहाचे राज्यारोहण वर्ष आपल्या... माहीत असावे लागते. ते पुढे दिले आहे.

| बादशहा | राज्याभिषेक वर्ष |
|---|---|
| अकबर | १५५६ इसवी |
| जहांगीर | १६०५ इसवी |
| शाहाजहान | १६२८ इसवी |
| औरंगजेब | १६५८ इसवी |

जहांगीरचे जुलस वर्ष १० म्हणजे इ.स. १६१५
शाहाजहानचे जुलूस वर्ष १५ म्हणजे इ.स. १६४३
औरंगजेबाचे जुलूस वर्ष २५ म्हणजे इ.स. १६८३.

याप्रमाणे कोणत्याही बादशाहचे जुलूस वर्षा वर्षाचे इ.स. मध्ये रूपांतर करता येईल.

**आ) हिंदू कालगणना -**

हिंदू कालगणनेतील प्रमुख शक म्हणजे विक्रमसंवत् शालिवाहन शक आणि शिवराज्याभिषेक शक .

१) विक्रमसंवत् — विक्रमादित्याने सुरू केला. त्यातून १३५ वर्षे वजा केली असता शालिवाहन शक मिळतो.

२) शालिवाहन शक — कलियुगाची ३१७९ वर्षे झाल्यावर हा शक सुरू झाला असे मानतात. शालिवाहन शकात सुमारे ७८ वर्षे मिळविली असता इ.स. मिळतो.

३) राज्याभिषेक शक — शिवाजीमहाराजांनी मराठ्यांचे राज्य सुस्थिर व कायमचे झाले असे जाहीर करण्यासाठी राज्याभिषेकानंतर स्वतंत्र कालगणना सुरू केली. शक १५९६ किंवा इसवी १६७४ हे या शकाचे पहिले वर्ष मानले गेले. त्याचा कागदोपत्री वापर शाहूमहाराजांच्या अखेरीपर्यंत होताना दिसतो. राज्याभिषेक शकामध्ये १६७४ वर्षे मिळविली असता इसवी मिळतो.

**तारीख व वर्ष देण्याची मुसलमानी अक्षरी पध्दती**

मुसलमानी कालगणनेच्या माहितीतील दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अरबी आकडे, लेखनपध्दती आणि महिन्यांची नावे ही होय.

**संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ईहीदे | ६ | सीत |
| २ | इसन्रे | ७ | सबा |
| ३ | सलास | ८ | समान |
| ४ | आरबा | ९ | तीसा |
| ५ | खमस | १० | अशर |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | अशरीन | ७० | सबैन |
| ३० | सलासीन | ८० | समानीन |
| ४० | आर्बैन | ९० | तीसैन |
| ५० | खमसैन | | |
| ६० | सीतैन | | |

| | |
|---|---|
| १०० | मया |
| २०० | मयातैन |
| ३०० | सलासमया |
| ४०० | अर्बामया |
| ५०० | खमसमया |
| ६०० | सीतमया |
| ७०० | सबामया |
| ८०० | समानमया |
| ९०० | तीसामया |
| १००० | अलफ |

एखादा अैतिहासिक कागद आपल्यापुढे आला तर तो ढोबळ मानाने शिवकालीन आहे की पेशवेकालीन आहे की आंग्लकालीन आहे हे ओळखण्याची सोपी पध्दत खालीलप्रमाणे आहे.

**शिवकालीन** - पत्राच्या तारखेत प्रथम अलीफ हा शब्द (१०००) येतो व नंतर बाकीचे शब्द येतात. (त्यात ६०० वर्षे मिळविली असता इसवी १६०० ही संख्या तयार होते.

उदाहरणार्थ -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तीसा | | तीसैन | | अलफ | |
| ९ | + | ९० | + | १००० + ६०० | इसवी १६९९ |
| खमस | | अर्बेन | | अलफ | |
| ५ | + | ४० | + | १००० + ६०० | इसवी १६४५ |
| इसने | | सलासैन | | अलफ | |
| १ | + | ३० | + | १००० + ६०० | इसवी १६३१ |
| इसने | | सीतैन | | अलफ | |
| १ | + | ६० | + | १००० + ६०० | इसवी १६६१ |

पेशवेकालीन कागद असेल तर त्याच्या तारखेत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अशर | | मया | | अलफै असे शब्द येतात. |
| १० | + | १०० | + | १००० |

सुहूरसन १११० त्यात ६०० मिळविले असता इसवी मिळतो.

इसने अशर मया अलफै
२ + १० + १०० + १००० + ६०० = इसवी १७१२
सीत अशर मया अलफै
६ + १० + १०० + १००० + ६०० = इसवी १७१६
अर्बा अशर मया अलफै
४ + १० + १०० + १००० + ६०० = इसवी १७१४
तीसा तीसैन मया अलफै
९ + ९० + १०० + १००० + ६०० = इसवी १७९९

पेशवाई अखेरचा किंवा आंग्लकालीन कागद असेल तर त्यांत मयातैन व अलफै असे शब्द येतात.

तीसा अशर मयातैन अलफै
९ १० + २०० + १००० + ६०० = इसवी १८१९
इहीदे अर्बैन मयातैन व अलफै
१ + ४० +२०० + १००० + ६०० = इसवी १८४१
खमस+ अशरीन +मयातैन व अलफै
५ + २० + २००+ १००० + ६०० = इसवी १८२५
सबा + अशर मयातैन व अलफै
७ + १० + २०० + १००० +६०० = इसवी १८१७
इसने सलासैन मयातैन व अलफै
१ + ३० + २०० + १००० + ६०० = इसवी १८३१
अर्बा खमसैन मयातैन व अलफै
४ + ५० + २०० + १००० + ६०० = इसवी १८५४

**अरबी महिने आणि त्यांचे संक्षेप स्पष्टीकरण**

१) मोहर - मोहरम
२) सफर - सफर
३) रौवंल - रबि लौवल
४) राखर - रबिलाखर
५) जौवल - जमा दिलावल
६) जाखर - जमा दिलाखर
७) रजब - रजब
८) साबान साबान
९) रमजा - रमजान

१०) सवाल - सवाल
११) जिलका - जिलकाद
११) जिल्हेज - जिल्हेज

**वार** - आज पंचागात रूढ असलेल्या वारांना पूर्ण वेगळी आणि वैकल्पिक नावे मराठी कागदपत्रातून आढळून येतात. ती खालीलप्रमाणे -

**रविवार** - भानू, अर्क, आदित्य, इ.
**सोमवार** - अब्ज, चंद्र, इंदूवासर
**मंगळवार** - कुज, अंगारक, भौमवासर
**बुधवार** - सौम्य, विद
**गुरुवार** - भृगु, उशनस
**शुक्रवार** - शुक्रवार
**शनिवार** - मंदवार, पंगू, स्थिरवार

**वर्षचक्र** :- हे साठ वर्षांचे असून त्यातील प्रत्येकाला एकेक नाव दिलेले असते, त्याला संवत्सर म्हणतात. साहजिकच त्यांची संख्याही साठ होते.

ती नावे खालीलप्रमाणे-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) प्रभवा | नाम | संवत्सर | १६) चित्रभानू | " | " |
| २) विभव | " | " | १७) सुभानू | " | " |
| ३) शुक्ल | " | " | १८) तारण | " | " |
| ४) प्रमोऽथ | " | " | १९) पार्थिव | " | " |
| ५) प्रजापती | " | " | २०) व्यय | " | " |
| ६) अंगिरस | " | " | २१) सर्वजित | " | " |
| ७) श्रीमुखी | " | " | २२) सर्वधारी | " | " |
| ८) भावो | " | " | २३) विरोधी | " | " |
| ९) युवा | " | " | २४) विकृति | " | " |
| १०) धाता | " | " | २५) खर | " | " |
| ११) ईश्वरो | " | " | २६) नन्दन | " | " |
| १२) बहुधान्य | " | " | २७) विजय | " | " |
| १३) प्रमाथी | " | " | २८) जय | " | " |
| १४) विक्रम | " | " | २९) मन्मथदुर्मुख | " | " |
| १५) कृष | " | " | ३०) " | " | " |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१) हेमलंबी | ” | ” | ४६) परिधावी | ” | ” |
| ३२) विलंबी | ” | ” | ४७) प्रमादी | ” | ” |
| ३३) विकारी | ” | ” | ४८) आनंद | ” | ” |
| ३४) शार्वरी | ” | ” | ४९) राक्षस | ” | ” |
| ३५) प्लव | ” | ” | ५०) नल | ” | ” |
| ३६) शुभकृ | ’ | ” | ५१) पिंगल | ” | ” |
| ३७) शो[illegible]न | ” | ” | ५२) काल | ” | ” |
| [illegible] | ” | ” | ५३) सिध्दार्थ | ” | ” |
| [illegible]) विश्ववसुपराभव | ” | ” | ५४) रौद्रदुर्मती | ” | ” |
| ४०) विश्ववसुपराभव | ” | ” | ५५) रौद्रदुर्मती | ” | ” |
| ४१) प्लवंग | ” | ” | ५६) दुंदुभी | ” | ” |
| ४२) किलक | ” | ” | ५७) रुधिरोद्गारी | ” | ” |
| ४३) सौम्य | ” | ” | ५८) रक्ताक्ष | ” | ” |
| ४४) साधारण विरोधकृत | ” | ” | ५९) क्रोधन | ” | ” |
| ४५) साधारण विरोधकृत | ” | ” | ६०) क्षय | ” | ” |

## मुद्रा आणि शिक्के

### छत्रपतींचे शिक्के

**शिवाजीची राजमुद्रा--** प्रतिपच्चंद्र
लेखेव वर्धिष्णुर्वि श्व वंदिता ॥ शाहसु
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते।

**संभाजीचा शिक्का–** श्री शंभोः
शिव जातस्य मुद्राद्यों
रिव राजते यदं
सो विनो लेखा वर्तते कस्य नी
परि.

**राजारामाचा शिक्का–** श्री धर्म प्र
द्योतितां शेषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते।

**(१)-शाहूचा शिक्का–** श्री
वर्धिष्णुर्विक्रमै विष्णोः
सा मूर्तिरिव वामनी
शंभु सुनो रिव
मुद्रा शिवराजस्य
राजते॥

**(२) शाहूचा सरदेशमुखीचा शिक्का-** स्वस्ती श्री सुखदा
मुद्रा प्रतापोत्कर्ष
वर्द्धिनी॥ सरदेश
मुखस्येषा शाहू
राजस्व राजते

**पेशव्यांचे शिक्के -**

| | | |
|---|---|---|
| **मोरोपंत पिंगळे -** | शिवचरणी तत्पर<br>त्र्यंबकसुत<br>मोरेश्वर | |
| **बाळाजी विश्वनाथ -** | श्री<br>श्री उमाकांत<br>पदाभीज भजनाम<br>समुन्नते ।। बालाजी<br>विश्वनाथस्य मुद्रा<br>विजयते तराम | |
| **थोरले बाजीराव -** | (१) श्री<br>राजा शाहू<br>नरपति हर्षनि<br>धान बाजीराव<br>बलाल प्रधा<br>न | (२) श्री<br>राजा शाहू<br>नरपति ह<br>र्षनिधान विश्व<br>नाथ सुत बला<br>ळ प्रधान |
| **नानासाहेब पेशवे -** | (१) श्री<br>राजाराम नर<br>पती हर्ष निधान<br>बाळाजी बाजी<br>राव प्रधान | (२) श्री<br>राजा शाहू नर<br>पति हर्षनिधान<br>बाळाजी बाजी<br>राव प्रधान |
| **रघुनाथराव उर्फ राघोबा -** | श्री सांब<br>सपुत्रो विजयते राजा<br>शाहू नरपति हर्षनिधा<br>न रघुनाथ बाजीराव<br>मुख्य प्रधा | |
| **थोरले माधवराव पेशवे -** | श्री<br>राजाराम<br>नरपति माधव<br>राव बलाल<br>प्रधान | |

**सवाई माधवराव -**

श्री
राजा शाहू नर
पति हर्ष निधा
न माधवराव ना
रायण मुख्य
प्रधा

**दुसरा बाजीराव –**

श्री
राजा शाहू नरप
ति हर्ष निधान बाजी
राव रघुनाथ मु
ख्य प्रधान

## कांही सरदारांचे शिक्के -

**धनाजी जाधव -**
**सेनापती**

श्री
राजाराम चरणी दृढभा
व सेनापति ध
नाजी जाध
व राव

**कान्होजी आंग्रे -**
**सरखेल**

श्री
शाहू नृपती प्रीत्या
तुकोजी तनुजन्मनः का
न्होजी सरखेलस्य मुद्रा
जयति सर्वदा

**पिलाजी जाधव -**

श्री पांडुरंग
चरणी दृढभाव
चांगोजी सुत
पिलाजी जाधव

**दमाजी गायकवाड -**
**सेनाखासखेल**

श्री राजाराम छ
त्रपति अखिल प्रौढप्रता
प पुरंदर दमाजी गाये
कवाड सेनाखासखेल
समसेर बहादर

**जानोजी भोसले -**

श्री
श्री शाहूरा
ज पदांभीजभ्रम
रायित चेतसः बि
बात्मज समुद्रै
षा राघवस्य
विराजते

**साबाजी भोसले -**

श्री
रघुविर च
रणी तत्पर सा
बाजी भोसले निरंतर

**खंडेराव दरेकर - सरलष्कर**

श्री
चरणी तत्पर
जयाजीसुत खंडेराव
दरेकर सरलष्कर

**मुरारराव घोरपडे -**

श्री च
रण भजन तत्पर
तत्सुत मुरारजी घोरपडे
निरंतर

**महादजी शिंदे -**

श्री
ज्योतिस्वरूप चरणी
तत्पर राणोजीसुत
महादजि सिदे निरतर

**दौलतराव शिंदे - -**

श्री
जोतिस्वरूप च
रणी तत्पर महाद
जी सुत दवलतरा
व शिदे निरत
र

**मल्हारराव होळकर --** श्री म्हाळसा
कांत चरणी त
त्पर खंडोजी सुत
मल्हारजी हो
ेळकर

**प्रतिनिधी -** श्री आई आदि पुरुष
श्री राजा शाहू छत्र
पति स्वामी कृपा
निधितस्य परशराम
त्र्यंबक प्रतिनिधी

**पत्रलेखनातील विविध मायने-**

ऐतिहासिक पत्रलेखनात मायन्यांना फार महत्त्व असते, त्यावरून पत्र पाठविणारा आणि स्वीकारणारा यांचे संबंध आपोआप स्पष्ट होतात. मालकाने आपल्या हाताखालच्या व्यक्तीस कोणता मायना लिहावा, विद्वान व्यक्तीस काय लिहावे, आश्रिताने छत्रपतीस अथवा पेशव्यास काय मायना लिहावा, याचे संकेत स्पष्ट ठरलेले होते व ते कटाक्षाने पाळलेही जात. हे मायने माहीत असले तर मोडी वाचनात अडचण येणार नाही. काही महत्त्वाचे आणि वारंवार येणारे मायने खालीलप्रमाणे आढळतात.

- अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री - गोसावी
- चिरंजीव राजमान्य राजश्री
- राजश्रीया विराजित राजमान्य राजेश्री
- अपत्ये चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार (किंवा) दंडवत
- पोष्य - साष्टांग नमस्कार विनंती उपरी
- वेदशास्त्रसंपन्न राजश्री
- चिरंजीव राजमान्य राजश्री - आसिर्वाद
- सेवेसी विज्ञापना ऐसीजे
- श्री सकलगुणरूपसंपन्न अखंडित लक्ष्मी आलंकृत
- राजमान्य राजेश्री - स्नेहांकित
- श्रीमंत सौभाग्यवती वज्रचुडेमंडीत मातुश्री - बाई साहेबाचे सेवेसी प्रति राजेश्री
- अजस्वारी राजश्री
- पूर्वसंप्रदाय आपणास विदीत आहेच विशेष

- साहेबाचे खिजमतीस
- प्रति समस्त ब्राह्मण क्षेत्र - साष्टांग नमस्कार उपरी
- श्रीमत सर्वज्ञतम राजेश्री - साहेब शुभेच्छा
- प्रभुवर्येषु श्रीमत राजश्री रावसाहेब यांसी
- वेदशास्त्रसंपन्न राज्यसभास्तभीभूत राजेश्री-
- स्वस्तिश्रीमान्नि खिलवसुधा मूर्धावतस
- श्री कृष्णातीर स्थळी भयेत विराजित समस्त ब्राह्मण समुदायेणां
- सकलगुण कृपा पारंगत राजेश्री प्रभूवर्य सिरोमणि प्रति अनेक आशिर्वाद

-श्रीमत हरिभक्त परायण राजमान्य राजश्री
- श्रीमद तुलाधिषण वैभवोपार्जित साम्राज्य लीण लक्ष्मी रक्षण दंडितो दंड दोर्दंड गोब्राह्मण प्रतिपालक श्री-
- श्रीमत्परमहंस परिव्राजकाच्यार्य येमानियमासन प्राणायाम प्रेत्याहार ध्यान धारण समाध्यष्टांगयोग अनुष्ठान तिष्ठतपश्चकवर्त्यनाद्य निछिन्न गुरुपरंपरा प्राप्त षडदर्शन स्थापनाचार्य ऋष्यश्रृंग पुरवराधिश्वर श्रीमत्संराशच्यार्यान्वय संजाता भिवन श्री विद्या शंकर भारती स्वामी रकंजोद्‌भव- करकंजोद्‌भव-

-सकलतीर्थ स्वरूप गंगाजल निर्मल मातुश्री गंगाजान्हवी मातुश्रीबाईसाहेबाचे सेवेसी

-सहस्त्रायु चिरंजीव विजयी भव
- श्रीमत सदगुणानिधान कृपानिधान प्रताप वरिष्ठाभिधान निरंतर भगवदनुसंधान सावधान श्री माहाराज - दंडवत
- आश्रीत -
- विद्यार्थी -
- पुण्यसील बाई -
- अजरख्तखाने खुदायेवंद
- स्वस्तीश्री राज्याभिषेक शक क्षत्रिय कुलवतस श्रीराजा शिवछत्रपति

याणी आज्ञा केली अैसीजे-
- चरणरज - चरणांबुजावरी मस्तक ठेवून साा नमस्कार

-श्रीमत महाराजाधिराज प्रतापोर्जित विश्रामधाम
परउपकारार्थ आवतरण राजश्री पंडित प्रधान स्वामीजीचे सेवेसी.

-श्रीमत माहाराज धर्मधुरंधर राजश्री पंडित प्रधान - स्वामी गोसावी यांचे सेवेसी

-श्रीमत उत्तमगुण परिपूर्ण अखंडित लक्ष्मी प्रसन्न राजमान्य राजश्रीया विराजित पंडित स्वामी गोसावी यांचे सेवेसी


-श्रीमत सकलगुणालंकरण विद्वजनमंडण धर्ममूर्ति परायण गोद्वित प्रतिपालन अखंडित लक्ष्मी प्रसन्न माहाराजाधिराज राजश्री रावसाहेबाचे सेवेसी


# भाग ३ ऐतिहासिक आणि आधुनिक पत्रांचे नमुने

**मूळ पत्रांचे आधार खालील क्रमाने अस्सल नमुनापत्रे पुढे दिली आहेत** (ही पत्रे पुणे लेखाभिगारातील आहेत)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **दान पत्र** | | संशोधनासाठी निवडलेले कागद (संनिका) रुमाल ५५ पुडके १ पत्र - २४४०४ |
| २) | **आज्ञापत्र** | - | पुणे जमाव रु. २२१ |
| ३) | **वाटणीपत्र** | - | पुणे जमाव रु. १६७४ |
| ४) | **जाहिरनामा** | - | संनिका रु. २८ पुडके ४ पत्र १५३७२ |
| ५) | **फर्मान** | | संनिका रु. ५५ पुडके २ पत्र २४४३२ |
| ६) | **चकनामा** | - | खानदेश जमाव रु.४२ |
| ७) | **राजपत्र** | | संनिका रु. ४८ पुडके ४ पत्र २१०३७ |
| ८) | **नेमणुकपत्र** | - | कर्नाटक जमाव रु. ४९ |
| ९) | **दस्तक** | | संनिका रु. २८ पुडके ८ पत्र १५७७४ |
| १०) | **अखबार** | - | संनिका रु. २८ पुडके ८ पत्र १५६७५ |
| ११) | **अभयपत्र** | - | पुणे जमाव रु. २२१ |
| १२) | **इनामपत्र** | - | संनिका रु. ५३ पुडके १ पत्र २३९११ |
| १३) | **बोट खत** | - | कर्नाटक जमाव रु. ४९ |
| १४) | **कतबा** | - | पुणे जमाव रु. २२१ |
| १५) | **ताकीद** | - | संनिका रु. ४८ पुडके २ पत्र २०८६४ |
| १६) | **जामीनपत्र** | - | संनिका रु. ५६ पुडके २ पत्र २५२२१ |
| १७) | **राजिनामा** | - | संनिका रु. ५६ पुडके २ पत्र २५२२७ |
| १८) | **करारकतबा** | - | कर्नाटक जमाव ३६३ |
| १९) | **रकमाला** | - | कर्नाटक जमाव ३६३ |
| २०) | **जप्तीपत्र** | - | कोकण जमाव ४३२ |
| २१) | **चिठी** | | कोकण जमाव ४३२ |
| २२) | **अग्रहार** | - | शाहू दप्तर रु. ३५ पु.१ पत्र ४५०७१ |
| २३) | **ताळेबंद** | - | पुणे जमाव रु. १६७४ |
| २४) | **पावती** | - | कोकण जमाव रु. ४३२ |
| २५) | **आजमास** | - | कोकण जमाव रु. ४३२ |
| २६) | **खरेदीखत** | - | पुणे जमाव रु. १६७४ |

**पत्रांक १-दानपत्र**






5231


# पत्रांक १ - दानपत्र

श्री नकल

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ४७ शार्व
री नाम संवत्सरे भाद्रपद बहुल दसमी भृगुवा
सर क्षेत्रीय कुलवतस
श्री राजा शंभु छेत्रपती
स्वामी याणी वेदशास्त्र संपन्ने राजश्री देव
दत कविद्र बीन परमानद कविद्र गोत्र काशेप
शाखा तैतरीये सूत्र आपस्तब यासी दि
ल्हे दानपत्र अैसीजे तुम्ही स्वामीच्या राज्याती
ल परपरागत आश्रीत विद्वान भले सिष्ट
तुमचे सर्व प्रकार चालवण हे स्वामीस परम आ
वश्यक तुम्हास श्रीमत मातुश्री आई साहेबी
विलंबी नामसवत्सरी वैशाख सोमवती अमावशा
पर्वकाली मौजे पेदूर ताा सिराले हा गाव धारापत
दिल्हा आहे अैसियासी तुम्ही बहुत भले सिष्ट
विद्यासपन्ने तुमचे चालविल्याने बहुत
श्रेयेस्कर यास्तव तुम्हास मौजे पेदूर ताा सिराले
प्राा मजकुर हा गाव कुलबाब कूल कानू हाली पटी
व पेस्तरपटी जल तरु पाषाण नीधी निक्षेप सही
त खेरीज हकदार व इनामदार करुन मौजे माार धारा
पत सहिरोण्योक इनाम सर्वमान्य करुन दिल्हा
असे तरी तुम्ही मौजे मजकुर पूर्वमयदि प्रमाणे
चतु:सीमा करुन आपले स्वाधीन करुन घेणे
आणी इनाम तुम्ही व तुमचे पूत्र पौत्रादी
वंशपरंपरेने अनभवून सुखरुप राहाणे
नीदेश समक्षे

पत्रांक २-आज्ञापत्र






## पत्रांक २ - आज्ञापत्र


श्री


आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताा मोकदमान
मौजे सवेत ताा हवेली प्रांत पुणे सु।। खमसतीसैन म
या व अलफै वेदशास्त्रसंपन्न राजश्री लक्ष्मण भट
कर्वे याणी हुजूर विदीतकेले की मौजे मजकुरी म्हसा
जी पाा भोडवे यास राजपत्री जमीन मला ईनाम आहे.
त्यापैकी तीसरा वाटा त्याणी आम्हास जमीन आबा जाबली
व विहिरीचे पाणी सुधा रू।। ८०० आठसे यास खुशरजावदीने खरेदीपत्र करून
दिल्हे त्यात चतु:सीमा लिहीली आहे पूर्वेस श्री अनंत देव
याची वाटणी दक्षणेस काटवण- व सरोवराचा
बांध पश्चमेस म्हसाजीची वाटणी उत्तरेस पाणद
गावची याची मोजणी दक्षण उत्तर काठ्या सुमार ५९
येकूणसाठ व पूर्वपश्चम काठ्या सुमारे १९ येको
णीस या प्रो आहे ते जमीन आम्हाकडे सुरलीत चाल
वीत ते केले पाहिजे म्हणोन त्याजवरुन हे आज्ञापत्र
सादर केले असे तरी सदरहु जमीन म्हसाजी पाा भोडवे
याणी आपली इनाम भटजीस फरोस्त देवून पत्र करू
न दिल्हे आहे ते चालत आल्या प्रो वेदमूर्तिकडे
चालविणे जाणीजे छ १७ रमजान आज्ञा प्रमाण
मोर्तब असल बरहुकुम रूजू पाहाणार

कावजी आबाजी देशपांडे

पत्रांक ३-वाटणी पत्र


INAM COMMISSION
B
1550






# पत्रांक ३ - वाटणी पत्र


श्री                नक्कल


अखंडित लक्षुमी आलंकृत । राजमान्य राजश्री नारो आपाजी। गोसावी यास। सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार। सु॥ सीत सीतैन मया व अलफै वो। राजश्री भास्कर देव व गणपती देव। व गड्याबा देव चिंचवडकर याची व दिवाकर देव याची वाटणी पुर्वी। श्री आपा देव याणी वृत्ती व गाव। गनगोटे वगैरे इनाम व दस्तके दे। खील वाटणी करून दिल्ही त्या प्रो। वीस वर्षे चालत असता हाली दिवा। कर देव गाव खेडी याचा वाटणी। विशई कजिया करितात की आपण। वडिलभाऊ आपणास दोन गाव द्यावे। आणि येक गाव त्रिवर्गानी घ्यावे यै। से चिरंजीव राजश्री राव यासी स। मक्ष जावून कजिया करणार म्हणौन हू। जूर विदीत जाले त्याजवरून हे प। त्र तुम्हास सादर केले असे तरी याची। वाटणी पूर्वी आपा देव याणी क। रून दिल्ही त्याप्रो आज वीस वर्षे। चालत आले आहे त्याप्रो चालवणे। नविन न करणे गावाची जत्पी केली। असेल तरी मोकली करणे जाणीजे। छ२२ साबान बहुत काय लिहिणे पंच। वीस वर्ष चालत आले आसल त्या प्रो खासा स्वारी येईतो चालवणे.

* सदरहूचे असल पत्र देवानी आपले पासी ठेवीले असे त्यास पासी द्यावयासी रसानगी विठ्ठल मानाजी पत्र बोलेबा देव

## पत्रांक ४-जाहीरनामा







## पत्रांक ४ - जाहीरनामा


श्री


जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपणी इग्र
ज बहादूर सु॥ समान अशेर मयातैन व अलफै
तमाम लोकास जाहीर होण्याकरीता ली॥ जाते
जे बाजीराव साहेब याची फौज त्याजकडून
निघोन फुटाफुट होऊन आपला ठिका
णास आले व येत आहेत व कितेकाची बोल
णी कंपणी सरकारचा कौल असावा म्हणौन
आली सबब सर्वास महशूर व्हावयाकरी
ता ली॥ जाते जे बाजीरावसाहेब याजकडी

ल लोक मुल्कात आले आहेत व येतात व
येतील त्याणी येक महिन्याचे आत आ
पलाले घरी जाऊन राहावे कोणी जमुन रा
हू नये त्यास कंपणी सरकारचा इलाज होणार
नाही जे कोणी मुलकात फिरतील व कट
व बंड करतील आगर पनास ज़मून राह
तील किंवा इकडून फिरौन बाजीराव साहे
ब याजकडे जातील त्याचा मुलाईजा हो
ता बडे असे समजोन त्याचे पारपत्ये हो
ऊन प्राणासी जातील तारिख १० माहे
मे सन १८१८ इसवी मु।। छ४ रजब

पत्रांक ५-फर्मान

श्री






# क्रमांक ५ - फर्मान


श्री

फर्मान हुमायून शरमनी काजयात्फ बज्याने
क खान आजम चंगीरखान सरनोबत दिवाण
अली नामजाद हवालदारी व नाईब गैबती व
कारकुनानी बंदर मैमुन-मुस्तफाबाद आं
के दरीविला तानाजी बिन राघोजी कोकणरा
व देसाई मामले हमजाबाद याही हूजूर ये
ऊन अर्ज केला की देसाईगीरी मामले मजकूर
चि कदीम व सालाबाद मिरास आपले वडी
लाची आहे बदल देसाईगीरीची तैनात मौजे
पाटपनाले व पाटदूसुबा मामले मजकूरचा
मवाफीक फर्मान पादशाई भोगवटा चा
लत आला हाली तुकोजी व धाकोजी गैर
वारीस हा आपल्या वतनात दाखला करीत आहे या
जकरीता ताकीद करावी म्हणऊन अर्ज केला
याजवरून मवाफीक इनसाफ शराफरी
क पंच्याईत मते देसाईगीरी कदीम मि
रास तानाजी मजकूर याची आहे त्याचे दु
माला करून भोगवटा ज्यारी राखणे व तु
कोजी मा।।र गैरवारीस वतनात दखल हो
उ न देणे येबबे ताकीद समजोन फिरोन
फिर्याद येऊ न देणे मवाफीक फर्मानाचे
चालवणे सु।। समान तीसैन तीसा मीया
ब तारीख छ२५ साबान

| सिका | सिका | सिका | सिका | सिका | सिका | सिका |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | १ | १ | १ | १ |

**पत्रांक ६-चकनामा**






# पत्रांक ६ - चकनामा


श्री

चकनामा शके १७५६ इ.१८३४ जे हे नाम संवत्सरे माहे
पौष॥१२ रोज रविवार ते दिवसी रो खं
डेराव भगवत भावे आमीन नि ॥ श्रीमत रो
सिवरावआपासाहेब राजेबहादर जाहगीरदार
देहे प्रो निबईत यासी मोकदम पा मौजे मु
गस मो मार सन १२४४ कारणेऐसीजे २४
माहे साबाण साल मारची सनद सरकारची
सादर जाली की तुमचे नेमणुके अैवजी मौजे
मार पौ जमीण रूपे ४० चालीसाची नेमून दे
ऊन साल दर साल चालवणे त्यावरून मौजे मार
पौ जमीण जिराईत गत कु(ल) पडीत पौ तुम्हा
स नेमून दिल्ही बिघे सुमारी ४० दर बिघे
रूये १ प्रो जमीण रुये ४० चालीसाची साल मार
पासून नेमून दिल्ही तीची चेतु:सीमा
येणे प्रो सेत कडू ब॥ श्रावन पावले गावचे
उत्तरेस याची हाद उतरेस पाटन्याची वाट
दक्षणेने बासीगे सेत कडू पावले पछमे गव्हली
पु॥ (पूर्वे) स रामाढ मरीवले वावर वावराचा बाध दर
म्यान वाट सदरहु चेतुसीमा पूरवक जमीण
तुम्हास नेमून दिल्ही असे तर साल मारा पा
सून साल दर साल हकदाराचे हक खेरीज
करून बीन सारा जमीन वाहून खात जाणे
या जमीनीबदल गाव नि॥ वेठबेगार व
वगैर बाबती माफ असे हा कच (चक) नामा ली ॥
दिल्ही सही

**पत्रांक ७-राजपत्र**

Y 21037





# पत्रांक ७ - राजपत्र

श्री


स्वस्तीश्री राज्याभिषेक शके ५७ साधारण
संवत्सरे श्रावण बहुल सप्तमी मंदवासरे
क्षत्रिय कुलवंतस श्री राजा शाहू छत्रपती


| | |
|---|---|
| श्री | श्री |
| राजा शाहून | श्री आई आदी सुतरा |
| रपती हर्षनीधा | जश्री राजा शाहू छत्रप |
| न व बाजीराव बला | ति........पा निधीत- |
| ळ प्रधान | |


स्वामी याणी मोक
मानी मौजे नालेश्वर
पाा वानवले स।। नादेड यासी आज्ञा केली
अैसीजे मौजे मजकूर रा देवराव मेघशा
म यास देखील बाबती व सायेर पेसजी पासू
न मुकासा आहे त्याप्रमाणे करार आहे अैशास
साल गुदस्ताची बाकी राहीली आहे त्याचा
वसुल अद्यापी दिल्हे नाही व अैन जमा
बंदी ब।। चौथाई देत नाही तफावत क
रीता म्हणून हुजूर विदीत जाले तरी जमा
बंदीत तफावत करावयास प्रयोजन काये
आहे याउपरी अैन जमाबंदीची चौथा
ई वसुल सुरलीत देत जाणे व गुदस्ता
चे बाकीचा वसूल झाड्यानीसी देणे
नवदिगर जालीया मुलाहीजा होणार ना (ही) जा
णीजे लेखनालंकार
मर्यादेय राजते


बार सुरू सुद सुरू सुद बार बार बार

पत्रांक ८-नेमणुक पत्र









# पत्रांक ८ - नेमणुक पत्र


श्री नकल

राजश्री त्रींबकजी डे
गले गोसावी यासी
अखंडित लक्ष्मी आलंकृत राज
मान्य श्रो बाजीराव रघुना
थ प्रधान आसीरवाद सु ॥ सीत
अशर मया तैन अलफै कीले धार
वाड येथील सरजामाचे माहाल
व गावसुधा मामलत बापुजी
सिदे याजकडे होती ते दूर करून
साल गुदस्त सन खमस अशरमया
तैनात तुम्हाकडे सांगितली या प्रो
कर्नाटकचे स्वारीतून सनदा दि
ल्ह्या परंतू बापूजी शिंदे याणी तु
म्हाकडे किले मजकूर व किल्या कडी
ल सरजामाचा अमल दिल्हा नाही बा
पुजी सिदे खासा स्वारी बरोबर क
र्नाटकातून पुण्यास आले त्याचे
चुलते बंधु सिदराम सिदे याणी
किला सरकारासी लढविला स्वारी
पुण्यास आल्यावर किल्याकडील
सरजामाची दफ्तरी चौकसी करी
ता किल्याकडे सरजामास कर्यात बे
टगिरे वगैरे तीन माहाल व पेठ रविवार
नजिक किले माार येथील अमल व
कुरणे पो धारवाड पैकी आहेत गा
वचा अमल नवता त्यास किले धार
वाड सिदे याजपासून साल मजकु
री चैत्र मासी सरकारात घेऊन किले
माारचा सरजामसुधा मामलत

तुम्हाकडून दूर करून किले धारवाड
येथील किलेदारी रा बालाजी सदा
सिव याजकडे व किल्याकडील सर
जामाचे माहालची व पेठची व कुर
णाचीमामलत रा वामनाजी गो
विद याजकडे सांगितली असे तरी की
ले माारची किलेदारी बालाजी सदा
सिव व सरजामाचे माहालचा
अमल वामनाजी गोविद करीती
ल जाणीजे रजब आज्ञाप्रमाणे

मोर्तब लेखन सीमा.

**पत्रांक ९-दस्तक**



## पत्रांक ९- दस्तक


श्री


श्री
राजा शाहू न
रपती हर्ष निधा
बाजीराव रघु
नाथ प्रधान

दस्तक सरकार राजश्री पंतप्र
धान ताा कमाविसदारान व चौकीदारान व र
हदारान व बाजे लोकान व जकाती माहालानीहा
य सु।। इहीदे मया तैन व आलफै राा ल
क्षुमण बाबाजी करदीकर कारकून नि।। द
फ्तर बराबर स्वारी याचे तांदूल खंडी १ येक
येकूण बैल सर १० दाहा खेरिज फीर्गाण को
कणातून खरेदी करुन हर येक घाटे येक खे
प पुण्यास आणीतील त्यास आणू देणे जका
तीचा तगादा न करणे जाणीजे छ१० साबान

आज्ञा प्रमाण
लेखन सीमा

**पत्रांक १०-अखबार**







# पत्रांक १० - अखबार

श्री

तारीख २९ माहे जुलई सन
इसवी मु॥ छ१८ रमजान
अखबार सुभे खानदेश सरहद मथ
वार तापीतीर बऱ्हाणपूर येथील वृत्त
जमीदार माहालो माहालीचे बोलावून त्या
ज पासून दाहा लीजमेच्या झडत्या
व जमीन झाडे व साल गुदस्ताच्या
वसुल बाक्या व कमाल जमेचे कागद
व बागाईत व जिराईत व पडीत या
चे झाडे वगैरे कागद आणून पाहात आ
हेत. आमलनेरकर आलीअरब याणे आ
पला कारभारी नायकोबा व दोन अरब
यैसै जाबसालात आले आहेत त्यासिवाये
(ये)थील कारभाऱ्यासी बोलणी जाहली जे
सरकारातून तुम्हास तलब मिलावया
ची नाही तुम्ही जागा खाली करून
देणे त्याज अरबाच्या कारभाऱ्या
नी अमलनेरास पत्रे लिहीली आहेत.
उतर येऊन जाव साल येईल ते मागा
मागाहून लिहीणे सेवेसी श्रृत होये
रवाना छ१७ माहे जुलई मु॥ सोनगीर

**पत्रांक ११-अभय पत्र**





# पत्रांक ११ - अभयपत्र


श्री


अभयपत्र समस्त राजकार्ये धुरंधर वि
स्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराऊ प
डित प्रधान ताा मोकदम मौजे रावेत ताा
हवेली प्राा पुणे सुहूर सन खमस अशरीन
मया व अलफ दिल्हे अभय पत्र यैसे जे मौजे
माारची मोगलाईची साल मजकुरी
खंडणी होणे याकरिता तुम्हास हुजूर
आणून खंडणीची आज्ञा केली त्यास तुम
चे विशी देशमुख देशपांडे प्राा मजकूर
याणी कितेक नातवानीचे वर्तमान वि
दीत केले त्यावरून पेस्तर सालचे की
र्दीवर नजर देऊन मौजे माार ची मोगलाई
ची खंडणी तुमचे जीवन माफिक
साा माारी करार केली रुपये २८३ दोनशे
त्र्याअसी यास करार केले असत सदरहूची
उगवणी करुन पेस्तर सालचे कीर्दी
नजर देऊन करून सुखरूप राहाणे
अभये ऐसे जाणीजे छ१५ रमजान पाा

हुजूर

सुरु सुद

## पत्रांक १२-इनामपत्र





1897

# पत्रांक १२ - इनामपत्र

श्री शाहूचा
अष्टकोनी शिक्का


स्वस्तीश्री राज्याभिषेक शके ४३ दुर्मुख सवत्सरे
अस्वीन बहुल येकादसी भानूवासरे क्षेत्रीयेकुल
वतास राजश्री शाहू छत्रपती स्वामी याणी

| | | |
|---|---|---|
| बाळाजी | प्रतिनिधी | राजश्री |
| विश्वनाथ | याचा | गोपालपत बिन यादोपत |
| याचा | अष्टकोनी | वैद्य नाडगोडे ता। वा |
| गोल शिका | शिका | |

रुण प्रांत मलकापूर यास दिले इनामपत्र यैसे
जे तुम्ही स्वामी संनिध किले सातार्‍याचे मुकामी
येवून विनंती केली की ता। मजकूरचे नाडगोडकी
चे वतन स्वामीनी आपणास दिल्हे आहे त्या व
तनास इनामगाव असीला पाहिजे तरी स्वामीनी
कृपाळू होऊन नाडगोडकीच्या वतनास इनाम
गाव दिल्हा पाहिजे म्हणोन विनंती केली त्यावरु
न मनास आणून आमचे पुरातन आश्रीत वैद्य
शास्त्री निपून या करीता स्वामी तुम्हावरी कृ
पाळू होऊन नाडगोडकीच्या वतनास नूतन
इनाम कूलबाब कूल कानू हली पटी व पेस्तर प
टी जल तरु तृण पाषाण निधी निक्षेप सहीता
खेरीज हकदार व इनामदार मौजे येलापूर ता। वारुण
प्रात मलकापूर हा गाव इनाम दिल्हा असे तरी तुम्ही
मौजे मजकूर पूर्व मर्यादे प्रमाणे चतु:सीमा पु
र्वक आपले दुमाला करून घेऊन इनाम तुम्ही व
तुमच्या पुत्रपौत्रादी वशपरपरेने अनभवू
ने सुखरूप राहाणे सदरहू इनाम गाव स्वामी
तुम्हास सुरक्षित चालवितील लेखनाल

कार
मर्या
देय
विराजते

**पत्रांक १३-बोटखत**



# पत्रांक १३ - बोटखत

श्री


बोटखत पो धारवाड ८९९४ ॥≡।।।


| सुभाकडे | स्वारीकडे |
| --- | --- |
| ३७५० सिबंदी सुभाचे | २००० गारदी |
| ३००। ॥ हशम | १००० पोताजमा |
| १०० हशम | ५८ खासपथक |
| ६० कारकून | ७०॥ = खास पथक |
| २३२॥ हशम | ११।।। = खासपथक |
| ५० आपाजी तीमाजी | ४८ जासूद |
| २०!।।=। खेरीज मु॥ | ६८।।। |
| ३२३।।। हशम | ३२५७। |
| ५७३७। - ।।। | |


ई॥ छ२९ रबिलोवलपर्यंत वसुल

सन इसने

**पत्रांक १४-कतबा**







## पत्रांक १४-कतबा

श्री


ह।। ब।। मोकादम मौजे रावेत ताा
हवेली प्राा पुणे सन ११८४ कारणे
लेहून दिल्हे यैसेजे मौजे माार
चा साहेबाचा हकाचा यैवज
व गाव खडीचा गला पूर्वी पासू
न श्री देवस्थान चिचिवड
याजकडे साहेबाचे वडिली दिल्हा
तो त्याजकडे पावतच आहे गाव
खर्डाचा गला पावत नाही म्हणो (न)
श्री नी बोभाट आणला
त्यावरून आम्हास साहेबाची
चिठी आली की गावखडीचा
गला मागील राहिला असल तो
पावता करणे व पुढे सुरलीत देत
जाणे म्हणून त्यावरून श्री
नी आम्हास गावखडीच्या
गल्याचा तगादा केला त्यावरून
आम्ही साहेबाकडे येऊन म्ह
टले की हाली काडीकुरेचे दि
वस आहेत त्यामुळे दो म
हिण्याची मुदत द्यावी
आम्ही अवघे लहान मोटे
विचार करून साहेबाकडे
येऊन साहेबासी बोलोन
गावखर्डीच्या गल्याचा
फडशा करून देऊ हा कतबा

लेहून दिल्हा सही विद्यमान
तुकबाजी बीन संताजी पा
भोसले हरजी बीन गुडाजी
फडके चवगुले
नि।। नांगर
दि।। माहादाजी केशव लवले
कुलकर्णी मौजे लवले त।।
कर्यात मावळ

निशाणी नांगर

तेरीख ५ रमजान
उर्फ कार्तीक मास

**पत्रांक १५-ताकीद**



# पत्रांक १५ - ताकीद


श्री

श्री
शंकराजी
नारायण

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधर विश्वास
निधी राजमान्ये राजश्री नारोपडीत सचिव ताा
पानसरे व पथकी जकाती माहाल भोर व अगल
बे ताा कर्यात मावल सुहूर सन असरेन मया
अलफ मालजी नरसींगराऊ व गोविंदराऊ सितो
ले देशमुख प्राा पुणे याचा हक पुरातन
जकाती(चा) मजकुरी आहे त्यास तुम्ही सुदामत
प्र॥ चालो देत नाही म्हणोन विदीत जाले
तरी वतनी हकास कथला करावयास गरज का
ये याउपर सुदामतप्रमाणे हक चालवणे
कथला न करणे छ७ रजब

शिका

## पत्रांक १६-जामीन पत्र




## पत्रांक १६ - जामीनपत्र


श्री पंतप्रधान
साहेबाचे सेवसी


जामिन कतबा बाा दौलत वाा इभ्राईम
खान पाणसरे तर्फ करियात मावल करणे
माहाराज राजश्री जामिन कतबा
लेहून दिल्हा थैसा जे तुन्यारखान पा
नसरा बोरघाट माथा तर्फ नाणे मावल
यासी साहेबी हुजूर कसबे पुणे याचे
मुकामी रभाजी व।। राहूजी नाहावी
याणे वतन घाट मजकूराचे कजीया क
रीता साहेबी हुजूर आणून हर दू जणास
जामीन देणे म्हणून आज्ञा केली यास तु
निन्यारखान पाणसरे यास आपण जामी
न असो ज्याप्रमाणे साहेब पंचाईत
बैसोन वर लि।। न्याये होईल त्या प्र
माणे यास आपण वर्सऊन जे समई आ
पण हुकूम करतील ते समई हाजीर क
रून हाजीर न करु तरी याचे निसब
तीचा जाब करु हे लिहीले सही सु ।।
इशने सलासीन मया अलफ छ११
माहे रबिलाखर
बिकलद जिवाजी अनंत
प्रभु देशपांडे व गाव कुलकर्णी
तर्फ मार व घाटपांडे व
टिपणीसी घाट मजकूर

नि ।। सळई

**पत्रांक१७ -राजीनामा**







# पत्रांक १७ - राजीनामा


श्री

राजीनामा बो बिखाजी बिन बालोजी
व राणोजी व ॥ तानाजी नाहावीकेडी
पाणसारा बोरघाट तर्फ नाणे मा
वल सु ॥ इसने सलासीन मया
व आलफ सन हजार ११४१ कारणे
साईबाचे सेवेसी राजीनामा लेहू
न दिल्हा यैसाजे साहेबी पुरसीस
केली तुन्यारखान वाा भिकाजी
पाणसारा याचा व तुझा पा
णसरकीचा वतनाचा कजिया
आहे त्यास पेसजी राजश्री राम
चंद्र माहादेऊ याण्ही इनसाफ
केला तेव्हा तपे मजकुरच्या गो
ताने साक्ष दिली की दरोबस्त व
तन मुसुलमानाचे आहे व हाली
याचे गोतास पुरसीस करीता
साक्ष दिली की नीमे वतन नाहवी
याचे व नीमे वतन मुसुलमाना
चे म्हणून साक्ष दिली या करीता
तर्फ मजकूराच्या गोताची साक्ष
प्रमाण नाही हर दो जणा पासी
जुना कागदपत्रही नाही भो
गवटा पाहाता नीमे वतन तू
खात आला आहेस व नीमे वतन
मुसुलमान खात आला आहे. या
जवर मुसुलमान म्हणतो की
दरोबस्त वतन आपले आहे आ
णी तू म्हणतोस की नीमे वतन
आपले आहे व नीमे वतन मुसु

लमानाचे आहे म्हणून म्हणतोस
तरी नीमे वतन आपले यैसे दिव्यै
करणे दिवी खरा जाहलास तरी नीमे
वतन तू खाणे नीमे मुसुलमान
खाईल खोटा जाहालास तरी वतनासी
समध नाही अगर पाचजण बै
सोन न्याये करतील पाचाचे
मते जो निवाडा होईल त्याप्रमाणे
वर्तावे या दोही गोष्टीतून तू
जला जे पुरवत असेल ते कबूल
करणे म्हणून पुरसीस केली तरी
दिव्यास आपण कबूल नाही
पाच जणास आपण राजी आहो
न्याये मनास आणून जो नीर्वा
ह करीतील त्या प्रमाणे कबू
ल असो पाचाच्या निवाडी
यास नो दिगर करु तरी गो
ताचे खोटे व दिवाणाचे गुने
गार हा राजीनामा लेहून दिल्हा सही
बिकलम जीवजी अनत
प्रभु देशपाडे व गाव
कुलकर्णी व घाटपाडे
व टीपणीसी घाटमा॥

निशाण पाणसरे
सलई असे

## पत्रांक १८ - करारकतबा



# पत्रांक १८ - करारकतबा


श्री
श्रीमत राजेश्री धणी
साहेबाचे सेवेसी


करारपत्र बाा लिगण गौडा पाटील
व कुलकर्णी मौजे कलहाली ताो
सिदोगी ताा मुनवली सु।। स
मान सबैन मया व आलफ साल
मजकूरच वसुली जमा खर्च लिहून
दिल्हे आहे त्यास जमेत जाज
ती खर्चास कमी असल्यास
आम्ही भरून देऊ लिहून दिल्हे
आहे कतबा सेहे तेरीख छ२९ सफर

बाा तीमाजी नरसी
हे कुलकर्णी मौजे
मजकूर

निशान (नागर)

## पत्रांक ११ - रकमाला





# पत्रांक १९ - रकमाला


श्री

रकमाला जमीन झाडा मौजे जोगी येलापूर
ईनामगाव देवणगौडा पाटील कसबे धारवाड
सु।। समान खमसैन मया व अलफै

| जमीन स्थल | रकम होन | | |
|---|---|---|---|
| १२।। | ५० | | |
| पौ वजा सर्वमान्ये | | | |
| ।। | २ नरसिगराव भिमराव देसाई सर देसाई नाडगौडा | | |
| ।। | २ देशपांडे सरदेशपाडे नाडकर्णी व्यकाजी कोनरी | | |
| १ | ४ | | |
| ५ | २० | जुडी मान्ये | |
| | | ४।। | १८ पाटील |
| | | ।। | २ नरसो व्यकाजी कुलकर्णी |
| | | ५ | २० |
| ६ | २४ | | |
| जाता बाकी | रकम होन | | |
| ६।। | २६ | | |

क्यामटी कचेरीस र।। त।। २५अप्रल सन १८४४.
शामराव देशपाडे
त।। धारवाड मामलदार याजकडून बीन नबरी रपोर्ट
त।। २५ अप्रल सन १८४४ बराबर जीवनराव देशपाडे व सर
देशपाडे व नाडकर्णी याजकडील ५३ कागद आले.
त्यातील सदरहू
लागला असे.

पत्रांक २० - जप्तीपत्र




## पत्रांक २० - जप्तीपत्र

श्रीनाथ

मौ लक्षुमण वाळीज यासी मुरारजी येवले सु॥ अर्बा
मया तैन व अलफै मौजे चिचवली येथील जप्तीचे अैवजी दो
ेनशे रुये याचे भात खरेदी करून ठेवावयासी सांगितले
आहे त्यापैकी शभर रूपेयाचे भात राजश्री बापुजी रा
व सिदे देशमुख याचे पदरी घालोन कबज घेणे
बाकी भात आपले दास्तान करून ठेवणे व शभर रूये
रोख पाठवून देणे जाणीजे छ२ साबान

मोर्तब
सुद

पत्रांक २१ - चिठी



# पत्रांक २१ - चिठी


श्री

चिठी दास्तान फुड मौजे इंदापूर मामले तले प्रा
राजपुरी ता मौजे चिचवली मामले मजकूर सु ॥
अर्बा मया तैन व आलफै जमा धारा हकदार साल मज
कुर पैकी बा कुले माप गु॥ कुले साड ती सेरी

| | |
|---|---|
| 6॥ =॥ | बहीरनाक |
| 6१ | गौरनाक |
| 6१6१ । ≡ | दत्ताजी निकम |
| 6१6२ । = | रामाजी निकम |
| 6२ ॥ | वेट जीबाईत |
| 6२ ॥ | रावजी पाटील |
| 6१ ॥ ॥। | देवजी पाटील माळी सकर |
| ॥। । २ | |

येकूण सवा पंधरा मण दोन पायेली
भात जमा असे
जाणिजे छ१३ माहे सवाल

## पत्रांक २२-अग्रहार





## पत्रांक २२ - अग्रहार


राजमंडल
पा आवढा नागनाथ सु॥
स॥ वासीम फुटमुकासे


कसबा आवढे येथील
दत्ताजी गुरव याने खंडेरा(व)
(जे)जुरीचे मुकामी येऊन विन
ती केली जे कसबे मजकूर पूर्वी
थोरले कैलासवासी माहारा
जानी श्री देव नागनाथ वा
स्तव्य कसबे मजकूर यास पु
र्जा उर्जा नैवेद्य नंदादीप
व समस्त ब्राह्मणास आग्राहार
करून दिल्हा त्याप्रमाणे चा
लत आहे पत्रे होती ती दग्ध
जाहाली याजकरीता भोगव
टियास पत्रे करून देऊन ई
नाम चालविला पाहिजे म्हणु(न)
त्यावरून कसबे मजकूर पुर्ववत
प्रो श्री नीमे कडे नीमे व स
मस्त ब्राह्मणास नीमे
आग्राहार करून दिला
पत्र छ८ साबान सन तीसा
सलासीन कालयुक्त
संवत्सरे पत्रे चिटनिसी
ईनाम देह १

पत्रांक २३-ताळेबंद









# पत्रांक २३ - ताळेबंद

श्री

ताळेबंद जमाखर्च श्री स्वामी
संस्थान चिचवड ई॥ आषाढ व॥ ११
शके १७२७ ता। आषाढ व॥ १ शके १७२८


| जमा | रुपये |
|---|---|
| ९२३१॥ - | जागीरचे गावगना |
| ६४८४॥ = ॥ | कर्ज जमा |
| ३१५३6 = | सिवाये जमा |
| ७७॥⊦॥। | भाद्रपदी यात्रे बा। |
| ४०९ | वर्षासना बा। |
| २४५। ☰ | बाग व सेऱ्या |
| ३०० | खासगी बा। |
| १०१४6☰ | टकसाळ |
| ३६२। ॥। | कोठी पौ फ्रोक्त जीनस |
| ४२।☰ | सिलकी दागीने |
| १३२ | अनामत जमा |
| १३। | खरीदी कापड |
| ३२२६6-। | कोठीकडे जिन्नस खरेदी |
| ५१३०॥।☰ | साल गु॥ कडे वगैरे रद क र्ज सनावद रुये |
| ३८७८⊨।। | यात्रा खर्च मोरेश्वर |
| १७९१॥ -॥ | बंधुवर्ग मंडली विभाग पौ |
| ४००6 ☰ । | खासगी खर्च |
| ६३॥।☰ | सिलकी दागिने |
| १०७ | खरेदी लाकडे व कडबा |
| १७९⊨ | तसलमात खर्च येणे |
| २२३५८। । | |

बाकी रुपये ३५6☰ ॥।

| | |
|---|---|
| ६१७ ॥ – ॥ | जप्ती पौ जमा |
| ४१ | मागील कर्ज वसुल |
| १३। | कापड विकरी |
| १। = | विभाग पौ जमा |
| २०० | दाईते |
| २१। ॥ | वाजगस्त |
| ९। ≡ | उसनवार जमा |
| २२३९३॥ | |

| खर्च | रुपये |
|---|---|
| ४३५९८-॥। | बा मु॥ सिबदी व<br>कारकून वगैरे रुये<br>७१। आश्रीत<br>२२५२॥। कारकून<br>२०३५६-॥। सिबंदी<br>४३५९८-॥। |
| ३०९६ | खेरीज मु॥ |
| ११२। = | तहवेल |

पत्रांक २४-पावती



# पत्रांक २४ - पावती

श्री


असल बा॥ नकल
सिका


पावती सुभा प्रांत राजापूरी नि॥
बलवंत राव अनंत सु॥ अर्बा मया
तैन व अलफै बा॥ देणे मुजाफत खर्च
किले हडसर ता॥ सिवनेर बा॥ मु॥ लोक
दिमत हाय कुलाबकर याची घरे व
सेते प्रात मजकुरी आहेत त्यास सेत
सनद खुद बा॥ पत्र असामी ७


येकूण
नख्त रुये
२८॥


गला कैली भात साडेतीन
सेरी मापे ८६२ खंडी
चौ शेरी ७६१॥। मापे

पत्रांक २५-आजमास









# पत्रांक २५ - आजमास

श्री

आजमास मौजे चिचवली मामले तले सु।। समान
अशर मया तैन व अलफै बाा रुजू गुदस्त

| | | |
|---|---|---|
| | नख्त जमा रुये | यैन-जीनसी गला कैली |
| | ३९८।═॥ | ५०॥। ॥। |
| | पैकी वजा | ५६३ ⊨ रामभट |
| १०२॥ | रामभट यासी | आनंदीबाई |
| | परभारे लावून | चा यैवज हसी |
| | कुले दिल्ही | ल घेतला त्या |
| | गुदस्त सरकार | हासल माार निले |
| | भरण्यास दिल्हे | पासोन घेऊन |
| | | दिल्हा तो |
| २६ | किता तीगस्त | |
| | सरकार भरण्यास सन | ११। येणे सवातीन |
| | खमसात राम | शेरी माप |
| | भटजी याचा | १६ चिटणीस स |
| | यैवज घेऊन दि | वाती शेरी मापे |
| | ल्हा ते रुये | ३॥ हकदारी |
| | २८८ | ५॥।३॥२ |
| | यासी ऐवज पर | |
| | भारे शेते लावू | २ सिपाई |
| | न दिल्हे हाफत | |
| | बंदी करविले | |
| | १४ महादू चीनाड्या शेतेतील | ७॥।३।२ |
| | कौल | |
| | १२ शेत मोरले नी॥ अमृतराव | बाकी सीलक रु |
| | २६ | १२॥⊨६१। |
| १३५ | सुभाचे शेल पागोटे | |
| १११ | यैवज | |

१२५ चीटणीस

४९९॥

बाकी सीलक रुये

फाजील देणे रुये

१०७८।।।

ये॥ साडे आठावीस रुये नख्त व गला कैली भात
खाो आठ खंडी दोन मण यौदाचे वाौ सात खंडी
पावणे दोन मण रास मोर्तब सूद
तपसील

| | नख्त रुपे | भात कैली |
|---|---|---|
| दि॥ बाबाजी चवाण मौजे पायेनेर मामले तले | | |
| खुद सरदार | ६।।। | २८२ |
| कृष्णाजी माहा(देव) | ३।।= | १ |
| येसजी यादव | ३।।= | १ |
| धाकोजी पवार | ३।।= | १ |
| येसजी सिदे दि॥ बाबूराव पवार वाा मौजे पायेनेर मामले तले | ३।।= | १ |
| गोदजी बेहरे दि॥ भगवतराव पवार वाा पाले बु॥ प्रो घोसला | ३।।= | १ |
| सिवाजी बालकोजी धुमाले दि॥ बाबूराव पवार वाा मौजे भवटे ताा निज्यामापूर | ३।।= | १ |
| | २८॥ | ८८२ |


७८१।।।

येणे प्राो नख्त साडेआठावीस रुये व गला
भात खाो आठ खंडी दोन मण यौ वाौ सात खंडी

पावणे दोन मण सदरहू नख्त
व गला प्रांत मजकुराकडून मुजाफत खर्च
लिहीला असे तर ताा मजकुरी ईजाफत
जमा धरावी रा छ८ माहे सफर मोर्तब

सूद

पत्रांक २६ - खरेदीखत



## पत्रांक २६ - खरेदीखत

॥ श्री ॥

खरेदी खत खत सके १६९० सर्वधारी
नाम संवत्सरे भादव सुद १० ते दिवसी
नंदराम चौकीदार यास मजुसिग व
लखमनसिग याणी लिहून दिले की आप
. ल घर काले खातात होते तें तुम्हास
विकत दिधले किमत रुये २० वी
स घेवू(न) तुम्हास खुषरजावंदीन दि
ल सानीहल कोन्ही मुजाहीम जाले त्या
चा जाबसाल आपण करु हे लिहून दि
ल सही

१ साक्ष फकीरसिग


१ साक्ष नव्हरसिग


# इतिहास संशोधकांची मोडी हस्ताक्षरे व ज्येष्ठ व्यक्तींचे उतारे

१) समर्थ रामदास
२) लो. टिळक
३) इतिहासाचार्य वि.का. राजवाडे
४) साहित्यसम्राट न. चिं. केळकर
५) वासुदेवशास्त्री खरे
६) आबा चांदोरकर
७) प्रा. सेतु माधवराव पगडी
८) रँग्लर र. पु. परांजपे
९) म.म. द.वा. पोतदार
१०) सरदार आबासाहेब मुजुमदार
११) श्री. य. न. केळकर
१२) उतारा - एकच प्याला - राम गणेश गडकरी
१३) ''    पुस्तक आणि वाचक- श्री. कृ. कोल्हटकर
१४) ''    जानु भिंतांड्या - ल. ब. भोपटकर
१५) ''    व्यावहारिक वेदांत - स्वामी रामतीर्थ

[illegible] - १

## रामदासस्वामींचे हस्ताक्षर





पत्र - १


# रामदासस्वामींचे हस्ताक्षर

श्री राम समर्थ
उत्तम गुणालंकृत रघुनाथ भक्ती प
रायेण परोपकार राजमान्य राजेश्री
रघुनाथ भट गोसावी यांसी स्नेह पू
र्वक सूचना तुमचा निरोप घेऊनू
हेलवाकीहून स्वार जालो ते सुखरु
प चाफळास पावलो संकल्पाची
समाराधनाही जाली पुढे शरिराचा
उपचारही हळू हळू होतो तुम (अपूर्ण)

( समर्थ संप्रदायाची पत्रे
संपा. - शं.श्री देव
भा १ माळ ९)

पत्र-२

लो. टिळकांचे पत्र



पत्र-२

# लो. टिळकांचे
# राजगडचे किलेदार यास पत्र

श्री                सिंहगड
२६/२/९७


वि।। वि।। आमचे मनुष्या
बरोबर २ तसबिरा यक श्री
शिवाजी महाराजांची व दुसरी
देवीची असा पाठविल्या आहेत
चिरीमरी करिता रुपये ३ तीन
पाठवल आहेत. ते तेथील नो(क)रास
वाटून द्यावे. गुरुवास मी
येताना येक रुपया दिलाले
आहे कळावे हे विनती

-बाल गगाधर टिळक

(विठ्ठल सोमाजी भोसले संग्रह,
राजगड, पालि खुर्द (अप्रसिध्द)

पत्र - ३

**इतिहासाचार्य वि. का. राजवाडे**



पत्र - ३

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे


आषाढ शु।। ८

या विसाला नवे ४६ वे वर्ष लागले
५४ राहिली. त्यात सर्व जगताला
हितकारक व राष्ट्राला पोषक असी
कृती होवो. आजपर्यंत फक्त स्मृति
राष्ट्रीय तयार करण्यात काळ गेला
यापुढे कृति कृति कृति झाली पा
हिजे नाहीतर व्यर्थ चाळीस वर्षे
आणिक सतत मेहनत झाली पा
हिजे आरोग्य, उत्तम हवा, उत्तम
पाणी, उत्तम जागा, उत्तम शुध्द अन्न
ही मिळाली तर हेही होईल ईश्व
री कृपा अपरंपार हवी.

(राजवाडे चरित्र-भा. वा. भट-पृ. ९६)

पत्र-४

साहित्यसम्राट न.चिं. केळकर



पत्र ४

# साहित्यसम्राट न.चिं. केळकर

श्री

पुणे ता. १४।४।१९१४


कृतानेक सा। न।। वि।। आपले पत्र पावले मोडी
अक्षरासंबंधाने माझे मत व विचार -
आपणास माहीत आहेच.
मोडी अक्षराचे वळण अलीकडे पूर्वीसारखे -
राहिलेले नाही.
हल्लीची मोडी लिपी पूर्वपिक्षा -
कमी ढबदार व कमी वळण -
दार दिसते हे खरे आहे -
तथापि मोडी लिपी कितीही वाईट
असली तरी ती वाचता येत -
नाही इतकी काही वाईट नसते हे
कदाचित या माझ्या पत्रातल्या -
अक्षरावरुनही दिसून येईल.

नरसिंह चितामण केळकर

(न. चिं. केळकर चरित्र
केळकर वाढदिवसमंडळ)

पत्र -५

**वासुदेवशास्त्री खरे**



पत्र -५

# वासुदेवशास्त्री खरे

श्री

उमरावती
२८।१२।२१ बुधवार

अनेक आसीर्वाद विशेष. तुम्ही १० बुकांचें -
पार्सल पाठविले तें पोंचलें
त्याच १० बुकांचे आणखी २ सेट
पाठविण्याविषयी रविवारच्या का
र्डात लिहिले होते त्याप्रमाणे
बुके रवाना झालीच असतील. मा
झी प्रकृती उत्तम आहे. नाटकाचें
काम ठीक चालले आहे. २ अंका
चीं पदे झालीं. पुढची कमीच
आहेत. बाकी मजकूर विशेष नाही.
लोभ करावा हे आसीरवाद

वासुदेव वामन खरे

(खरे स्मृतिमंदिर संग्रह, मिरज.
अप्रकाशित)

पत्र-६

## आबा चांदोरकर

[illegible]

पत्र-६

# आबा चांदोरकर

श्री राम समर्थ


पुणे ता। १८।८।६३

श्री र.वा. पाळंदे यानी 'श्री शिवराजतीर्थ दर्शन'
नावाचा श्री समर्थानी २८ सृष्टीमधील चित्रलेपसृष्टी
वर्णित चित्रांचा संग्रह दाखविला त्यांत श्री समर्थानी
"शिवराजाचे आठवावे स्वरुप .... शिवराजाचा कैसा
प्रताप" आज्ञापिलेला शिवमहिमा उत्तम प्रकारे चितारलेला आहे
प्रारंभ जयभवानी पासून असून शेवट भारतमाता
की जय ने केला आहे. चित्रांचे २ प्रकार आहेत. काही छाया
चित्रे व बाकीची हस्तचित्रे आहेत. या संग्रहात महाराष्ट्र,
त्याचा भगवाध्वज, त्याचे गीत, त्यातील किल्ले, मंदीरे व
शिवाजीमहाराजसंबंधित स्थळे - महाराजांचे आयुष्यातील
प्रमुख प्रसंग आलेले आहेत. मेहेनत बरीच घेतली आहे माझे
मते पुढील चित्रे अस्सल वापरली असती तर अधिक औचित्य
दिसले असते. शिवछत्रपती, राईरेश्वर, श्री समर्थ-कल्याण,
अफझल, बाजीप्रभू, शाहीस्ताखान, संभाजी इत्यादी
तथापि प्रयत्न चांगला आहे उत्तेजनकारक आहे या तरुण
चित्रकारास महाराष्ट्र सरकारने त्याचे कार्यास सवड मिळावी
म्हणून काही तरी द्रव्याचे सहाय्य करणे आवश्य आहे
तथापि त्याचा व त्याचे या कलेचा उत्कर्ष होईल
व होवो असी श्री पासी माझी प्रार्थना आहे.

आबा चांदोरकर

( र.वा. पाळंदे संग्रह, पुणे.-
अप्रकाशित)

पत्र - ७ **प्रा. सेतु माधवराव पगडी**



पत्र - ७

## प्रा. सेतु माधवराव पगडी


२०-२-१९८९

सप्रेम नमस्कार विनंती
विज्ञापना आपले कृपा प
त्र पावले. मजकूर समजला
आपला उपक्रम चांगला आहे
आपल्याला यश मिळो.
कळावे, आपला,
सेतु माधवराव पगडी

पत्र - ८

**रँग्लर परांजपे**

डॉ. रँ. र. पु. परांजपे यांचे हस्ताक्षर



पत्र - ८

## रँग्लर परांजपे

उत्तम मोडी अक्षराइतके
सुंदर लिहिणे नाहीच म्हटले तरी चालेल
ही लिपी आपल्या महाराष्ट्रांत गेल्या
सहा सातशे वर्षे चालली आहे व तीने
मराठी भाषा बाळबोधपेक्षा कितीतरी


जलद लिहीता येते. मोडी बाळबोधपेक्षा
वाचण्यास कठीण असा तिजवर आक्षेप
घेतला जातो. पण निष्काळजीपणाने लिहि
लेले बाळबोध अक्षरही तीतकेच दूर्वाच्य
होते. असा अनुभव आला आहे.

रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

पुणे. ताा १० सप्टेंबर १९३२

( मोडी लिपी. मो. रा. वाळंबे)

पत्र - ९ **म. म. द. वा. पोतदार**


महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार,
कुलगुरु.
गणेशखिंड, पुणे ७.
UNIVERSITY OF POONA,
Poona 7.
श्री
दिनांक ४।६।६३

पत्र - ९

## म. म. द. वा. पोतदार

श्री


सप्रेम वि. वि. ४/६/६३

कृपा पत्र पावले त्यास राजवाडे
खंड १ ले २६० सिहीचा उलगडा -
येणेप्रमाणे 'ही' या अक्षराचे
वाचन चुकीचे. ही असे काहीतरी -
मोडीत मुळात असणार ही न
वाचता टी (टी) वाचावे म्हणजे वाक्य
असे : तुमच्या पाठीसीही या पेचा-
मुळे लागणार नाही. पाहा पटते कां ते
व कळवा. -
श्री शंकर नारायण जोशी वाईकर यांसी
दत्तो वामन पोतदार

(कै. शं. ना. जोशीसंग्रह
पुणे - अप्रकाशित)

पत्र - १०

## सरदार आबासाहेब मुजुमदार


श्री

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

कामाची वेळ :
सकाळ : ८-१०., सायंकाळ : ४-८.
साप्ताहिक सुटी : शुक्रवार

३१३ अ, सदाशिव पेठ, पुणें २

मि.

ता.

जा. क्र.

पत्र - १०

## सरदार आबासाहेब मुजुमदार

मि. आषाढ व. ४/१८८१
२३/७/५९

श्री. रा. रा. शं. ना. जोशी
भा. इ. सं. मंडळ पुणे यांस
कृ.सा.न.वि.वि. आपले ता. १५/५/५९


चे पत्रान्वये कळविण्यात येते की आपणास वाचण्याकरिता कारभारी मंडळाचे वृत्तांत पुस्तक प्रोसीडींग पुस्तक व कार्यकारी मंडळाचा पत्रव्यवहार श्री गोपाळ कुलकर्णी याजवळ कचेरीत ठेविले आहेत. ती त्याजकडून घेऊन आपण कचेरीतच वाचून पाहावीत.
कळावे हे वि।।

आपला,
गं. भा. मुजुमदार
चिटणीस,

(कै. श्री. शं. ना. जोशी
खाजगीसंग्रह - अप्रकाशित)

पत्र - ११

**श्री. य. न. केळकर**


श्री य० न० केळकर यांचे हस्ताक्षर.

६.२.१९८९

पत्र - ११

# श्री. य. न. केळकर

आपला मराठ्यांचा सगळा
इतिहास मोडी लिपीतच
लिहिलेला आहे. पण ती
लिपी शिकण्याची इच्छा
मात्र विद्यार्थ्यांस मुळीच
दिसत नाही. आता पुन्हा
शाळातून मोडी कित्ते घेऊन
त्यावरून मोडी अक्षरे घटवी
ण्याचे लेखनाचे तास ठेवले
पाहिजेत.

य. न. केळकर
६/२/१९८९

**उतारा १/१२**

[illegible]

उतारा १/१२

## ‘अेकच प्याला’

नीट बघीतलीस ही दारू? श्रीकृष्णाच्या तोंडात विश्वरुपदर्शन प्रसंगी यशोदेला जे चमत्कार दिसले नसतील ते या प्याल्यात तुझ्या दृष्टीला दिसतील. त्या पहा काबाडकष्ट उपसून आलेला थकवा घालविण्याच्या आशेने दारू पिणाऱ्या मजुरांच्या झोपड्या! निरुद्योगाचा वेळ घालविण्यासाठी म्हणून दारु पिणाऱ्या श्रीमंतांच्या या हवेल्या ! केवळ प्रतिष्ठितपणाचे लक्षण म्हणून चोचल्यानं दारु प्यायला शिकलेल्या पढतमूर्खांचा हा तांडा. उद्योगी-गरीब- आळशी, श्रीमंत, साक्षर-पढतमूर्ख, निरक्षर-व्यवहारी, सर्वांना सरसकट जलसमाधी देणारा हा पाहा एकच प्याला ! दारुबाजांच्या बायकांची ही पाहा पांढरी फटफटीत कपाळं !
दारुबाजांच्या पोरक्या पोरांच्या या उपासमारीच्या किंकाळया.

तो पहा मेलेल्याला सजीव करणारा दैत्य गुरु शुक्राचार्य आपल्या त्या संजीवनीसह या एकाच प्याल्यात स्वतःच मरून चूर झालेला आहे. जगाच्या उध्दारासाठी अवतरलेल्या श्रीकृष्ण परमात्म्याचे हे पहा छपन्न कोटी यादववीर दारूच्या एकच प्याल्यात बुडून अधःपात भोगीत आहेत.


जिनं चारी खंडात अनर्थाचं साम्राज्य चालवील आहे ती दारू! कुबेराला भीक मागायला लावते ती दारू! भीमासारख्या वज्रदेही शरीराला बहात्तर रोगांचा दवाखाना बनविते ती दारू! शिकलेल्या शहाण्याच्या थोबाडाला शिमग्यातल्या शिव्या शेणानी शोभा आणते ती दारू!

हा एकच प्याला नीट साऱ्या जगाला दाखीव आणि कळवळ्यानं सांग की साऱ्या अनर्थाचं कारण हा दारूचा एकच प्याला असतो।-त्याच्यापासून दूर रहा !

**- राम गणेश गडकरी**

(जुन्या मोडी पुस्तकातून)

## उतारा २/१३



## उतारा २/१३ पुस्तक आणि वाचक


न पोचता परत आली तर नवल. वाचणारी स्त्री फारशी सुशिक्षित नसली तर पुस्तक परत आल्यावर त्याची ओळख -पटण्याचा थोडातरी संभव असतो. पण जर का तीला वाचायचा विशेष नाद असला तर ते पुस्तक वाचनालयाच्या बाहेर पडताना मिळमिळीत असले तर-तिखट मीठाचे व मसाल्याचे हात लागून चुरचुरीत होऊन परत येते. असे पुस्तक खेळणे म्हणून अर्भकाच्याही हाती जाण्याचा संभव असतो. आणि मग त्याचे जे हाल होतात ते कल्पनेनेच जाणले पाहिजेत, कारण पुस्तकाचे पृथःकरण करण्याची व त्यातील रसग्रहण कर ण्याची अर्भकाची कल्पना त्यांच्या आईबापांच्या कल्पनेहून बरीच भिन्न व काहीशी धोपट मार्गाची असते व पुस्तकाच्या-पृष्ठांचे पृथःकरण झाल्या-शिवाय व ती चघळून त्यांचा रस घशाखाली उतरल्याशिवाय त्याच्या जिज्ञासेचे समाधान होत नाही. अशा प्रसंगी-कालाच्या दाढेतून बचावलेले ज्ञानेश्वरी सारखे ग्रंथही त्या अर्भकांच्या भक्ष्यस्थानी -पडतात व निरस काव्याचाही रस त्याजकडून अधाशीपणाने लुटण्यात येतो.

सारांश लढाईवर निघालेला वीर-परत येण्याची आशा जशी आपण सोडून देतो तशी वाचनालयातून-गेलेल्या पुस्तकाचीही आशा सोडून देऊनच ते वर्गणीदारांच्या हाती द्यावे लागते.

- **श्री. कृ. कोल्हटकर**

(जुन्या मोडी पुस्तकातून)

उतारा ३/१४



उतारा ३/१४

## जानु भिंतांड्या


जानोजीची शक्ती तर दर क्षणी क्षीण होत चालली होती वाटेने पळणाऱ्या पुष्कळ घोडेस्वारांना त्याने पार्वतीबाईची हकीकत निवेदन केली परंतू तिकडे कोणीच लक्ष देईना. त्याची सर्व आशा काय ती कोणीतरी नावाजलेला मराठा सरदार आपणास भेटेल व आपण बाईसाहेबास त्याच्या स्वाधीन करुन वीतचिंत व वीतप्राण होऊ अशी होती. परंतू सकाळपर्यंत दुर्दैवाने कोणीही चांगला सरदार त्यास भेटला नाही. त्याचा जीव जरी अत्यंत व्याकूळ झाला होता, तरी त्याने पार्वतीबाईस सकाळी दिल्लीच्या अलीकडे तीन मजलांवर आणले. तेथे त्यास कळले की, मल्हारराव होळकर, इतर सरदार, स्वार,-पागेचे बारगीर वगैरे लोक जवळच आहेत. तेव्हा तो बाईस घेऊन तीकडे निघाला. आठच्या सुमारास मल्हाररावाची भेट होताच तो त्यांना म्हणाला,“ मल्हारबा, भाऊसाहेबांनी पाठविलेली ही ठेव नीट संभाळा व पुण्यास श्रीमंतांकडे पोहोचती करा.” शेवटच्या शब्दाबरोबर त्यांचा शेवटला श्वासोश्वास मर्त्य कुडीतून निघून हवेत मिसळून गेला.

शाबास, जानबा शाबास! तुझा व तुझ्या अतुल स्वामीनिष्ठेचा सदैव जयजयकार असो ! तुझा नश्वर देह नष्ट झालेला असला, तरी तू कीर्ती रूपाने जिवंतच आहेस, व तुझी उज्ज्वल स्मृती मराठ्यांच्या कृतज्ञ अंतःकरणातून सदैव वावरल्याशिवाय राहणार नाही.

**- ल. ब. भोपटकर**

(जुन्या मोडी पुस्तकातून)

**उतारा ४/१५**




## उतारा ४/१५ व्यावहारीक वेदांत

"तळ्यांतील प्राण्या प्रो जागच्या जागी आळसात कुजून न जाता परिश्रमपूर्वक उन्नतीच्या मार्गावर नेटाने पुढे पाऊल टाकणे वेठीस धरलेल्या बिगाऱ्या प्रो कपाळाला आठ्या घालीत काबाडकष्ट न करता राजपुत्राप्रमाणे गमती खातर अहोरात्र परीश्रम करणे, कसे होईल काय होईल हा हृदरोग अंतःकरणातून काढून टाकून मन स्थिर व शांत करणे भेदभावाचा नीरास करून अंतःकरणात प्रेमाचे व अैक्याचे बीजा रोपण करणे, प्राचीन चालीरीतींना डोळे मिटून चिकटून न बसता परिस्थिती प्रो आचार विचारांना योग्य ती चालना देणे, सहानुभूतीच्या लांबलांब बाता न मारता अंतःकरणात-प्रेमाच्या जिवंत भावना प्रज्चलीत करणे, कल्पना सृष्टीत रममाण न होता प्रत्यक्ष संसाराचे दिव्य काव्य बनवीणे, होऊन गेलेल्या ग्रंथकाराच्या प्रमाण वचनांवर भीस्त न ठेवीता स्वानुभवाचे नवे तर्कशास्त्र तयार करणे, निर्जीव प्रमाण वचनांच्या अैवजी अंतःकरणात स्वानुभवाची जागती ज्योत पेटवणे-हाच व्यावहारीक वेदांत होय.

**- स्वामी रामतीर्थ**


(जुन्या मोडी पुस्तकातून)

# काही महत्त्वाच्या व्यक्तींची मोडी हस्ताक्षरे




रा. ब. साने यांचे मोडी हस्ताक्षर

दत्तात्रय बलवंत पारसनीस यांची स्वाक्षरी



वासुदेव बळवंतांची स्वाक्षरी



# भाग ४ संकीर्ण

## ऐतिहासिक कागदपत्रातील महत्त्वाचे शब्दार्थ

| | |
|---|---|
| अजकदीम -- | फार दिवसांपासून |
| अज देहे - | एकंदर गावे |
| अजुरदार - | पत्र किती दिवसात पोहोचवतो यावर ज्याचा मोबदला करत तो काशिद |
| अर्जुदा - | रुष्ट |
| अलाहीदा - | निराळी |
| अहद - | पासून |
| अहलतमगा - | राजाने बक्षिस दिलेल्या जमिनीची सनद |
| आलंगनौबत - | डंका-निशाण |
| आस्पहानी - | स्पॅनिश |
| इजमायली - | एकूण |
| इजाफा - | वाढ |
| इतला - | संमती |
| इतलाख - | पगारी |
| इनायत - | देणगी |
| इस्तकबील - | पासून |
| उडते साली - | एकवर्षाआड |
| उलफा - | न शिजवलेले (अन्न) |
| कवित्र - | कसब |
| कहीकबाड - | धान्य, वैरण |
| कायल - | त्रस्त |
| किर्दमहामूर - | उत्तम प्रकारची लागवड |
| खलश - | कलह |
| खामखा - | आवश्य |
| खिसारा - | नुकसान |
| खिसे - | सबबी |
| गनीमाई - | गनिमी कावा |

| | |
|---|---|
| गालेब - | वरचढ |
| गिर्दवानी - | भोवतालचा परिसर |
| गुतका - | भाडे |
| गुदस्त - | गतसाल |
| गोषमाली - | शिक्षा |
| गंगातीर - | गोदावरीतीर |
| जकीरा - | साठवलेले सामान |
| जदीद - | नवीन |
| डौल - | कारभार |
| तजावजा - | अफरातफर |
| तलावा - | टेहळणी |
| तहकीक - | खोटे |
| तहवेल - | कारखाने |
| तालीक - | नक्कल |
| दरकार - | पर्वा |
| दरज - | फूट |
| दसकत - | हस्ताक्षर |
| दहिये - | उत्पन्नाचा १० वा हिस्सा |
| दिमत - | ताबा |
| नफर | संख्या |
| नातवानी - | गरिबी |
| नानकार - | निर्वाहापुरेसे |
| नानकुराण - | भाकरी व कुराणाची शपथ |
| पेवस्तगीर - | पावणे |
| पेषकस - | खंडणी |
| बमै - | सुधा |
| बमोजिब - | प्रमाणे |
| बयान - | हकिकत |
| मशारनिल्हे - | उपरोक्त |
| रयात - | रयत लोक |
| रसद - | अगाऊ रक्कम |

| | |
|---|---|
| रुसुम - | हक्क |
| सरसाले - | उभ्या वर्षात |
| सुदामत - | नेहमीप्रमाणे |
| हमराह - | हरप्रकारे . |

# संदर्भग्रंथ - सूची


| | | |
|---|---|---|
| आर्य लिपी | - | 'शिवशाहीचा लेखनालंकार' गो. का. चांदोरकर पुणे. |
| न. चिं. केळकर चरित्र. | - | केळकर वाढदिवस मंडळ, पुणे. १९३२. |
| भा.इ.सं.मं. अहवाल श. १८३२ | - | संपादक-खं. चिं. मेहेंदळे, पुणे. १९११. |
| मराठी विश्वकोश खं. ९ | - | संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८०. |
| मराठेकालीन प्रसिध्द व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे. | - | संपा. दीक्षित-खोबरेकर महाराष्ट्र पुराभिलेख कार्यालय, मुंबई. १९६९. |
| महादजी शिंदे यांची कागदपत्रे | - | संपा. गो.स. सरदेसाई ग्वालेर, १९३७. |
| महाराष्ट्रातील दप्तरखाने | - | वि. गो. खोबरेकर, साहित्य आणि संस्कृतिमंडळ मुंबई १९६८. |
| मोडी लिपी | - | मो. रा. वाळंबे, पुणे |
| राजवाडे चरित्र | - | भा. वा. भट राजवाडे संशोधन मंडळ, ग्रंथमाला ग्रंथ १४ वा, धुळे, १९४०. |
| शाहू दप्तराची सूची खं १ व २ | | संपा. खोबरेकर - पुराभिलेख विभाग, महाराष्ट्रशासन, मुंबई १९७०. |
| समर्थ संप्रदायाची पत्रे | - | संपा. शं. श्री देव भा. १ मणि ९ सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, १९३७. |
| संशोधनासाठी निवडलेले कागदपत्र सूची भा.१ व २ | - | संपा. कुंटे महाराष्ट्र पुराभिलेख विभाग, मुंबई १९७८. |